# ‘स्त्री–पुरुष तुलना’– ताराबाई शिंदे

## प्रा. डॉ. अरुण शिंदे

# घटक १
# वैचारिक साहित्य : संकल्पना व स्वरूपविशेष

## १.१ उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, या घटकाच्या अभ्यासानंतर आपणांस,

१. वैचारिक साहित्याची संकल्पना व स्वरूप सांगता येईल.
२. वैचारिक साहित्याच्या प्रेरणा सांगता येतील.
३. वैचारिक साहित्याची वैशिष्ट्ये सांगता येतील.
४. स्त्रीवादी साहित्याची संकल्पना स्पष्ट करता येईल.
५. एकोणिसाव्या शतकातील सामाजिक स्थिती व स्त्रियांचे लेखन यांचे आकलन होईल.
६. ताराबाई शिंदे यांचे जीवनकार्य व लेखनप्रेरणा सांगता येतील.

## १.२ प्रास्ताविक

साहित्याचे गद्य आणि पद्य हे दोन प्रकार आहेत. 'ज्या शब्दार्थयुक्त भाषेचा साधारण बोलण्यात उपयोग केला जातो,' त्याला गद्य म्हणतात. आणि 'जेथे क्रमबद्ध ताल आणि लयीसाठी वाक्यातील शब्दांच्या साधारण क्रमात बदल करावा लागतो' त्याला पद्य म्हणतात, अशी गद्य आणि पद्य यांच्यातील फरक दर्शविणारी व्याख्या ढोबळमानाने करता येईल. लोकव्यवहारात, वैचारिक, शास्त्रीय लेखनात गद्याचा वापर केला जातो. तर कवितेसाठी पद्याचा अवलंब केला जातो.

मध्ययुगीन मराठीमध्ये गद्यलेखन मर्यादित स्वरूपात आढळते. शिलालेख, महानुभवांचे ग्रंथ, बखरी, पत्रव्यवहार अशा सीमित क्षेत्रांत गद्यलेखन केलेले सापडते. ब्रिटिशांच्या भारतातील आगमनानंतर गद्यलेखनामध्ये नवनवे, वैविध्यपूर्ण प्रकार अस्तित्वात आले. ललित आणि ललितेतर साहित्यामध्ये गद्याचा वापर केला जाऊ लागला. वैचारिक निबंध-प्रबंधांचे गद्य, शास्त्रीय लेखन आणि ललित साहित्यप्रकारातील गद्य यांच्यात फरक असतो. या घटकामध्ये आपण वैचारिक साहित्याचे स्वरूप समजून घेणार आहोत.

ताराबाई शिंदे याचा 'स्त्रीपुरुष तुलना' हा स्त्रीवादी वैचारिक निबंध आहे. म्हणून या निबंधाच्या अभ्यासाच्या अनुषंगाने आपण स्त्रीवादाची संकल्पना तसेच वैचारिक वाङ्मयाचे स्वरूपविशेष समजून घेणार आहोत. त्यानंतर ताराबाई शिंदे यांचे व्यक्तिमत्त्व व त्यांची लेखनप्रेरणा जाणून घेण्याचा प्रयत्न करू या.

## १.३ विषय विवेचन

वैचारिक साहित्याची निर्मिती विचारवंताकडून, तत्त्वचिंतकांकडून, लेखकांकडून होत असते. विचार हा वैचारिक साहित्याचा केंद्रबिंदू आहे. सर्वप्रथम आपण वैचारिक साहित्याची प्रेरणा व स्वरूप जाणून घेऊ या.

### १.३.१ वैचारिक साहित्याची संकल्पना

"Thought' या इंग्रजी शब्दाला मराठीमध्ये 'विचार' असे म्हणतात. विचार ही मानवी मेंदूमध्ये, मानवी मनामध्ये चाललेली एक प्रक्रिया असते. जिला तर्काचा, वैज्ञानिकतेचा आधार असतो. विचार हे एक चिंतन असते; ज्याच्या मुळाशी पद्धतशीरपणे केलेला अभ्यास, निरीक्षणे, निष्कर्ष असतात. विचार या घटकाला ज्यात प्राधान्य दिलेले असते, ते वैचारिक साहित्य होय. व्यक्ती व समाज यांच्या सांस्कृतिक अंगाचा 'विचार' वैचारिक पातळीवरून ज्या साहित्यात केला असेल ते वैचारिक साहित्य, अशी व्याख्या ह. श्री. शेणोलीकर यांनी केली आहे. (शेणोलीकर, वैचारिक वाङ्मय, (संपा.) : कुलकर्णी गो. म. व इतर, मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सहावा, १९८८ : १०६, १०७)

'विचार' हा वैचारिक वाङ्मयाचा प्राण असतो. विशिष्ट विचार अथवा विषय तर्कशुद्ध, साधार प्रतिपादन करीत काही एका निष्कर्षाप्रत घेऊन जाणारे साहित्य म्हणजे 'वैचारिक साहित्य' होय. किंवा वाचकांच्या बुद्धीला सतत आवाहन करणारे आणि तर्कशुद्ध, सप्रमाण, संदर्भासह विषय मांडणारे विचारप्रधान लेखन म्हणजे 'वैचारिक साहित्य' होय.

### १.३.२ वैचारिक साहित्याची प्रेरणा

काही शाश्वत मूल्यांवर समाजाची बांधणी करणे, प्रत्येक समाजगटाच्या विकासाचा विचारव्यूह विकसित करणे हे वैचारिक साहित्याचे मुख्य प्रयोजन असते. विचारवंत, साहित्यिक हे समाजासमोरील प्रश्न, समस्या यांचे शास्त्रशुद्ध आकलन मांडीत असतात. स्वातंत्र्य, समता, बंधुता यांवर आधारित समाज निर्माण करणे हा वैचारिक साहित्याचा एक महत्त्वाचा उद्देश असतो. माहिती देणे, बोध करणे, टीका करणे, शंकानिरसन करणे, आचारविचारांमध्ये परिवर्तन करणे, नवे बदल करणे, सुधारणा घडविणे अशा विविध उद्देशांनी वैचारिक साहित्य लिहिले जाते. वैचारिक साहित्यामध्ये आशयाला, विचार दर्शनाला महत्त्व असते.

मनुष्य हा विचारशील प्राणी असल्याने सर्व माणसे विचार करू शकतात, स्वतःची मते बनवू शकतात व इतरांच्या मतांवर परिणामही करू शकतात, या गृहीतावर वैचारिक साहित्याची निर्मिती होते. आपल्या विचारसरणीचे स्पष्टीकरण व समर्थन करीत ती इतरांना पटवून देत त्यांचे मतपरिवर्तन करून त्यांना आपल्याला अनुकूल करून घेणे ही वैचारिक लेखनाची मूलभूत प्रेरणा असते. वैचारिक साहित्यामध्ये स्वमत प्रतिपादनाइतकेच परमतपरिवर्तनालाही महत्त्व असते. त्यासाठी तर्क, युक्तिवाद यांच्याबरोबर प्रसंगी काही तर्कबाह्य क्लृप्त्यांचाही वापर करावा लागतो. व्यक्ती वा समाज परिवर्तनासाठी विचाराचे रूपांतर कृतीमध्ये होणे आवश्यक असते. नुसत्या विचाराने, ज्ञानाने वा तर्काने व्यक्ती कृतीस प्रवृत्त होत नाही. कृतीसाठी प्रसंगी व्यक्तीच्या भावनेस हात घालावा लागतो. त्यामुळे वैचारिक साहित्यामध्ये भावनात्मकतेचा प्रत्यय काही प्रमाणात का होईना येणे अपरिहार्य ठरते. व्यक्ती कृतिप्रवण होण्यासाठी भाषेचाही कौशल्याने, काळजीपूर्वक वापर करावा लागतो. थोडक्यात, विशिष्ट मूल्यांच्या, विचारांच्या अनुरोधाने दुसऱ्याचे मतपरिवर्तन करून त्यांना कृतिप्रवण करायचे, ही वैचारिक साहित्याची मुख्य प्रेरणा असते. अपेक्षित परिवर्तन व कृती किती प्रमाणात घडते यावर त्या साहित्याचे यशापयश अवलंबून असते.

### १.३.३ वैचारिक साहित्याचे स्वरूप

वैचारिक साहित्य विचारप्रधान असल्यामुळे ललित साहित्याहून भिन्न ठरते. विज्ञानसुद्धा भाषेत निर्माण होते. परंतु विज्ञानाला वैचारिक साहित्य म्हणता येत नाही. विज्ञानात एक प्रकारची तांत्रिकता असते. विज्ञानात व्यक्तिगत भावना-विचारांना स्थान नसते. विज्ञानातील भाषेचे मुख्य कार्य बाह्य वस्तुस्थितीचे यथार्थ वर्णन करीत तिचे स्पष्टीकरण करणे हे असते. न्यायालयीन लेखन, धार्मिक लेखन हे संबंधित व्यवस्थेच्या तत्त्वचौकटीने नियंत्रित व मर्यादित केलेले असते. त्यामुळे त्यांना वैचारिक साहित्य म्हणता येणे अवघड आहे. पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र यांसारखी वस्तुज्ञान करून देणारी भौतिक शास्त्रे व तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, मानसशास्त्र, भाषाशास्त्र यांसारखी सामाजिक शास्त्रे तसेच तांत्रिक ज्ञानाशी संबंधित शास्त्रे यांचा समावेश वैचारिक साहित्यामध्ये होत नाही.

वैचारिक साहित्याचे स्वरूप इतर कोणत्याही वाङ्मयप्रकारापेक्षा वेगळे असते. वैचारिक साहित्य हा गद्य वाङ्मयप्रकार असला तरी शब्दांचा वस्तुनिष्ठपणे वापर केला जातो. वैचारिक साहित्यामध्ये एक विशिष्ट विषय असतो. विषय कोणता असावा यावर बंधन नसते. विचारवंताच्या विचारविश्वातून स्फुरलेल्या कोणत्याही विषयावरील मूलभूत चिंतन वैचारिक साहित्याचा भाग असू शकते. त्या विषयातून विचार व्यक्त होणे महत्त्वाचे असते. विचार हा वैचारिक वाङ्मयाचा गाभा असल्याने विचार प्रतिपादन करणे हे वैचारिक वाङ्मयाचे महत्त्वाचे प्रयोजन मानले जाते. धर्म, समाज, भाषा, साहित्य, कला, संस्कृती, शिक्षण, इतिहास, भूगोल, विज्ञान, न्याय, नीती, अर्थशास्त्र, वैद्यकशास्त्र, पर्यावरण अशा कोणत्याही विषयावर विचारवंत, लेखक सखोल, सप्रमाण, मुद्देसूद विवेचन-विश्लेषण करीत असतो. त्यातून संबंधित विषयाच्या विविध पैलूंचा परिचय होतो. एखाद्या विषयाच्या मुळापर्यंत जाण्याची एक बौद्धिक विचारयात्रा म्हणजे वैचारिक साहित्य. लेखकाचा अभ्यास, व्यासंग, संशोधन, अनुभव, चिंतन, निरीक्षणे, दृष्टिकोण यांमधून वैचारिक साहित्य आकारास येत असते.

वैचारिक साहित्याला जाणूनबुजून रूक्ष, बोजड, क्लिष्ट, कंटाळवाणे करण्याची गरज नसते. तसेच हेतुपुरस्सर सजवण्याचीही आवश्यकता नसते. विषयाच्या, आशयाच्या प्रकृतीनसुर शब्दशरीर धारण करून ते नैसर्गिकपणे आविष्कृत होत असते. वैचारिक साहित्यामध्ये आशय व त्याचे प्रभावी आविष्करण महत्त्वाचे असते. म्हणजे आशयाइतकीच लेखनशैलीही महत्त्वाची असते. लेखकाच्या शैलीचा वाचकांवर प्रभाव पडत असतो. मराठीतील काही शैलीदार लेखकांनी वाचकांवर गारूड केलेले आढळते ते यामुळेच!

वैचारिक वाङ्मयामध्ये निःपक्षपातीपणा, तटस्थपणा अत्यंत महत्त्वाचा असतो. एखाद्या विषयाची एकांगी मांडणी करीत दुसऱ्या बाजूंकडे दुर्लक्ष करणे वैचारिक वाङ्मयात अपेक्षित नसते. पक्षपातीपणा, एकांगीपणा, पूर्वग्रह, आवेश-अभिनिवेश कटाक्षाने टाळून समतोल, विवेकी विवेचन-विश्लेषण करणे अपेक्षित असते. म्हणजे लेखकाने नीरक्षीरविवेकबुद्धीने, न्यायाधीशाच्या भूमिकेतून सद्सद्विवेकबुद्धी व अभ्यास यांना प्रमाण मानून विचार प्रकटीकरण केले पाहिजे. विषयाच्या सर्व पैलूंचे तटस्थपणे आकलन करून चिकित्सक मांडणी केली पाहिजे. याचा अर्थ लेखकाने विषयापासून स्वतःला पूर्णपणे अलिप्त करणे असा नाही. लेखकाचे व्यक्तिमत्त्व, त्याचा जीवनविषयक दृष्टिकोन, भाषाशैली वगैरेंचा प्रभाव त्याच्या

लेखनात पडणे स्वाभाविक असते. परंतु त्याने वैचारिक लेखन प्रभावित होणार नाही, याचे भान लेखकाने बाळगले पाहिजे. म्हणजेच विचार आणि भावना, मेंदू आणि मन, बुद्धी आणि अंतःकरण यांच्या उचित संयोगातून वैचारिक साहित्य निर्माण होत असते, असे म्हणता येते.

वैचारिक साहित्यामध्ये प्रश्नांची उकल केलेली असते. लेखक विवक्षित विषयाच्या अनुरोधाने प्रश्न उपस्थित करतो. त्यांची कार्यकारणभावात्मक उकल करण्याचा प्रयत्न करतो. त्यातून विशिष्ट निष्कर्षापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करतो. वैचारिक लेखनाचा समारोप निष्कर्ष, उत्तर या स्वरूपात होणे अपेक्षित असते. वैचारिक साहित्यात विषयाची मुद्देसूद, क्रमवार मांडणी करीत, ससंदर्भ विवेचन-विश्लेषण करीत निष्कर्षाप्रत नेले जाते. त्यामुळे अशा लेखनाला चिंतनाचे रूप प्राप्त होते. प्रतिपाद्य विषयाची साधकबाधक चर्चा करून प्रभावी आविष्करण केले जाते. वैचारिक लेखनामधून मूल्यात्मकतेचा आविष्कार होतो. त्यासाठी लेखकाचे व्यक्तिमत्त्व बहुश्रुत, चिंतनशील असावे लागते. विवेकशील, वस्तुनिष्ठ, तटस्थ, विश्लेषक, तर्काधिष्ठित चिंतनशील वैचारिक लेखन हे परिणामकारक ठरते.

वैचारिक साहित्याच्या लेखनाची एक शिस्तबद्ध पद्धत असते. वैचारिक लेखनाचा प्रारंभ आकर्षक, वेधक असावा. विषयविवेचन मुद्देसूद असावे. मुद्द्यांच्या मांडणीचा एक विशिष्ट सुसंगतवार क्रम असावा. विचारविकासाचा चढता क्रम असावा. विचारांची वा मुद्द्यांची सर्वांगाने, साकल्याने मांडणी करावी. एखादा विचार अर्धवट सोडून दुसरा मांडण्याचा प्रयत्न केल्यास त्यात विस्कळीतपणा येतो. वैचारिक लेखन वर्णनात्मकतेपेक्षा विश्लेषणात्मक, संशोधनात्मक, मूल्यमापनात्मक असावे. तर्कशुद्ध युक्तिवाद, खंडनमंडन, संदर्भ, आधार, अवतरणे वगैरेंचा वापर करावा. परिणामकारक शेवट असावा. वैचारिक साहित्याची भाषा प्रौढ, समतोल, विश्लेषक स्वरूपाची असावी. आणि स्पष्ट अर्थ व्यक्त करणारी असावी. शब्दांमध्ये, विधानांमध्ये संदिग्धता नसावी. नेमकी दिशा स्पष्ट करणारे लेखन असावे.

तार्किकता हे चांगल्या वैचारिक साहित्याचे महत्त्वाचे लक्षण आहे. मनुष्य हा स्वाभाविकपणे विचार करीत असतो. तर्कामुळे नैसर्गिक विचारप्रक्रियेला शास्त्रीय दृष्टी प्राप्त होते. विचारांमधील तर्कदोष हेरण्याची दृष्टी येते. कार्यकारणभावात्मक दृष्टिकोन प्राप्त होतो. वैचारिक साहित्याने विचारमंथनाला गती येते. विचारांमध्ये सुस्पष्टता येते.

वैचारिक साहित्य तसे कालानुवर्ती असते. तत्कालीन वातावरणातून उत्पन्न झालेल्या समाजवास्तवाशी, प्रश्नांशी, स्थित्यंतरांशी ते निगडित असते. त्यामुळे त्या त्या वेळी ते महत्त्वाचे ठरते, प्रभावी ठरते. परिस्थिती बदलली की, ते अनेकदा इतिहासजमा होते. असे असले तरी ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून ते अभ्यसनीय ठरते. अनेकदा समकालीन वास्तवाची पाळेमुळे भूतकाळात असतात व त्यांचा भविष्यकाळाशीही अनुबंध असतो. त्या दृष्टीने प्रत्येक कालखंडातील वैचारिक साहित्याचा काही भाग स्थळकाळाच्या मर्यादा ओलांडून चिरंतन महत्त्वाचा ठरत असतो. समाजाला पचनी पडलेले विचार लोकमानसाला शक्य तितके विधायक वळण लावून प्रत्यक्ष जीवनव्यवहारात रुजले जातात आणि समाजगतीशी सुसंवादी राहून भविष्यकाळाचा वेध घेऊ पाहणाऱ्या विचारकंदांना नवे धुमारे फुटून ते समाजातील निद्रिस्त वा स्थितिशील घटकांना जागृत वा चैतन्यशाली करतात. विचाराची ही प्रक्रिया समाजात

सतत चालू असते. म्हणून प्रत्येक काळातील नवे वर्ग, नव्या चळवळी, नव्या संस्था यांना वैचारिक साहित्य प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे मार्गदर्शक ठरत असते. कोणतेही मूल्यगर्भ वैचारिक साहित्य हे कायम समकालीन असते.

आवाहकता हे वैचारिक साहित्याचे एक वैशिष्ट्य असते. लेखक आपल्या लेखनातून कोणत्या ना कोणत्या समाजगटांना, जनसमूहांना आवाहन करीत असतो. या आवाहकतेचे स्वरूप दोन पातळ्यांवर असते. एका वेळी तो विशिष्ट जनसमूहाला आवाहन करीत असतो. त्याच वेळी दुसऱ्या बाजूने त्याच्या विचारांना वैश्विक, कालातीत मूल्य प्राप्त होत असते. उदाहरणार्थ, लोकहितवादी गोपाळराव देशमुख, म. जोतीराव फुले यांनी विशिष्ट जनसमूहांना सुधारणेसाठी आवाहन केले, विचार प्रकटीकरण केले. त्याच वेळी त्यांच्या मांडणीतील व्यापकतेमुळे, मूल्यात्मकतेमुळे त्यांच्या विचारांना वैश्विकतेचे परिमाणही प्राप्त झाले. अशा प्रकारे वैचारिक साहित्य हे एकाच वेळी समाजाबरोबर समष्टीसही आवाहन करीत असते. श्रेष्ठ वैचारिक साहित्य स्थलकालाच्या मर्यादा ओलांडून कोणत्याही काळात समकालीन ठरते. मानवजातीला शाश्वत, चिरंतन विचारप्रकाश देत राहते.

### १.३.४ वैचारिक निबंध

वैचारिक गद्यलेखन हा प्रकार आधुनिक इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासाने मराठीमध्ये अव्वल आंग्लकाळात हळूहळू रुजत गेला. वैचारिक गद्याला 'वैचारिक साहित्य', 'निबंध' या नावानेही संबोधले जाते. मराठी वैचारिक साहित्याचा जन्म मराठी निबंधामधून झाला आहे. 'निबंध' हा संस्कृत शब्द आहे. 'बंध' धातूस 'नि' हा उपसर्ग लागून (नि+बंध) निबंध हा शब्द तयार झाला आहे. या शब्दाचा अर्थ 'एकत्र मांडणे', 'कुठल्या तरी नियमांनी बद्ध असे विचार' असा होतो. निबंध या संस्कृत शब्दाचा धात्वार्थ 'गोवलेला विषय' किंवा 'जीत विषय गोवला आहे अशी रचना' असा आहे. 'कोणताही विषय न्याय्य रितीने उद्घाटणे आणि त्याची यथाशक्ति जुळणी करून जे वर्णन करणे तो निबंध होय.'अशी निबंधाची व्याख्या 'मराठी ज्ञान प्रसारक' या नियतकालिकामध्ये १८६३ साली केलेली आहे. 'मराठी भाषेचा नवा कोश' (१८७०) मध्ये 'काही एका गोष्टीवर बांधल्याप्रमाणे लिहिलेले जे व्याख्यान तो' असे निबंध वाङ्मयप्रकाराचे स्पष्टीकरण दिलेले आहे.

इंग्रजीतील 'एसे' या शब्दावरून मराठीत 'निबंध' हा शब्द आला. फ्रेंच लेखक माँतेन याने १५८० साली आपले काही स्फुटात्मक आत्मपर लेखन "Essais' या नावाने प्रसिद्ध केले. आणि या लेखनाच्या प्रभावानेच इंग्लंडमध्ये 'एसे'चा जन्म झाला. इंग्रजी 'एसे' या शब्दाचा कोशातील अर्थ 'प्रासंगिक', 'एक तात्पुरता प्रारंभिक प्रयत्न' असा आहे. यावरून त्याच्या मूळ रूपाची जाणीव होते. परंतु या शब्दावरून मराठीत आलेल्या 'निबंध' शब्दाला मात्र नेमका त्याउलट म्हणजे तर्क, अनुमान, प्रमाणादींनी ज्याचे निबंधन झाले आहे, असे औपचारिक लेखन, असा अर्थ प्राप्त झाला आहे. याचे एक कारण असे की, मराठीतील निबंध हा बेकन, मेकॉले यांसारख्यांच्या निबंधलेखनावरून हळूहळू जन्माला व आकाराला आला.

निबंध हा एक प्रमाणशीर, विषयविस्ताराने मर्यादित असा एक गद्यलेखनप्रकार आहे. जेव्हा 'निबंध' हा प्रमाणाबाहेर मोठा होतो, तेव्हा त्यास 'प्रबंध' (Thesis) म्हणतात. निबंधाचेही स्वरूपानुसार दोन प्रकार

पडतात. पहिल्या प्रकारातील लेखन औपचारिक स्वरूपाचे, वस्तुनिष्ठ व बौद्धिकतेकडे झुकलेले असते. विद्वत्सभेत वाचले जाणारे शोधनिबंध, अभ्यासलेख तसेच ऐतिहासिक, वैज्ञानिक, चरित्रात्मक, निरुपणात्मक अशा स्वरूपाचे लेख, वृत्तपत्रीय अग्रलेख, ग्रंथपरीक्षणे, वाङ्मयीन चर्चा व अन्य विषयांतील लेख आदींचा समावेश होतो. हे सर्व लेखन तर्क, अनुमान आणि प्रमाण यांनी बांधलेले असते. त्यात वैचारिक शिस्त असते. काळाच्या ओघामध्ये निबंधलेखनामध्येही सतत बदल होत गेले. दुसऱ्या प्रकारामध्ये आत्मनिष्ठ, कल्पनाप्रधान, अनौपचारिक स्वरूपाचे निबंध मोडतात. काही निबंधकारांचे लेखन या दोन्ही वर्गांच्या सीमारेषेवर असते. उदा. गो. ग. आगरकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे लेखन हे प्रकृतीने वस्तुतः पहिल्या प्रकारात मोडणारे आहे; परंतु त्यांच्या लेखनामध्ये त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे गडद प्रतिबिंब पडल्याने ते वस्तुनिष्ठ वाटण्याऐवजी व्यक्तिनिष्ठ वाटते. निबंधलेखकाच्या प्रकृतीवर व त्याच्या शैलीवर निबंधाचे स्वरूप ठरते.

व्यक्तिवाद, विवेकवाद, इहवाद, प्रबोधन ही वैचारिक साहित्याची आधारतत्त्वे होत. या आधारतत्त्वांवर वैचारिक साहित्य निर्माण होत असते. आधुनिक मराठी वैचारिक साहित्याच्या प्रेरणा मुख्यतः या आधारतत्त्वांमध्ये दडलेल्या होत्या. त्याचबरोबर स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवी प्रतिष्ठा, न्याय, सहिष्णुता या मूल्यांचा आविष्कार ज्या वैचारिक साहित्यामधून होत असतो, ते श्रेष्ठ साहित्य. कारण मानवी सहजीवन व सर्वांगीण विकासाचे मानदंड म्हणून ही मूल्ये जगभर मान्यताप्राप्त आहेत.

### १.३.५ स्त्रीवाद

'स्त्रीवाद' ही केवळ एक सैद्धांतिक विचारप्रणाली नसून ती गतिशील आणि कृतिनिष्ठ स्वरूपाची आहे. आपल्या भोवतालचे जग केवळ समजून घेणे एवढ्यापुरते तिचे उद्दिष्ट मर्यादित नसून ते जग बदलण्याचा प्रयत्न करणारी ही विचारप्रणाली आहे. युगानुयुगांपासून आजतागायत स्त्रीवर होत असलेल्या सार्वत्रिक जुलुमाची कारणे समजून घेऊन तो जुलूम समूळ नष्ट करणे, हे या विचारप्रणालीचे मुख्य उद्दिष्ट आहे. पितृसत्ता ही या जुलुमाचे आदिकारण आहे, याविषयी सर्व प्रकारच्या स्त्रीवादी विचारधारांमध्ये एकवाक्यता आहे. स्त्रीवाद्यांच्या मते पितृ-सत्ता ही एक सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक व्यवस्था असली, तरी तिचा सिद्धांत कोठेही एकत्रित वा ग्रथित स्वरूपात उपलब्ध नाही किंवा आपण पितृसत्तेचे पुरस्कर्ते आहोत असे स्पष्टपणे फारसे कोणी स्वीकारताना दिसत नाही. परंतु या व्यवस्थेमुळे स्त्री ही सर्वत्र पुरु-षाच्या तुलनेत गौण लेखली गेलेली आहे.

प्रजननाच्या संदर्भात स्त्री व पुरुष यांच्या भूमिका भिन्न असतात आणि म्हणून त्यांची इतर लक्षणे, स्वभाव, कार्यक्षेत्रे आणि कर्तव्ये हीसुद्धा वेगळी असतात, ही पितृसत्तेची मूलभूत भूमिका आहे. पितृसत्ताक विचारचौकटीमध्ये स्त्रियांच्या स्त्री म्हणून मानल्या जाणाऱ्या ज्या ज्या गुणांना मान दिला जातो, ते सर्व गुण फक्त पुरुषांच्या हितसंबंधांना पोषक असेच असतात.

फ्रेंच विचारवंत सीमॉन द बोव्हार यांनी 'द सेकेंड सेक्स' (१९४९) या आपल्या ग्रंथात स्त्री 'दुय्यम' गणली जाण्याची दोन कारणे सांगितलेली आहेत. एक म्हणजे वर म्हटल्याप्रमाणे स्त्रीला मिळणारा दुय्यम दर्जा. दुसरे म्हणजे पुरुष आणि पितृसत्ता जेव्हा 'स्व' आणि 'पर' अशा आपपर विरोधाची मांडणी करतात तेव्हा स्त्रीचे 'पर' म्हणून स्वतंत्र अस्तित्व आकार घेत नाही, तर त्या 'पर'चे स्वरूप केवळ न्यूनतादर्शक किंवा अभावदर्शक असते. उदा., पुरुष विचारप्रवण असतात, तर स्त्रिया भावनाप्रवण असतात, असे म्हणताना स्त्रियांमध्ये विचारशक्तीचा अभाव असतो यावर भर दिला जातो; परंतु दुसऱ्या बाजूने पुरुषांमध्ये भावनाशक्तीचा अभाव असतो यावर भर दिला जात नाही. 'स्त्री म्हणून आपण जन्म घेत नसतो, तर आपण स्त्री बनत असतो.' (One is not born a woman; rather one becomes a woman,) हे सीमॉन द बोव्हारचे विधान आहे. अर्थात आपण स्त्री वा पुरुष देह घेऊन जन्माला येतो, हे येथे नाकारायचे नाही. परंतु या देहाबरोबर लाजाळूपणा, नाजुकपणा, भावनाप्रधानता, ममता, स्वार्थत्याग, समर्पण वगैरे गुणही जन्मजात असतात, हे येथे नाकारायचे आहे. हे गुण समाजाने व संस्कृतीने स्त्रीत्वावर लादलेले असतात, तेव्हा जैविक लिंगभेद म्हणजे सांस्कृतिक लिंगभेद नव्हे, हे स्त्रीवादाने स्पष्ट केलेले आहे.

जैविक लिंगभेद हे जननेंद्रिये व त्यांची कार्ये यांच्याशी संबद्ध आणि सार्वत्रिक स्वरूपाचे आहेत. याउलट सांस्कृतिक लिंगभेद भाषा, समाज व संस्कृती ह्यांमुळे निर्माण होतात. जैविक लिंगभेदासाठी 'सेक्स', तर सामाजिक-सांस्कृतिक लिंगभेदासाठी 'जेंडर' या दोन वेगळ्या संज्ञा इंग्लिशमध्ये आता रूढ झालेल्या आहेत. देहरचनेच्या भेदामुळे निर्माण झालेली स्त्रीपुरुषविषमता ही अत्यंत मर्यादित असून संस्कृतिजन्य भिन्नतेतून निर्माण होणारी विषमता आपण बदलायला हवी, हे स्त्रीवादी कृतिनिष्ठ कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. भाषा, धर्म, कला, साहित्य, थोरांचे उपदेश आणि उदाहरणे, शिक्षणपद्धती या सर्वांच्या प्रभावामुळे आपण स्त्रीचे गुण हे स्वाभाविक वा नैसर्गिक गुण म्हणून स्वीकारतो. सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेतून निर्माण झालेली स्त्रीत्वाची 'भूमिका' (रोल) आपण स्वीकारत जातो आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण या सामाजिक-सांस्कृतिक मुशीतूनच होत जाते. या प्रक्रियेला लिंग-निर्मिती (जेंडर कन्स्ट्रक्शन) म्हणता येईल, या प्रक्रियेतून लिंगबद्ध व्यक्तिमत्त्वं आकार घेत असते. या प्रक्रियेतील विषमतेला व अन्यायाला विरोध करून 'स्त्री' व 'पुरुष' या संज्ञांना वेगळे अर्थ देण्याचा प्रयत्न स्त्रीवाद करत असतो.

स्त्रियांवर झालेल्या जुलुमाचे मूळ कारण कोणते ? आणि हा जुलूम संपविण्यासाठी कोणता मार्ग स्वीकारावा ? या दोन प्रर्भाच्या संदर्भामध्ये घेतल्या जाणाऱ्या भूमिकांनुसार स्त्रीवादामध्ये तीन प्रमुख प्रवाह निर्माण झालेले आहेते : उदारमतवादी वा समानतावादी स्त्रीवाद, जहाल स्त्रीवाद आणि मार्क्सवादी स्त्रीवाद.

वर उल्लेखिलेल्या स्त्रीवादी भूमिका प्रामुख्याने पाश्चात्त्य समाजाच्या संदर्भामध्ये सुरू झालेल्या आहेत. पाश्चात्य स्त्रीवादी भूमिकांपेक्षा वेगळ्या प्रकारे विश्लेषण करण्याची क्षमता असणारा स्त्रीवाद भारतासारख्या तिसऱ्या जगातील देशासाठी आवश्यक आहे, असा एक मतप्रवाहही अलीकडे मूळ धरतो आहे. भारतीय समाजरचनेची जाती-वर्ण-वंश-वैशिष्ट्ये आपल्या स्त्रीत्वाच्या जडणघडणीला एक वेगळा संदर्भ देतात, त्यांचा विचार केल्याखेरीज व त्यांना विरोध केल्याखेरीज सांस्कृतिक लिंगनिर्मिती-प्रक्रिया बदलता येणार नाही, असे

भारतीय स्त्रीवाद्यांचे म्हणणे आहे. स्त्री ही एक सार्वत्रिक व सार्वकालिक संकल्पना बनविण्यामध्ये जे धोके आहेत, त्यांच्याकडे या स्त्रीवादाने लक्ष वेधलेले आहे व तशी संकल्पना टाळण्याचा प्रयत्न केलेला आहे, मध्यमवर्गीय विभक्त कुटुंबातील स्त्रीपेक्षा एकत्र कुटुंबपद्धतीमधील स्त्री किंवा बाल-विवाह झालेली स्त्री किती वेगळी असते, त्याचप्रमाणे सामाजिक चळवळीत भाग घेऊन स्त्री किती सबळ बनते, यावर भारतीय स्त्रीवादार आहे .

### १.३.६ स्त्रीवादी साहित्य

स्त्रीवाद ही एक समाजपरिवर्तन घडवू 'पाहणारी 'राजकीय' जाणीव आहे. प्रत्येक ऐतिहासिक टप्प्यावर मानवी समाजात स्त्री-पुरुषांमध्ये विशिष्ट प्रकारचा सत्तासंबंध रचला जातो, हे भान स्त्रीवादी जाणिवेमध्ये असते. लिंगभेदाधिष्ठित विषमता निसर्गानुसारी नसते, तर मानवी संस्कृतीत घडविली जाते असे स्त्रीवादी मानतात. जात, वंश, वर्ग, धर्म आदी संरचनांप्रमाणेच पुरुषप्रधानता नावाची संरचना असते, असा दावा स्त्रीवादी विचारप्रणाली करते. पुरुषप्रधानता आणि लिंग-भाव (जेंडर) ह्या दोहोंची घडण स्त्रियांच्या (लैंगिक, सामाजिक, आर्थिक) श्रमांच्या अपहरणातून सिद्ध होते. ह्यातूनच पुरुषी वर्चस्वाच्या मूल्यव्यवस्थेचा डोलारा उभारला जातो. लिंगभावाची जडणघडण (जेंडर कन्स्ट्रक्शन) अनेक संरचनांमधून आकार घेत असते, म्हणून स्त्रीवादी जाणीव ज्ञानाच्या प्रत्येक शाखेशी संलग्न विचार व कृती करण्याचा प्रयत्न करते. आपल्या 'स्व'ची ('अहं') जडणघडण कशी झाली आहे, ह्याचा शोध घेण्यापासून ते आंतरराष्ट्रीय राजकारणापर्यंत स्त्रीवादाला सर्वस्पर्शी होणे भाग पडते.

स्त्रीवादी जाणीव म्हणजे एकच एक साचा अथवा एकाकारमात्र नसते. इतिहासाच्या भिन्न टप्प्यांवर, विविध परिप्रेक्ष्यांतून स्त्रीवादी भान घडत असते. उदारमतवादी, मार्क्सवादी, समाजवादी, आधुनिकोत्तर अशा अनेक विचारप्रणालींमध्ये स्वतःची भर घालून, स्त्रीवादी भान स्त्री-पुरुष विषमतेच्या प्रश्नांची मीमांसा करते. म्हणून काळाच्या प्रत्येक टप्प्यावर स्त्रीवादाची भिन्न रूपे तर दिसतातच; परंतु त्यांच्यात अनेकदा परस्परविरोधही दिसतो. ह्याचेच प्रतिबिंब वेगवेगळ्या काळांत लिहिल्या गेलेल्या स्त्रीवादी साहित्यात दिसते.

कोणत्या साहित्याला स्त्रीवादी साहित्य म्हणता येईल हा एक गुंतागुंतीचा प्रश्न आहे. परंतु एवढे निश्चित म्हणता येईल, की मानव म्हणजे पुरुषः स्त्री हे त्याचे उपांग ह्या विचाराला छेद देणारे, त्याबद्दल प्रश्न निर्माण करणारे, त्यातील जटिलता, धूसरता यांची जाणीव करून देणारे साहित्य स्त्रीवादी साहित्य म्हणता येईल. बाईच्या असण्याचा, होण्याचा समग्रतेने वेध घेणारे, तिच्या आत्मशोधाचा प्रवास साहित्यिक आविष्कार म्हणून मांडणारे लेखनही स्त्रीवादी मानता येईल.

स्त्रीवादी साहित्य ही संकल्पना भारतात आली, ती ब्रिटिश आणि अमेरिकन स्त्रीवादी चळवळीतून आणि स्त्रीवादी साहित्यातून. साधारणतः १९६० च्या सुमारास पाश्चात्य जगात 'स्त्रीवाद' ही जाणीव उदयाला आली. १९७० सालापर्यंत ही चळवळ स्थिरावली, त्या काळात केट मिलेटचे 'सेक्शुअल पॉलिटिक्स'

(लैंगिकतेचे राजकारण) हे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्या काळात मानदंड ठरलेल्या पुरुष लेखकांच्या प्रमुख साहित्यकृतींतून स्त्रीप्रतिमांचे साचेबंद चित्रण कसे होते ह्याचे धारदार विश्लेषण ह्या पुस्तकात आले. ह्यां टप्प्यावर नव्या स्त्रीवादी भानातून स्त्रीवादी समीक्षक स्त्रियांच्या लेखनपरंपरेकडे वळले, स्त्रीवादी साहित्याचा शोध घेणे म्हणजे एक सांस्कृतिक, राजकीय लढा आहे हे लक्षात घेऊन, अगदी चौदाव्या शतकापासून आजवर जे स्त्री-लेखन दुर्लक्षित होते ते मुक्त केले गेले.

स्त्रियांच्या प्रतिमांच्या अभ्यासाऐवजी लेखनपरंपरेचा इतिहास निर्माण करण्याचे जे प्रयत्न झाले, त्यातून एक 'स्त्रीकेंद्री' साहित्य प्रवाह निर्माण झाला. स्त्रीवादी लेखनपरंपरा निर्माण करून, स्त्रियांमध्ये 'भगिनीभाव' निर्माण करून, पुरुषप्रधान संरचनेला हादरवून टाकण्याचा हा राजकीय प्रयत्न आहे. थोडक्यात, स्त्रीवादी साहित्याच्या 'विशिष्ट सामाजिक चौकटीतील खासगी अनुभवांचे प्रभावी चित्रण' ह्या व्याख्येपासून सुरुवात होऊन हळूहळू पुरुषप्रधान चिन्हव्यवस्था नाकारून आपली स्वतंत्र चिन्हव्यवस्था निर्माण करण्याचे प्रयत्न, येथपर्यंत मजल मारलेली दिसते.

आपल्याकडे स्त्री-लेखनाची परंपरा जाणीवपूर्वक एकत्र आणून भारतीय स्त्रियांच्या लेखनाचा इतिहास निर्माण करण्याचा स्त्रीवादी प्रयत्न 'विमेन रायटिंग इन इंडिया' (१९९२, १९९३) ह्या ग्रंथाने केला. विविध कालखंडांत स्त्रियांनी लिहिलेले तेरा भारतीय भाषांतील १४० साहित्यिक वेचे त्यात आहेत. त्यातून अगदी बुद्धकालीन थेरीगाथांपासून भक्तिकाळातील स्त्रियांचे लेखन, आधुनिक काळातील स्त्रियांची चरित्रे, आत्मचरित्रे व वर्तमानकालीन बंडखोर लेखन एकत्र सापडते. महाराष्ट्रातील महदंबा, मुक्ताबाई, जनाबाईपासून तसेच ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई आणि लक्ष्मीबाई टिळकांपासून स्त्रियांची अलीकडची आत्मचरित्रे, तसेच कथा, कादंबऱ्या असा स्त्रीवादी लेखनाचा मोठा पैस आहे.

### १.३.७ एकोणिसाव्या शतकातील सामाजिक सुधारणेच्या चळवळी

आपण जगात मागे का पडलो? ब्रिटिशांच्या प्रगतीची व आपल्या अधोगतीची कारणे कोणती? आपल्या सामाजिक जीवनात एकात्मता निर्माण न होण्याची कारणे कोणती? आपल्या समाजात स्त्रियांचे स्थान काय? यांसारख्या प्रश्नांची चिकित्सा एकोणिसाव्या शतकातील सुशिक्षितांच्या पहिल्या पिढीत सुरू झाली. भौतिक विद्येकडे दुर्लक्ष आणि कालबाह्य धर्मनियमांनी झाकोळून गेलेले गतिशून्य समाजजीवन हा सुधारकांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. लोकहितवादी, भाऊ महाजन, विष्णुशास्त्री पंडित, गोपाळराव देशमुख, न्या. म. गो. रानडे, गो. ग. आगरकर आदी समाजसुधारकांनी समाजातील अनिष्ट प्रथांवर व कालबाह्य परंपरांवर हल्ला चढविला.

एकोणिसाव्या शतकातील सुधारणेचे विचार मूलतः मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजाशी निगडित होत्या. ते मुख्यतः अव्वल इंग्रजी काळातील सुधारकांचे कार्य प्रायः त्यांच्या अनुभवक्षेत्रापुरतेच मर्यादित होते. म्हणजे ते ज्या वर्गात जन्मले, वाढले, वावरले आणि ज्यांच्या सुखदुःखाशी समरस झाले; तिथे जे दिसले, जाणवले, अनुभवले, तेच त्यांच्या विचारांचे विषय बनले. सोवळे-ओवळे, केशवपन, परदेशगमन, स्त्रीशिक्षण,

बालविवाह, विधवाविवाह, जरठकुमारी विवाह हेच त्यांचे कार्यक्षेत्र होते. उच्चवर्णीय ब्राह्मण समाजाच्या कौटुंबिक सुधारणेचा प्रश्न जोरदारपणे मांडून त्यांनी जागृती केली. ब्राह्मणांच्या विचार आचारात घडून आलेल्या परिवर्तनाचे मोठे श्रेय त्यांना जाते. मात्र पांढरपेशा समाजाच्या पलीकडे खेड्यापाड्यातून प्रचंड संख्येने पसरलेला, अठरापगड जाती जमातीत विभागलेला व अज्ञान, अंधश्रद्धा, दारिद्र्यात बुडालेला, शेतकरी-कष्टकऱ्यांचा विशाल जनसमूह व त्यांचे जीवनमरणाचे प्रश्न यांची साधी दखलही त्यांनी घेतली नाही. स्वजातीच्या पलीकडे त्यांची दृष्टी गेली नाही. त्यांच्या कार्याला ते ज्या वर्गातून आले होते, त्या वर्गाची मर्यादा पडलेली दिसते.

ब्राह्मो समाज (१८२८), प्रार्थना समाज (१८६७), सत्यशोधक समाज (१८७३) आणि आर्य समाज (१८७५) यांनी संस्थात्मक पातळीवर समाजसुधारणेचे कार्य केले. हे सर्व समाज एकेश्वरवादी होते. सर्व मानव ईश्वराची अपत्ये आहेत, ईश्वराची आराधना करण्यासाठी पुरोहितांची आवश्यकता नाही, हे तत्त्व या चारही समाजांना मान्य होते. पण त्यांच्या दृष्टिकोनात काही मूलभूत तात्त्विक भेद होते. म. फुल्यांना कोणताही धर्मग्रंथ, धर्मसंस्था आणि समाज संस्था ईश्वरप्रणित आहे, असे वाटत नव्हते. सारे धर्मग्रंथ मनुष्यांनीच निर्माण केलेले आहेत, त्यांच्या भोवती ईश्वर आज्ञेचे वलय उत्पन्न करून समाजाची वंचना केली जाते, असे त्यांचे प्रतिपादन होते. ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज आणि आर्य समाज यांची भूमिका या बाबतीत वेगळी होती. 'वेद हे ईश्वरनिर्मित ग्रंथ आहेत' अशी त्यांची श्रद्धा होती. ब्राह्मो, प्रार्थना आणि आर्य समाजाचे संस्थापक वरिष्ठ ब्राह्मण जातीतील होते व त्यांचे सदस्यही बहुधा याच वर्गातील होते. त्यांचा सर्वसामान्य जनतेशी फारसा संबंध नव्हता. सामान्य माणसाशी समरस होऊन त्यांच्या समस्या सोडविण्यात त्यांना विशेष रस नव्हता. आध्यात्मिक समतेसाठी त्यांचे प्रयत्न असले तरी सामाजिक समतेच्या संदर्भात कृतीच्या पातळीवर उतरून त्यांनी फारसे कार्य केल्याचे आढळत नाही. महाराष्ट्राच्या भूमीत ब्राह्मो समाज तग धरू शकला नाही. प्रार्थना समाजाला थोडाबहुत आधार मिळाला तरी सर्वसामान्य जनतेपासून तो दूर अंतरावरच राहिला. आर्य समाजाची स्थापना मुंबईत झाली तरी त्याचा प्रसार महाराष्ट्रात फारसा झाला नाही. आर्य समाजाचे कार्यक्षेत्र मुख्यतः उत्तर भारत राहिले.

या तीन समाजाच्या पार्श्वभूमीवर सत्यशोधक समाजाने खेड्यापाड्यात जनसामान्यांच्या मनात स्थान मिळविले तसेच त्यांच्या जाणिवांना, आकांक्षांना आकार दिला. आत्मोद्धाराची प्रेरणा दिली. धार्मिक आणि सामाजिक शोषणाविरुद्ध बंड करण्याची प्रवृत्ती शूद्रातिशूद्रात निर्माण केली. सत्यशोधक समाज बहुजन समाजाच्या मार्गदर्शनाचे आणि परिवर्तनाचे प्रतीक बनले. खरेतर ब्राह्मो, प्रार्थना आणि आर्य समाजांना बुद्धिजीवी विचारवंतांचा पाठिंबा होता. सत्यशोधक समाज मात्र शेतकरी-कामगार, श्रमिक जनसमूहांच्या जीवनमरणाच्या प्रश्नांसाठी झगडत होता. त्यांच्या मानवी हक्कांचा प्रश्न ऐरणीवर आणण्यासाठी लढा संघटित करीत होता. सत्यशोधक समाजापूर्वी परमहंस सभेने जातिभेद मोडण्याचा प्रयत्न केला, परंतु सभेला फारसे यश मिळाले नाही. सभेचे कामकाजही गुप्तपणे चालत होते. या कातडीबचाऊ प्रवृत्तीमुळे परमहंस सभा लवकरच अस्तंगत झाली. संस्थेचे केवळ ध्येय चांगले असून चालत नाही; तत्त्वनिष्ठ, निर्भय, निश्चयी नेते

आणि अनुयायी यांच्या बळावरच संस्थेला स्थैर्य येते आणि ती प्रगतीच्या दिशेने चालू लागते. म. फुले यांच्यासारख्या ध्येयवादी क्रांतिकारकाचे निर्भय नेतृत्व व कृतिशील व्यक्तित्व लाभल्यामुळे सत्यशोधक समाजाने परिवर्तनाची व्यापक लोकचळवळ, संघटित व गतिमान केली.

## १.३.८ स्त्रियांचे लेखन

**मिसेस फेरार** या ख्रिस्ती लेखिकेचा 'कुटुंबप्रवर्तननीति' (१८३५) हा निबंध प्रसिद्ध आहे. कुटुंबातील व्यक्तींनी एकमेकांशी कशा रीतीनें वागावे व आईबापांनीं मुलांविषयीचीं आपली कर्तव्ये पार पाडतांना कोणत्या प्रकारची सावधगिरी घेणे जरूर आहे, याचे विवेचन या निबंधामध्ये केले आहे.

**मुक्ता साळवे** हीफुले दांपत्याने पुण्यात अतिशूद्रांसाठी सुरू केलेल्या शाळेत शिकणारी एक मातंग समाजातील विद्यार्थिनी. तिने फुल्यांच्या शाळेत तीन वर्षे विद्याभ्यास केल्यानंतर वयाच्या चौदाव्या वर्षी मांग–महारांच्या दुःखाविषयी निबंध लिहिला. 'ज्ञानोदय' पत्राचे संपादक डॉ. सॅम्युएल बेकन यांनी फुल्यांच्या शाळेस भेट दिली. त्या वेळी मुक्ताने त्यांच्यासमोर त्या निबंधाचे वाचन केले. त्याने प्रभावित झालेल्या संपादक महोदयांनी मुक्ताने 'जे स्वबुद्धीने लिहिले तेंच लोकांस समजावे व त्यावरून तिच्या शहाणपणाचे व अभ्यासाचे त्यांनी अनुमान करावे म्हणून त्यांत काहीच फेरफार न करता' हा निबंध 'ज्ञानोदय'च्या १५ फेब्रुवारी व १ मार्च १८५५ च्या अंकामधून संपादकीय टिप्पणीसह प्रसिद्ध केला. निबंधाच्या प्रारंभीच मुक्ताने दुर्दैवी पशूपेक्षा नीच मानलेल्या दरिद्री मांग–महारांच्या दुःखाविषयी लिहिण्याचे काम सरसावून हाती घेऊन मांग–महार व ब्राह्मणांचा उत्पन्नकर्ता एकच असल्याचा उल्लेख केला आहे. मुक्ताने या निबंधात धर्मव्यवस्था, राज्यव्यवस्था व समाजव्यवस्था यांची परखड चिकित्सा केली आहे. या तिन्ही व्यवस्थांमध्ये समकालीन मांग–महारांचे स्थान कोणते? व ते तसे का? या प्रश्नांचा तर्कशुद्ध व अभ्यासपूर्ण शोध ती घेते. वैदिक धर्मव्यवस्था व ब्राह्मणशाही यांचे स्वार्थी हितसंबंध ती उघडे पाडते. वेदादी ग्रंथांना ब्राह्मणांनी स्वतःची मक्तेदारी करून इतर जनसमूहांना धर्मग्रंथ, ज्ञानव्यवहार वगैरे नाकारले. दलितांना धर्मासंबंधी पुस्तक पाहण्याची मोकळीक नाही, त्यांचे अवलोकन केल्यास महापातक घडते. यांसारख्या ब्राह्मणी मतांमुळे आम्ही धर्मरहित आहोत, असे मुक्ता ठामपणे सिद्ध करते. 'ज्या धर्मव्यवस्थेचा एकानेच लाभ घ्यावा व इतरांनी फक्त त्याच्या तोंडाकडे पाहावे असे पक्षपाती धर्म पृथ्वीवरून नष्ट होवोत व अशा धर्माचा अभिमान करावा असे आमच्या मनात देखील न येवो' असे निर्वाणीचे विधान करते. ब्राह्मणशाहीने पेशवाईत दलितांवर केलेले अमानुष अत्याचार, विटाळ, शिक्षणबंदी, त्यांच्यावरील जुलूम व त्यांची भयंकर दुर्दशा याचे सप्रमाण विवेचन मुक्ताने केले आहे. मुक्ताच्या लेखणीतून पिढ्यान्‌पिढ्या भोगलेल्या मूक दुःखाचा व छळाचा उद्रेक ज्वालामुखीसारखा होतो. 'पंडीत हो, तुमचे स्वार्थी, अप्पलपोटे पांडित्य पुजेसहित एकीकडे गुंडाळून ठेवा. आणि मी सांगते याजकडे लक्षपूर्वक कान द्या. ज्या वेळेस आमच्यातल्या स्त्रिया बाळंत होतात त्या वेळेस त्यांच्या घरावर छप्परसुद्धा नसते, म्हणून हीव, पाऊस व वारा यांच्या उपद्रवामुळे त्यांस किती दुःख होत असेल बरे! याचा विचार स्वतःच्या अनुभववावरून करा. जर एखाद्या वेळेस त्यांस बाळंतरोग झाला तर त्यांस औषधास व वैद्यास पैसा कोठून मिळणार! हा जुलूम विस्ताराने लिहू लागले तर मला रडू येते.'

दलितांच्या दुःखाचे हृदयभेदक वर्णन मुक्ताने केले आहे व त्या दुःखास कारणीभूत व्यवस्थेचा खरपूस समाचार घेतला आहे. ब्रिटिश काळात लाभलेली सुरक्षितता व मोकळा श्वास घेण्याची संधी याचे मुक्ता स्वागत करते. महार–मांगांच्या सुधारणेसाठी झटणारे ब्राह्मण सुधारक व शाळा काढणारे सद्‌गृहस्थ यांच्याविषयी मुक्ताने कृतज्ञता व्यक्त केली आहे. तसेच महार–मांग लोकांनीही पारंपरिक गतानुगतिक मानसिकतेतून बाहेर पडण्याचे व शिक्षण घेण्याचे आवाहन पोटतिडकीने केले आहे. 'अहो, दारिद्र्यांनी व दुःखांनी पिडलेले मांग महार लोक हो, तुम्ही रोगी आहात, तर तुमच्या बुद्धिला ज्ञानरूपी औषध द्या म्हणजे तुम्ही चांगले ज्ञानी होऊन तुमच्या मनातील कुकल्पना जाऊन तुम्ही नितिमान व्हाल, तर तुमच्या रात्रंदिवस ज्या जनावरांप्रमाणे हाजऱ्या घेतात त्या बंद होतील.' दलितांच्या दुःखमुक्तीची, शोषणमुक्तीची आच मुक्ताच्या निबंधातून तीव्रपणे व्यक्त होते. वैदिक धर्मव्यवस्था व ब्राह्मण्यशाहीची निर्भीड चिकित्सा मुक्ता साळवे करते. दलितांवरील अन्याय–छळ यांच्याविरोधात जोरदार आवाज उठवते. हा निबंध म्हणजे दलित, शोषित, वंचित जनसमूहांच्या दुःखाचा व त्या विरोधातील विद्रोहाचा पहिला आविष्कार आहे.

**सावित्रीबाई फुले** (१८३१–१८९७) यांचे 'सावित्रीबाईंची भाषणे' (१८७२), 'जोतिबांची भाषणे' (१८५६), 'सावित्रीबाईंची जोतिबास पत्रे' हे त्यांचे वैचारिक साहित्य प्रसिद्ध आहे. 'जोतिबांची भाषणे' सावित्रीबाईंनी संपादित केलेली आहेत. या भाषणांमध्ये मानवप्राण्याची उत्पत्ती, पशुपक्षी आणि मानव, रानटी अवस्थेतील मानव, मानवाची सुधारणूक – बळीराजाचे बलिस्थान असे विषय आले आहेत. शास्त्री नारो बाबाजी महाधट पाटील या थोर सत्यशोधकाने **'सावित्रीबाईंची भाषणे'** १८९२ साली प्रकाशित केली आहेत. त्यांच्या भाषणाचे विषय उद्योग, विद्यादान, सदाचरण, व्यसने, कर्ज असे आहेत. विषयावरूनच भाषणांचे सामाजिक महत्त्व लक्षात येते. 'उद्योग' या भाषणामध्ये त्या म्हणतात, ''... न थकता दिवसभर उद्योग करणे हा मनुष्याचा उत्तम धर्म असून तो त्याचा खरा कल्याण करणारा मित्र होय. ...आपल्या देशात थोडेसे इंग्रज लोक व्यापाराला आले आणि त्यांनी एक प्रचंड राज्य स्थापन केले. हा दृढ उद्योगाचा आणि बुद्धिशक्तीचा चमत्कार आहे. त्यात दैवाचा संबंध नाही. देव, प्रारब्ध यांवर विश्वास ठेवणारे लोक आळशी व भिकारी असून त्यांचा देश नेहमीच दुसऱ्याच्या गुलामगिरीत राहतो. याचे ढळढळीत उदाहरण म्हणजे आपला हिंदुस्थान होय.'' (माळी मा. गो. (संपा.) सावित्रीबाई फुले समग्र वाङ्‌मय, १९९८ : ९४) उद्यमशीलतेचे व्यक्तिगत व सामाजिक महत्त्व अत्यंत यथार्थपणे सावित्रीबाईंनी मांडले आहे. 'विद्यादान' या विचारप्रवर्तक भाषणामध्ये त्या म्हणतात, ''आळस, परावलंबन वगैरे दुर्गुण न वाढविण्यास व मनुष्याच्या अंगचे सद्‌गुण वाढण्यास उपयुक्त असा कोणता धर्म असेल तर विद्यादान होय. विद्या देणारा व विद्या घेणारा असे दोघेही या धर्माच्या योगाने खरीखुरी माणसे बनतात. या धर्माच्या शक्तीमुळे मनुष्यातील पशुत्वाचा लोप होतो. विद्या देणारा धैर्यशाली निर्भय बनून विद्या घेणारा सामर्थ्यशाली शहाणा बनतो.'' (पूर्वोक्त : ९७) यावरून सावित्रीबाईंची स्वतंत्र व मूलगामी विचारदृष्टी, चिंतनशीलता यांचे प्रत्यंतर येते. सावित्रीबाईंनी जोतीबांस लिहिलेल्या तीन पत्रांमधूनही त्यांच्या गद्यशैलीचे दर्शन घडते. त्यांची भाषा साधी, सोपी असून काळजाचा ठाव घेते.

**पं. रमाबाई** (१८५८–१९२२) या विद्वान व बहुभाषिक विदुषीने 'स्त्रीधर्म–नीति' (१८८२) हे पुस्तक वयाच्या अवघ्या चोविसाव्या वर्षी लिहिले. त्यांनी इंग्रजी व मराठीतून तेरा ग्रंथ लिहिल्याची नोंद आढळते. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत पं. रमाबाई लिहितात, ''सांप्रतकाळी आमच्या हतभागी देशातील स्त्रीजातीची दशा किती शोचनीय आहे, हे सांगता पुरवत नाही. या देशातील स्त्रिया अगदी असहाय आणि ज्ञानशून्य आहेत. त्यामुळे त्यास आपले हित कसे प्राप्त करून घ्यावे, हेही समजत नाही. याजकरिता ज्ञानी लोकांनी त्यांचे हित काय केल्याने होईल? हे सांगून त्यांजकडून त्याप्रमाणे आचरण करविले पाहिजे.'' स्त्रियांनी कसे वागावे, कसे राहावे यासंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी हा ग्रंथ त्यांनी लिहिला. 'पाया', 'विद्या', 'मर्यादा', 'धर्म', 'वधृवृत्त', 'गृहकृत्य', 'बालकाचे पालन', 'इतिकर्तव्यता' या आठ प्रकरणांतून स्त्रियांना 'आत्मोद्धारा'चा मार्ग दाखविला आहे. उत्कर्षाचा पाया आत्मावलंबन आहे आणि स्त्रीने जर आत्मावलंबनाचा मार्ग पत्करला तर तिची उन्नती ती स्वतःच करू शकेल, असे त्या म्हणतात. पं. रमाबाईंची भाषा आर्जवी, मृदू आहे. त्या स्त्रियांना स्वावलंबी, कामसू, शिक्षित होण्याचे आवाहन करतात. आदर्श पत्नी, माता, गृहिणी या परंपरागत भूमिकांचे यशस्वी पालन करून स्वतःची उन्नती साधण्याचा उपदेश करतात. रमाबाईंचा 'स्त्रीधर्मनीति'पर उपदेश रूढिग्रस्त, भाबडा नाही. प्रयत्नवादाची आणि विद्याग्रहणाची त्याला जोड आहे.

अमेरिकन मिशनरी **मेरी मिचेल** (१८२७–१९०६) यांची 'ख्रिस्ती स्त्रियांच्या कर्तव्याविषयी निबंध' (१८८४), 'शास्त्रात वर्णिलेल्या स्त्रिया,' भाग १ (१८८८), भाग २ (१८९०) ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. १८९६ च्या सुमारास स्त्रियांना लिहिण्यासाठी उत्तेजन देण्याचा प्रयत्न मासिक 'मनोरंजन', 'सुधारक' यांसारख्या नियतकालिकांनी केला. हा कालखंड स्त्रियांच्या घडणीचा होता. डॉ. आनंदीबाई जोशी, डॉ. रखमाबाई, रमाबाई रानडे यांसारख्या कार्यकर्त्या, कृतिशील स्त्रियांनी प्रसंगोपात्त लेखनही केले. या काळात 'पातिव्रत्य विचार' (अनसूया काळे), 'विधवा दुःख निवेदन' (सीताबाई छत्रे), 'तरुण मुलास पत्र' (कमलाबाई किबे), 'भावी आयुष्य सुखमय करण्याची तरुण पिढीवर असलेली जबाबदारी' (मथुराबाई जोशी) यांसारखे वैचारिक लेखन झालेले आहे.

### १.३.९ ताराबाई शिंदे

ताराबाईंचे वडील बापूजी हरी शिंदे हे बुलढाण्याचे. ते अकौंटंट म्हणून नोकरी करीत होते. म. फुले यांच्या सत्यशोधक समाजाचे ते सभासद होते (पाटील, १९२५ : ५९). ताराबाईंचे वडील डेप्युटी कमिशनरच्या कार्यालयात हेडक्लार्कच्या हुद्द्यावर नोकरीला होते, असे विलास खोले यांनी नोंदविले आहे (खोले, १९९७ : ५८). त्यांचे घराणे पिढीजात श्रीमंत. बुलढाण्यास मोठा वाडा होता. त्यांना चार मुले व ताराबाई या एकच कन्या. त्यांच्या एका मुलाचे नाव मार्तंडराव. स. गं. मालशे यांनी ताराबाईंचा जीवनकाल इ. स. १८५० ते १९१० असा अंदाजे ठरविला आहे. त्यासाठी त्यांनी काही व्यक्तींनी दिलेल्या माहितीचा आधार घेतला आहे (मालशे, १९७५ : प्रस्ता. २,३). ताराबाईंच्या कालनिश्चितीसंदर्भात तत्कालीन विश्वसनीय पुरावे आजपर्यंत उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे मालशे यांनी सुचविलेला काल ढोबळमानाने विचारांत घेण्यास हरकत नाही.

ताराबाईंचा जन्म एका खानदानी मराठा कुटुंबात झाला. त्या त्यांच्या आईवडिलांच्या एकुलत्या एक कन्या. त्यामुळे सर्वांच्या लाडक्या असणे स्वाभाविक होते. त्या जात्याच हुशार, जिज्ञासू होत्या. वडिलांनी त्यांना चांगले शिक्षण दिले. मराठी, इंग्रजी व संस्कृत भाषांवर त्यांचे चांगले प्रभुत्व होते. 'स्त्री-पुरुष तुलना'मध्ये आलेल्या विविध ग्रंथांच्या संदर्भांवरून त्यांचे चौफेर वाचन, बहुश्रुतता, व्यासंग, चिकित्सक दृष्टी, सत्यशोधकीय विचारव्यूह यांचा थक्क करणारा प्रत्यय येतो. समकालीन घटना-घडामोडींचे त्यांना सजग भान होते. त्यावर आपली स्वतंत्र प्रतिक्रिया देण्याची तीव्र संवेदनशीलता त्यांच्या ठायी होती, हे 'विजयालक्ष्मी' प्रकरणानंतर त्यांनी लिहिलेल्या 'स्त्री-पुरुष तुलना' या ग्रंथावरून लक्षात येते.

ताराबाईंचे लग्न बुलढाणा जिल्ह्यातील माकोडी येथील नारायणराव चव्हाण यांच्याशी झाले. ताराबाईंचे लग्न करून बापूजींनी घरजावई आणला, पण ताराबाईंना संसारसुख लाभले नाही. त्यामुळे त्यांच्या आयुष्याची एक प्रकारे शोकांतिका झाली होती. ताराबाई मोठ्या धाडसी व करारी होत्या. त्यांचा मोठा वचक असे. त्या घोड्यावर बसून जात असत. मराठा समाजातील कथित खानदानीपणाच्या, प्रतिष्ठेच्या काही कल्पनांमुळे त्यांच्यावर मर्यादा पडत होत्या. ताराबाई उत्तर आयुष्यात शेती वगैरे पाहात असत (मालशे, १९७५ : २, ३).

ताराबाईंचे कुटुंब सुशिक्षित व पुढारलेले होते. सामाजिक कार्यात त्यांच्या वडिलांबरोबरच चुलतेही अग्रभागी होते. त्यांचे एक चुलते रामचंद्र हरी शिंदे हे जोतीरावांच्या व्यवसायातील भागीदार होते (ओहॅनलन, १९८५ : २४९). रामचंद्र हरी हे कंत्राटे घेत होते, असे य. दि. फडके यांनीही नमूद केले आहे (फडके, १९९८ : २७०). ताराबाईंचे आणखी एक चुलते लक्ष्मण हरी शिंदे हे चीफ पोलीस कॉंस्टेबल होते (कीमाफ, २००६ : २०९). त्यांचे महात्मा फुल्यांकडे सतत जाणेयेणे असे, अशी आठवण तुकाराम हनुमंत पिंजण यांनी सांगितली आहे (पिंजण, १९९३ : ५१). सत्यशोधक समाजातील सभासदांना विरोधकांकडून वेगवेगळ्या प्रकारे त्रास दिला जात असे. डॉ. विश्राम रामजी घोले व लक्ष्मणराव हरी शिंदे हे समाजाचे सभासद होताच विरोधकांचा त्रास बंद झाला, असे सत्यशोधक समाजाच्या पहिल्या दोन वर्षांच्या रिपोर्टमध्ये नमूद केले आहे (कीमाफ, २००६ : २०९, २१०). सत्यशोधक समाजाच्या तिसऱ्या वर्षी लक्ष्मणराव शिंदे हे समाजाचे उपाध्यक्ष होते व रामचंद्रराव शिंदे हे सभासद होते (कीमाफ : २१७). १८७६ साली अहमदाबादला अतिवृष्टीमुळे महापूर आल्याने तेथील पूरग्रस्त लोकांना मदत करण्याचा निर्णय सत्यशोधक समाजाने घेतला. या संदर्भात समाजाचे अध्यक्ष डॉ. विश्राम रामजी घोले यांनी मांडलेल्या सूचनेस रामचंद्रराव शिंदे यांनी अनुमोदन दिले व पुणे सत्यशोधक समाजामार्फत त्या काळी १९५ रुपयांची मदत अहमदाबादच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे पूरग्रस्त सहायता निधीसाठी पाठविण्यात आली (कीमाफ : २१९). सत्यशोधक समाजासाठी १८७५-७६ साली रामचंद्रराव शिंदे यांनी १५ रुपये व लक्ष्मणराव शिंदे यांनी ४ रुपये वर्गणी व बक्षिसापोटी दिल्याची नोंद सत्यशोधक समाजाच्या तिसऱ्या वार्षिक समारंभाच्या अहवालामध्ये आलेली आहे (कीमाफ : २२६, २२७). सत्यशोधक समाजाच्या स्थापनेपासूनच्या पहिल्या तीन वर्षांतील वरील अहवालांमधून दिसून येते की, रामचंद्रराव शिंदे व लक्ष्मणराव शिंदे हे म. फुल्यांचे जवळचे सहकारी व

सत्यशोधक समाजाचे धडाडीचे कार्यकर्ते होते. अशा प्रकारे ताराबाई शिंदे यांचे घराणे सत्यशोधक समाजाशी स्थापनेपासून निगडित होते. त्यामुळे त्यांच्यावर म. फुले व सत्यशोधक विचारांचा मोठा प्रभाव पडला होता.

ताराबाईंनी 'स्त्री-पुरुष तुलना' (१८८२) या निबंधाव्यतिरिक्त काही लेखन केले होते का, याची काहीही माहिती उपलब्ध होत नाही. वयाच्या एकतीस-बत्तिसाव्या वर्षी अत्यंत निर्भयपणे पुरुषप्रधान व्यवस्थेची मूलगामी चिकित्सा करणारे, विचार प्रवर्तक लेखन करणाऱ्या ताराबाईंनी पुढील आयुष्यात काहीच का लिहिले नाही, असे सतत वाटत राहते. त्यांचे इतर काही लेखन काळाच्या उदरात कायमचे नामशेष तर झाले नाही ना, अशी शंका येत राहते. 'स्त्री-पुरुष तुलना' हा ग्रंथ आणि म. फुल्यांनी 'सत्सार २' मध्ये ताराबाईंची केलेली पाठराखण यांव्यतिरिक्त त्यांच्याविषयी अन्य कोणतीच माहिती का उपलब्ध होत नाही? चळवळीतील नेत्यांनी व तत्कालीन अन्य सुधारकांनी, कर्त्या व्यक्तींनी त्यांच्याविषयी काहीच प्रतिक्रिया का दिलेली नाही? त्या सबंध काळाने ताराबाईंच्या लेखनाविषयी, कार्यकर्तृत्वाविषयी मौन का बाळगले आहे? ताराबाईंनीही 'स्त्री-पुरुष तुलना' या निबंधाच्या लेखनापूर्वी व लेखनानंतर तत्कालीन सामाजिक प्रश्नासंदर्भात, विशेषतः स्त्री-प्रश्नासंदर्भात कोणती भूमिका घेतली होती? सत्यशोधक समाजामध्ये त्या सक्रिय होत्या किंवा कसे? त्यांची सामाजिक चळवळीसंदर्भातील भूमिका काय होती? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. परंतु त्यांची वस्तुस्थितीदर्शक उत्तरे मात्र आपणांस मिळत नाहीत.

### १.३.१० म. फुले व ताराबाई शिंदे

म. फुले व त्यांच्या सहकाऱ्यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना पुण्यामध्ये केली. समाजाचा विचार, कार्य हळूहळू पसरत गेले. ताराबाईंचे वडील बापूजी हरी शिंदे हे सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते होते. सत्यशोधक समाजाच्या प्रारंभीच्या सभासदांच्या यादीमध्ये त्यांचे नाव होते, असे म. फुल्यांचे चरित्रकार पंढरीनाथ सिताराम पाठील यांनी नमूद केले आहे (पाटील, २००१:५९). वडिलांच्यामुळे म. फुले, त्यांचे विचार, साहित्य, कार्य यांचा परिचय ताराबाईंना झाला असणे स्वाभाविक आहे. फुल्यांच्या विचारांचा व लेखनाचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता, हे स्त्री-पुरुष तुलनावरून सहजपणे लक्षात येते. विलास खोले यांनी म. फुले आणि ताराबाई शिंदे यांच्या लेखनातील साम्याची तुलना करणारी अनेक उदाहरणे दिली आहेत (खोले, १९९७ : ६०-६३).

म. फुले यांनी 'सत्सार' (अंक २, ऑक्टोबर १८८५) या नियतकालिकामध्ये ताराबाई शिंदे व पंडिता रमाबाई यांच्यावर टीका करणाऱ्यांचा परखड समाचार घेतला आहे. म. फुल्यांचे एक सहकारी व 'दीनबंधु' या पत्राचे संस्थापक संपादक कृष्णराव पांडुरंग भालेकर (१८५०-१९१०) यांनी ताराबाई शिंदे यांच्यावर टीका केलेली होती. भालेकरांनी ताराबाईंच्यावर कोणती टीका केली व ती का केली, या संदर्भात कोणतीही माहिती उपलब्ध होत नाही, परंतु 'सत्सार'च्या अंकामध्ये म. फुल्यांनी भालेकरांचा सूचकपणे व शेवटी थेट नामनिर्देश केला आहे (कीमाफ : ३८५, ३८९, ३९५, ३९६). यावरून भालेकरांनी

ताराबाईंच्यावर काही एक अप्रस्तुत टीका केली होती व फुल्यांनी त्या संदर्भात भालेकरांचा कोणताही मुलाहिजा न ठेवता परखड समाचार घेतला, हे निःसंदिग्धपणे दिसून येते.

'सत्सार'च्या प्रारंभीच 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ, उदरी नऊ महिने ओझें वागविणाऱ्या स्त्रीजातीवर गुरगुरणारा उपटसुळ' अशा शेलक्या व मर्मावर घाव घालणाऱ्या शब्दांत फुल्यांनी भालेकरांना फटकारले आहे. पुढे आर्यावृत्तामध्ये फुले लिहितात, ''*स्त्रीपासुनि उपजुनियां त्यांची जातीच निंदसील जरी। उपटावे कान तुझे त्वन्मातेनेचिं व्यर्थ इतर करी।*'' स्त्रीपासून जन्म घेऊन स्त्रियांचीच निंदा करणाऱ्या पुरुषांची 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ', 'उपटसूळ' अशा कठोर शब्दांत फुल्यांनी निंदा केली आहे. पुढे दिंडी वृत्तामध्ये ते लिहितात, *'पत्रकर्ते हो बंधु अनाथांचे। मिरवितां कीं ऐसेचिं ब्रीद साचे।।१।। शूद्र जैसा तैशीच स्त्रीहि दीन। शस्त्र धरिती त्याचे त्यांवरी बुद्धिहीन।।२।।निराधारें बा व्यर्थ निंदण्यांत। स्पष्ट मत्सर हा दीसती जगांत।।३।।असति कांहीं स्वोक्तीस जीं प्रमाणें। भीड सोडोनी जगापुढे नेणें।।४।।निंदकाचे वंचि भाव धरुनि नोहे। श्लाघ्य कुलिला मलिनाच हेत साहें।।५।।ताराबाई पंडिता रमा यांस। जति दादा वैभवें शिकविण्यास।।६।।स्वस्त्रियांतें जरि ज्ञान दिलें होय। रमा तारेशीं तरिच शिकवुं जाय।।७।।* या कवणांमध्ये फुल्यांनी स्त्रीनिंदकांचा धिक्कार करून रमाबाई व ताराबाईंची पाठराखण केली आहे. '*पत्रकर्ते हो बंधु अनाथांचे। मिरवितां की ऐसेचि ब्रीद साचे।*' यांमधील पत्राचा उल्लेख 'दीनबंधु'शी निगडित आहे. यावरून 'जोतीरावांच्या खरमरीत टीकेचा रोख 'दीनबंधु'कर्ते नारायण मेघाजी लोखंडे आणि कृष्णाजी पांडुरंग भालेकर या सहकाऱ्यांवर आहे', असे य. दि. फडके यांनी म्हटले आहे (कीमाफ, २००६ : ३७९). परंतु लोखंड्यांनी ताराबाईंच्यावर टीका केल्याचा उल्लेख सापडत नाही. त्यावरून फुल्यांचा रोख भालेकरांच्यावर आहे, हे स्पष्ट होते.

ताराबाईंच्या लेखनाचा गौरव करताना फुले लिहितात, ''ताराबाई शिंदे मुक्काम, बुलढाणे, प्रांत वऱ्हाड यांनी 'स्त्री पुरुष तुलना' या नावाच्या पुस्तकांत बहुतेक भर्ते आपल्या स्त्रियांसमक्ष पाहिजेल त्या चावचेष्टा करून नीच कर्मे आचरू लागल्यामुळें, कित्येक कुलीन पतिव्रता स्त्रियांस अतिशय विषम वाटून, त्या अज्ञानी व निर्बळ असल्यामुळें अमर्याद कोपातें पावून, त्यांचे मनात दुष्कर्मरूपी समुद्राच्या अतिभयंकर लाटा उद्‌भवतात, त्यांचे निवारण व्हावे या प्रीत्यर्थ त्यांनी पुरुष मंडळास अतिउत्तम बोध केला, तो 'जिस तन लागे वहि तन जाने, बिजा क्या जाने गव्हारा रे' या प्रसिद्ध कवनाप्रमाणे थोडासा खरमरीत आहे.'' (कीमाफ, २००६ : ३८७). ताराबाईंच्या लेखनाचा उद्देश व त्यांची भाषाशैली यांवर फुल्यांनी नेमके भाष्य केले आहे.

ताराबाईंचे पुस्तक ज्यांना रुचले नाही, त्यांनी पुस्तकाचे खंडन करू लागल्यास त्यांतील सर्व दोषांचे घोंगडे आपल्याच गळ्यात पडेल या भयास्तव 'त्या पुस्तकातील एकंदर सर्व बोधाचा धिक्कार करून' 'ताराबाईंचीच निंदा करून तिचे उपकार फेडले' असे फुले उपहासाने म्हणतात. पंडिता रमाबाई व ताराबाईंची निंदानालस्ती करणाऱ्यांना फुले सुनावतात की, ''अरे, या स्त्रियांबरोबर हुंबर घालणाऱ्याने पंडिता रमाबाईंचे नावसुद्धा घ्यावयाचे नव्हतें, कारण याची समजूत तरी किती? याला स्वतः चि. ताराबाईसारखे शिस्तवार असून मार्मिक लिहिता तरी येते काय?'' फुल्यांनी 'चि. ताराबाई' अशा केलेल्या उल्लेखावरून त्यांचे

कौटुंबिक स्नेहबंध होते, हे दिसून येते. ताराबाईंचा पक्ष घेऊन पुढे फुल्यांनी भालेकरांवर व्यक्तिगत टीका केली आहे (कित्ता : ३८८, ३८९, ३९५, ३९६).

ताराबाईंनी स्त्री–पुरुषांच्या गुणदोषांची तुलना आपल्या निबंधामध्ये केली आहे. या संदर्भात फुल्यांचे व ताराबाईंचे विचार एकसारखे आहेत. ताराबाईंच्या लेखनाच्या अनुषंगाने फुल्यांनी व्यक्त केलेले काही विचार येथे उद्धृत केले आहेत. 'सर्व प्रकारचे साहसादि दुर्गुण स्त्रियांचेच अंगी वसतात' या काही लोकांच्या पारंपरिक मतांचे खंडन करताना फुले म्हणतात, ''सारासार विचार करून पाहिल्याबरोबर स्त्रियांपेक्षा पुरुषच अधिक पक्षपाती, दगेबाज, ठक, साहसी, क्रूर व नित्य नवीन ज्यास्ती भयंकर, धाडसी, दुष्ट कर्मे आचरणारे आहेत.'' आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ फुल्यांनी अनेक दाखले दिले आहेत. धर्मग्रंथ व शास्त्रपुराणांचे कर्ते हे पुरुषच होते. त्यांच्या पक्षपातीपणावर हल्ला करताना फुले लिहितात, ''या पक्षपाती आर्य ग्रंथकारांचे घ्यावयाचे माप एक आणि द्यावयाचे माप एक.'' येथे म. फुले व ताराबाई शिंदे यांचे विचारसाम्य प्रकर्षाने दिसून येते. म. फुल्यांच्या विचारांचा व शैलींचा ताराबाईंच्यावर किती खोलवर प्रभाव पडलेला होता, हे 'स्त्रीपुरुष तुलना' या निबंधामध्ये दिसून येते.

### १.३.११ 'स्त्रीपुरुष तुलना' निबंध लेखनाचे प्रयोजन

ताराबाई शिंदे यांनी 'स्त्रीपुरुष तुलना अथवा स्त्रिया व पुरुष यांत साहसी कोण हे स्पष्ट करून दाखविण्याकरिता निबंध' रचून श्री शिवाजी छापखाना पुणे येथे छापून सन १८८२ साली प्रसिद्ध केला. या निबंधाची किंमत ९ आणे होती व त्यामध्ये ४९ पृष्ठे होती. या निबंधाच्या प्रस्तावनेमध्ये आपल्या लेखनाचे प्रयोजन विशद करताना ताराबाई लिहितात, ''ज्या परमेश्वराने ही आश्चर्यकारक सृष्टि उत्पन्न केली, त्यानेच स्त्रीपुरुष निर्माण केले. तरी सर्व प्रकारचे साहास दुर्गुण स्त्रियांचेच अंगी वसतात किंवा जे अवगुण स्त्रियांचे अंगी आहेत, तेच पुरुषांत आहेत किंवा नाहीत, हे अगदी स्पष्ट करून दाखवावे याच हेतूने हा लहानसा निबंध मी माझ्या सर्व देशभगिनींचा अभिमान धरून रचिला आहे. यांत अमुकच जाती किंवा कुळ याकडे माझे मुळींच लक्ष नाही. स्त्री–पुरुषाची तुलना आहे.''

स्त्री आणि पुरुष हे मानव म्हणून मूलतः समान असताना लिंगभेदावरून त्यांच्यात भेदभाव, श्रेष्ठ–कनिष्ठता निर्माण करणाऱ्या घटकांची चिकित्सा करण्याच्या हेतूने व स्त्री–पुरुषांमध्ये समानच गुणदोष वसत असल्याने ते माणूस म्हणून सर्व मानवी हक्कांचा उपभोग घेण्याचे समान अधिकारी असल्याचे सिद्ध करण्याच्या हेतूने ताराबाईंनी हा निबंध लिहिला आहे. यांमधील 'माझ्या सर्व देशभगिनींचा अभिमान' हे शब्द अत्यंत महत्त्वाचे आहेत. ताराबाईंनी स्त्रियांची जातिधर्मावरून, कुळावरून, पंथ, प्रदेशावरून वगैरे केली जाणारी सर्व प्रकारची कृत्रिम विभागणी नाकारली आहे व देशातील सर्व 'स्त्रीजातीं'विषयी अभिमान व भगिनीभाव यांचा उच्चरवाने पुरस्कार केला आहे. सबंध स्त्री जातीची एकता, अस्मिता केंद्रीभूत करून त्यांनी पुरुषप्रधान व्यवस्थेला चिकित्सेच्या कक्षेत आणले आहे. त्या काळाच्या पार्श्वभूमीवर विचार करता ताराबाईंचा हा स्त्रीवादी दृष्टिकोन अत्यंत प्रगत, आधुनिक ठरतो.

ताराबाईंनी स्वतःचा उल्लेख ‘मऱ्हाटमोळ्याचे अटकेंतली गृहबंदीशाळेंतील मतिहीन अबला’ असा केला आहे. अर्थात एका परीने त्यांनी तत्कालीन स्त्रीजीवनाचे प्रातिनिधिक वर्णन केले आहे. ब्राह्मणापासून तळातील गरीब कष्टकरी वर्गातील स्त्रियांची स्थिती ‘गृहबंदीशाळेतील अबला’ अशीच होती. ताराबाई त्या सर्वांचा विद्रोही आवाज झाल्या. ‘‘रोज पुरुषांचे साहस, धाडस व दगाबाजीचे नित्य नवी भयंकर उदाहरणे दिसून येत असतांही तिकडे कोणीच लक्ष न देतां स्त्रियांवरच सर्व दोषांची गोणी लादतात, हे पाहून स्त्रीजात्याभिमानाने’ त्यांचे ‘मन खळबळून तळतळून गेले.’ त्यामुळे त्यांना ‘निर्भिड होऊन खडखडीत लिहिल्यावांचून राहवेना.’ म्हणून त्यांनी कोणाचीही भीडभाड न ठेवता ‘तुका म्हणे सत्य सांगो। येतील रागे येवोत ते।’ या बाणेदारपणाने त्यांच्या खास भाषाशैलीत हे लेखन केले.

आपल्या लेखनाच्या सत्यतेची निःपक्षपातीपणे चिकित्सा करावी, असे ताराबाईंचे म्हणणे होते. त्या लिहितात, ‘‘या माझ्या निबंधास लक्ष लावून वाचा किंवा याकडे अलक्ष्य करू नका किंवा याला कांही आश्रय द्या अशीसुद्धा मी तुम्हांस विनंति वगैरे कांही करीत नाही. फक्त इतकेंच विचारते की, माझें म्हणणें बरोबर आहे किंवा नाहीं हे तुम्हीं जर खरें निःपक्षपाती असाल तर पुर्ता विचार करून यांत जें काही कमी जास्त असेल ते निवडा. पण येऱ्हवी आपलीच वाणी राखण्याकरितां जर पुढे घोडें ढकलाल तर मात्र नाइलाज आहे. तरी मी सर्वदा स्वजातिकल्याणार्थ झटून त्यांचे मनांत सदाचाराचें बिजारोपण करीनच करीन.’’ आपले लेखन पुरुषांनी सहृदयतेने वाचावे, त्याकडे सहानुभूतीने पहावे अशा प्रकारची कोणतीही अपेक्षा ताराबाई व्यक्त करीत नाही. त्या थेट पुरुषांच्या निःपक्षपातीपणाला, सद्सद्विवेकबुद्धीला आव्हान देतात व तटस्थपणे, सत्याला सामोर जाऊन कमी जास्त निवडा, असे आवाहन करतात. पुरुषांनी सत्याकडे पाठ फिरवून आपलेच घोडे पुढे दामटविण्याचा प्रयत्न केला तरीही ‘सर्वदा स्वजाति कल्याणार्थ झटण्याचा’ अढळ निर्धार त्या व्यक्त करतात. यातून त्यांच्या करारी, मानी व्यक्तिमत्त्वाचे प्रखर दर्शन घडते. आपले अनुभव, विचार, लेखन यांच्यावरील विश्वास व स्त्रीजातीविषयी बांधिलकी या गुणांच्या बळावर त्या थेट पुरुषी अधिसत्तेच्या विवेकाला जाहीर आवाहन करतात. कोणत्याही लेखकांकडे आपल्या लेखनाप्रतीची जी नैतिकता असावी लागते, ती ताराबाईंच्या ठायी दिसते. पुरुषांचा, वाचकांचा कोणताही प्रकारचा अनुनय न करता त्या आपल्या लेखनाचा सत्यासत्यतेच्या कसोट्यांवर निवाडा व्हावा असा जाहीर आग्रह धरतात.

## १.४ समारोप

वैचारिक साहित्यामध्ये विचार केंद्रस्थानी असतो. विचार प्रकटीकरणाची एक शैली असते. तर्कशुद्धता, सूत्रबद्धता, चिकित्सकता, खंडनमंडन, मूल्यात्मकता, चिंतनशीलता, साधार ससंदर्भ विवेचन, विश्लेषकता, बुद्धिनिष्ठता, शास्त्रीयता, आवाहकता, वैज्ञानिक दृष्टिकोन, कार्यकारणभावात्मकता, विचारसंपृक्तता, मूल्यनिर्णयन ही वैचारिक वाङ्मयाची काही वैशिष्ट्ये आहेत. वैचारिक साहित्य हे आधुनिक नागरी समाजाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. वैचारिक साहित्यामुळे समाजामध्ये चिकित्सा, विवेकशीलता वाढते आणि अचूक विचार करण्याची सवय लागते. विशिष्ट समाजाची स्थिती व वैचारिक उंची तेथील वैचारिक साहित्यावरून ओळखता येते. मराठी वैचारिक साहित्याच्या अभ्यासातून मराठी जनसमूहांचे विचारविश्व व

मराठी गद्यशैली यांचे आकलन होते. वैचारिक साहित्यामध्ये समकालीन मराठी जनसमूहांच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक, वाङ्मयीन, शैक्षणिक आदी जाणिवांचे, धारणांचे, मतमतांतरांचे प्रतिबिंब पडलेले दिसते.

ताराबाई शिंदे या आधुनिक भारतातील एक महत्त्वाच्या स्त्रीवादी लेखिका आहेत. भारतीय समाजातील स्त्रियांचा धार्मिक व सामाजिक दर्जा, एकोणिसाव्या शतकामध्ये ब्रिटिश वासाहतिक सत्तेचे भारतातील विविध क्षेत्रांवर झालेले परिणाम, हिंदू धर्मातील जातिव्यवस्था, रूढिपरंपरा, सुधारणा चळवळी, म. फुले व सत्यशोधक समाजाचे कार्य, सुधारक व सनातनी यांच्यामध्ये विविध पातळ्यांवर झालेले संघर्ष, स्त्रीसुधारणेचा ऐरणीवर आलेला प्रश्न व त्यांवरील अनुकूल-प्रतिकूल प्रतिसाद, बहुजन समाजातील स्थितिशीलता, निरक्षरता यांसारख्या अनेक बाबींच्या पार्श्वभूमीवर ताराबाईचे व्यक्तिमत्त्व व लेखन समजून घेतले पाहिजे.

## १.५ स्वयंअध्ययनासाठीचे प्रश्न

### १.५.१ वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न

१. वैचारिक साहित्याचा मुख्य भाग कोणता असतो?
अ. भावना ब. विचार क. कल्पना ड. लालित्य

२. सिमॉन दि बोव्हार यांनी कोणत्या ग्रंथामध्ये स्त्रीवादाची सैद्धांतिक मांडणी केली आहे?
अ. द सेकंड सेक्स ब. ऑल मेन आर मर्टल
क. सेक्शुअल पॉलिटिक्स ड. द सब्जेक्शन ऑफ वुमेन

३. मुक्ता साळवे यांनी कोणता निबंध लिहिला?
अ. स्त्री पुरुष तुलना ब. मांग महारांच्या दुःखाविषयी निबंध
क. ब्राह्मणांचे कसब ड. विटाळ विध्वंसन

४. ताराबाई शिंदे यांच्या वडिलांचे नाव काय होते?
अ. रामचंद्र हरी शिंदे ब. बापूजी हरी शिंदे क. नारायण हरी शिंदे ड. लक्ष्मण हरी शिंदे

५. म. फुले यांनी कोणत्या नियतकालिकामध्ये ताराबाई शिंदे यांची पाठराखण केली?
अ. दीनबंधु ब. दीनमित्र क. सत्सार ड. कैवारी

**उत्तरे** १. विचार २. द सेकंड सेक्स ३. मांग महारांच्या दुःखाविषयी ४. बापूजी हरी शिंदे ५. सत्सार

### १.५.२ दीर्घोत्तरी प्रश्न

१. वैचारिक साहित्याचे स्वरूप व महत्त्व सांगा.
२. वैचारिक साहित्याच्या प्रेरणा व वैशिष्ट्ये सांगा.
३. ताराबाई शिंदे यांचे व्यक्तिमत्त्व व लेखनप्रेरणा सविस्तर विशद करा.
४. स्त्रीवादी व स्त्रीवादी साहित्याची संकल्पना व स्वरूप स्पष्ट करा.

### १.५.३ लघुत्तरी प्रश्न

१. वैचारिक साहित्य म्हणजे काय, ते लिहा.
२. वैचारिक साहित्याच्या प्रेरणा सांगा.
३. वैचारिक साहित्याचे इतर वाङ्मयप्रकारांहून वेगळेपण सांगा.
४. निबंध म्हणजे काय?
५. 'स्त्री-पुरुष तुलना' या निबंधलेखनाचे प्रयोजन विशद करा.
६. एकोणिसाव्या शतकातील स्त्रियांच्या लेखनाचा थोडक्यात आढावा घ्या.
७. स्त्रीवादी साहित्याची संकल्पना व स्वरूप सांगा.

### १.५.४ टीपा लिहा.

१. वैचारिक साहित्य व ललित साहित्य
२. म. फुले व ताराबाई शिंदे
३. 'स्त्री-पुरुष तुलना' ची लेखनप्रेरणा
४. स्त्रीवादी साहित्य

## १.६ संदर्भ ग्रंथ

१. भेलके सुभाषचंद्र, बेलसरे वैजयंती, धोंडगे दिलीप : प्रबोधनपर साहित्य : स्वरूप आणि संकल्पना, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००२
२. मोरे सदानंद, लिंबाळे शरणकुमार : प्रबोधनपर वैचारिक वाङ्मय, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००३.
३. जोग रा. श्री. (संपा) : मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड चौथा, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, दुसरी आवृत्ती, १९७३.
४. राजाध्यक्ष विजया व इतर (संपा.) : मराठी वाङ्मयकोश, खंड चौथा, समीक्षा-संज्ञा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.
५. रेगे मे. पुं. व इतर : मराठी विचारवंत आणि आपण, मौज प्रकाशन गृह मुंबई, १९६९.
६. साळुंखे आ. ह. : धर्म की धर्मापलीकडे?, लोकायत प्रकाशन, सातारा,२००४.
७. सरदार गं. बा : अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका, (१८००-१८७४), मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे १९७१
८. पाटील शरद : अब्राह्मणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र, सुगावा प्रकाशन, पुणे

## १.७ क्षेत्रीय कार्य

महात्मा जोतीराव फुले यांच्या साहित्यातील मूल्यविचारांचा अभ्यास करा.

# घटक २

# ‘स्त्री–पुरुष तुलना’मधील आशयसूत्रे

## २.१ उद्दिष्टे

या घटकाच्या अध्ययनानंतर विद्यार्थ्यांना,

१. ‘स्त्री–पुरुष तुलना’ या निबंधामधील आशयसूत्रे सांगता येतील.

२. ताराबाई शिंदे यांनी केलेली चिकित्सा व तिचे वेगळेपण सांगता येईल.

३. ‘स्त्री–पुरुष तुलना’ या निबंधाचे परीक्षण, विश्लेषण करता येईल.

४. वर्तमान व्यवस्थेची चिकित्सा करण्याची विचारदृष्टी प्राप्त होईल.

## २.२ प्रास्ताविक

ताराबाई शिंदे यांचा ‘स्त्री–पुरुष तुलना’ (१८८२) हा छोटेखानी निबंध पुरुषप्रधान समाजव्यवस्थेचे स्त्रीवादी पुनर्वाचन करण्याची दृष्टी देणारा अत्यंत महत्त्वाचा निबंध आहे. म. फुले, सत्यशोधक समाज, इंग्रजी राजवटीमुळे झालेले काही बदल, शिक्षण, नवविचार, नवसुधारणा वगैरेंचा प्रभाव ताराबाईंच्यावर होता. त्यांचा व्यासंग, चिकित्सक दृष्टी, निरीक्षण, समकालीन घडामोडींचे आकलन, तार्किक विश्लेषण क्षमता, निर्भीडता, स्पष्टवक्तेपणा अशा अनेक गुणवैशिष्ट्यांमुळे त्यांच्या विचारांना व लेखनाला एक मूलगामी तात्त्विकता प्राप्त झाली आहे. भारतीय धर्मव्यवस्थेची, समाजव्यवस्थेची, पुरुषी अधिसत्तेची, शास्त्र–महाकाव्ये–पुराणे–साहित्य आदी वाङ्मयाचे स्त्रीवादी भूमिकेतून पुनर्वाचन, व पुनर्मांडणी करणारे आधुनिक भारतातील हे पहिले पुस्तक आहे. महाराष्ट्राबरोबरच भारतातील स्त्रीवादी विचारांची पायाभरणी या पुस्तकाने केली आहे. म्हणून या पुस्तकातील आशय, विचार प्रतिपादन समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

## २.३ विषय विवेचन

ताराबाई शिंदे यांनी ‘स्त्री–पुरुष तुलना’मध्ये स्त्रियांचे शोषण व गुलामगिरी यांची मूलगामी मीमांसा केलेली आहे. स्त्री जीवनाशी निगडित विविध प्रश्नांची ऐतिहासिक, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन अशा विविध बाजूंनी चिकित्सा केली आहे. त्यांनी अत्यंत सूत्रबद्धपणे, तर्कशुद्ध रीतीने, निर्भय व निर्भीडपणे परखड व नेमक्या शब्दांत पुरुषप्रधान व्यवस्थेला प्रश्न विचारले आहेत. स्त्रीचे अधिकार व पुरुषांचे अधिकार यांच्यात भेद करणाऱ्या मूल्यव्यवस्थेला त्यांनी आव्हान दिले आहे.

स्त्रिया सदा गृहवासात. चुलीपासून ते दाराच्या उंबऱ्यापर्यंत काय ते त्यांचे ज्ञान. अशी त्या काळातील स्त्रियांची स्थिती ताराबाईंनी वर्णन केलेली आहे. स्त्रीधर्माच्या पारंपरिक पगड्याने स्त्रियांना

गुलामगिरीत लोटले. स्त्रीधर्म म्हणजे काय? ताराबाई लिहितात, ''निरंतर पतीची आज्ञा पाळणे, त्याचे मर्जीप्रमाणे वागणे, त्यांनी लाथा मारिल्या, शिव्या दिल्या, दुसऱ्या रांडा ठेविल्या, नवरुजी दारू पिऊन, जुवा खेळून, कफलक होऊन, शंख करीत, चोरी करून, कोणाचा प्राण घेऊन, फितूर, चाहाडी, खजिना लुटून, लांच खाऊन जरी घरी आले तरी, स्त्रियांनी आपले हे कोणी जसे काही कृष्ण महाराजच गौळ्यांचे दहीदूध चोरून चंद्रावळीला कलंक लावून आलेत; असे समजून परमात्म्यासारखीच यांची मोठ्या हासतमुखानें देवासारखी पूजा करावी, सेवेंत, हजर राहावें, हा स्त्रीधर्म'' (खोले, १९९७ : ८३). बदलत्या काळानुसार स्त्री-पुरुष, पती-पत्नी नातेसंबंधात बदल होत आहेत, स्त्रिया पुरुषांच्या गुलामगिरीतून बाहेर पडून बरोबरच्या नात्याने व्यवहार करण्याचा प्रयत्न करीत आहेत, याचे काही समकालीन दाखलेली ताराबाईंनी दिले आहेत.

हिंदू धर्मग्रंथामध्ये पातिव्रत्याच्या कल्पनेचे उदात्तीकरण करण्यात आले. धर्मतत्त्वांचा प्रभाव समाजमनावर असल्याने सामाजिक व्यवहारातही पातिव्रत्य, पतिव्रता आदी कल्पनांचे अवाजवी स्तोम वाढविले गेले. पातिव्रत्यात पतिनिष्ठा केंद्रवर्ती होती. पती हाच स्वामी, देव, सर्वस्व. त्यामुळे आपोआपच पत्नीकडे दास्यत्व आले. पत्नीचे स्वतंत्र अस्तित्व उरले नाही. तिचे सर्व प्रकारचे स्वातंत्र्य नष्ट झाले. पातिव्रत्याची संकल्पना ही निवळ पुरुषकेंद्री असून स्त्रीच्या शोषणाचा व गुलामगिरीचा पाया आहे, हे ताराबाईंनी ओळखले होते. पातिव्रत्याचा आग्रह धरणाऱ्या पुरुषवर्गाला त्या विचारतात, ''स्त्रियांचे हातून मोठा अविचार कोणता तर परद्वार हेच काय ते मेरूचे शिखर व याचे पायीच त्यांचे हातून अविचार होतो. पण जी परद्वार करते, तिच्या मनांत ही दुष्ट वासना उत्पन्न करण्यास आधीं पुढें पाऊल कोण टाकतो बरे? ती किंवा तुम्ही? स्त्री कितीही निर्लज्ज असली तरी ती होऊन कधी परपुरुषाचे गळ्यात पडणार नाही'' (कित्ता : १०७). पातिव्रत्याच्या एकतर्फी कल्पनेवर ताराबाईंनी हल्ला चढविला आहे. ''जर बायकोला नवराच देव तर नवऱ्याची वागणूकदेखील देवाप्रमाणेच पाहिजे. नवरा कसाही दुर्गुणी असला तरी त्याला देवाप्रमाणेच मानून कोण वागेल बरे?'' असे त्यांनी रोखठोकपणे बजावले आहे. नवऱ्यांनी पत्नीचे सुखदुःख जाणून त्यांच्यावर ममता ठेवावी, अशी समतेची भूमिका त्यांनी घेतली आहे.

द्रौपदी, अहिल्या, कुंती, तारा, सीता, मंदोदरी या पतिव्रतांची चिकित्सा त्यांनी केली आहे. कथित देवदेवतांच्या व पतिव्रतांच्या वर्तनव्यवहारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करून त्यांचे माहात्म्य निकालात काढले आहे. तारा ही वालीची बायको. रामाने वालीस मारून ताराचे लग्न सुग्रीवाबरोबर लावून दिले. धाकटा दीर हा मुलासारखा. पण तेंव्हा रामाने सांगितले की, तू धाकट्या दिराबरोबर पुनर्विवाह केलास तरी तुझे नावे पतिव्रतेमध्येच गणले जाईल. हे इतके झाले तरी, ''स्वामींनी लेखणीचे दोन टांक आधीक मारिले कीं, देवांनी केले त्याला कांही हरकत नाही, मानवाने तसे करू नयें, पण स्वामीला तेव्हां येवढे कसे नाही कळलें की, हा कित्ता पुढें सारे अगदी वळणशुद्ध वळवितील...'' (कित्ता : ८६). श्रीधरस्वामी नाझरेकरांची पुरुषी मानसिकता ताराबाईंनी उघडी पाडली आहे.

सती सावित्री कथेची परखड चिकित्सा करून ताराबाईंनी समस्त पुरुष वर्गाला काही मूलभूत प्रश्न विचारले आहेत. ''स्त्री जातीत सावित्री तरी आपले पतीचा प्राण परत आणण्याकरितां यमदरबारात जाऊन

आली. पण पुरुषांमध्ये कोणी तरी आपले बायकोचे प्राणाकरितां यमराजाचे दरबारात तर नाहींच पण उगींच त्या दरबाराचे वाटेवर तरी गेलेला कोठे ऐकण्यांत आला आहे काय? तर जसें एकदा सौभाग्य गेलें म्हणजे स्त्रियांनी आपलीं तोंडें अगदीं एखाद्या महान खुन्यापेक्षांही महाजबर अपराध्याप्रमाणें काळीं करून सर्व आयुष्यभर आंधारकोठडींत राहावें, त्याप्रमाणें तुमच्या बायका मेल्या म्हणजे तुम्हीही आपलें तोंड काळें करून दाढ्या मिशा भादरून यावत् जन्मपर्यंत कोठेंही अरण्यवासांत कां राहू नये बरें? एक बायको मेली कीं तिचे दहावें दिवशींच तुम्ही दुसरी करून आणावी. असा तुम्हाला कोणत्या शहाण्या देवानें दाखला दिला आहे तो दाखवा बरें. जशी स्त्री तसेच पुरुष'' (कित्ता : ९२, ९३).

तत्कालीन खानदानी मराठा समाजातील पडदा पद्धतीवरही ताराबाईंनी टीका केली आहे. स्त्री-पुरुषांना परस्परांपासून दूर ठेवण्याचे पडदा हे एक साधन आहे. तसेच स्त्रीला अदृश्य करण्याचेही एक माध्यम आहे. 'मी निरंतर मऱ्हाटमोळ्याचे अटकेतील गृहशाळेतील मतिहीन अबला' असे ताराबाईंनी स्वतःचे वर्णन केले आहे. स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व अमान्य करून तिचा वस्तुवत विचार करण्याच्या प्रवृत्तीवर ताराबाईंनी कठोर हल्ला चढविला आहे. त्या विचारतात, ''तुम्हाला पैशाचे बळाने बायको म्हणजे काय माल असे वाटते. जसा एखादा गडी, चार रुपये दरमहा देऊन स्वयंपाक करण्याकरितां अगर घर सांभाळण्याकरितां ठेवावाच लागतो की नाही! त्याप्रमाणे एकदाच हजारबाराशें खर्चून ही एक सत्तेचीच बटीक विकत घेतली असे तुम्हास वाटू लागते'' (कित्ता : ११२, ११३). स्त्रीच्या गुलामगिरीचे व सत्ताविहीनतेचे दुःख ताराबाईंनी जगाच्या वेशीवर टांगले आहे. ''स्त्रियांना एक शब्द बोलण्याची, अगर चिमटीभर दाण्याची सत्ता नसावी काय रे?'' (कित्ता : १०३) असा प्रश्न त्यांनी सबंध व्यवस्थेला केलेला आहे.

विवाह ही स्त्रीजीवनातील सर्वांत महत्त्वाचे स्थित्यंतर घडविणारी महत्त्वाची घटना असते, याचे ताराबाईंना नेमके भान होते. विवाहप्रसंगी स्त्रीच्या भावभावनांचा व भवितव्यांचा कोणताही विचार न करता केवळ पुरुषांच्या मर्जीने लग्ने लावून दिली जात. विवाहाच्या प्रसंगी अनेक बापांचे वर्णन कसे असे, याचे वर्णन ताराबाईंनी केले आहे. यातून त्या काळातील विवाहाच्या चार पद्धती समोर येतात. एक, ''कित्येक बाप आपल्या नक्षत्रासारख्या दहा अकरा वर्षांच्या मुली ऐंशी नव्वद वर्षाचे श्रीमंत म्हाताऱ्यास रुपयांची थैली घेऊन व त्याचे श्रीमंतीवर नजर देऊन, ''नवरा मेला तरी चिंता नाही, इला पैशाला तर काही कमी नाही ना दोन दिवस खाईल, पिईल, लेईल, नेसेल. एक नवरा नसला तर काय चिंता आहे?'' असे म्हणून वाघाला जशी बकरी द्यावी तसे त्याप्रमाणे बेधडक देतात'' (कित्ता : १०९). म्हातारा नवरा मेला म्हणजे ''तरुणपणाचे प्रज्वलीत इंगळ पदरात वागवून दिवस'' (कित्ता : १०९) कशा प्रकारे काढायचे असा जळजळीतप्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. दुसरे, 'सवतीवर मुली देतात', तिसरे, ''कोणाला लेकी फार असल्यामुळे आल्या वरास देतो. मग तो कसा का असेना! कोठे नवरा कुरूप, दुर्गुणी, हीनवट व अतिशय जाच, हाणमार, फार जप्ती, खाण्या-पिण्याचेही हाल अशा अनेक अपेष्टा करणारा असला, तरी त्याच्या स्वाधीन कसाबाच्या हाती गायीप्रमाणे कोणी आपल्या मुली करितात'' (कित्ता : ११०). चौथे, ''कित्येक श्रीमंत गृहस्थ आपल्या लाडक्या लेकीचे फक्त लाडांकरितां व आवडीकरितां एखादे गरिबाचे मुलाबरोबर लग्न करून ते जोडपे

जवळच बाळगतात'' (कित्ता : १११, ११२). पुढे ते उभयता सज्ञान झाल्यावर त्यांना परस्परांच्या भिन्न स्वभावाची, भिन्न विचारांची, भिन्न आवडीनिवडींची जाणीव होते. तेव्हा ''ते केवळ शालजोडीला रकट्याचे ठिगळ याप्रमाणे होऊन पुढे जे प्रकार होणे ते होतात... रोज जे जे धिंडवडे होतात ते ते दृष्टीस पडतातच'' (कित्ता : ११२). विधवेला पुनर्विवाहास बंदी आणि पुरुषांना मात्र ''एकीपासून पांचशे बायका करण्याची परवानगी'' (कित्ता : ९५) या विरोधाचा ताराबाईंनी जबरदस्त उपहास केला आहे. विवाहासंदर्भातील ताराबाईंच्या मतांवर विलास खोले यांनी महत्त्वपूर्ण भाष्य केले आहे. ते म्हणतात, ''पतिपत्नीचे नाते हे एक सामाजिक नाते आहे. ते काही निसर्गनिर्मित नाते नाही, तर एक सामाजिक रचित (सोशल कन्स्ट्रक्ट) आहे. या असमान सामाजिक नातेसंबंधातील शोषणाकडे ताराबाईंनी लक्ष वेधले आहे. लग्नाचे वेळी परिस्थितीवशात पत्नी म्हणून स्वीकारलेली स्त्री पुरुषाला नकोशी वाटली, तर त्याच्या मनात दुसऱ्या विवाहाची अभिलाषा जागृत होते आणि तो ती पुरी करतोही. परंतु, असे स्वातंत्र्य स्त्रीला नसते. ताराबाई म्हणतात, ''तुम्हाला जशी वाईट, कुरुप, दुर्गुणी, घाणेरी, गावंढळ बायको आवडत नाही, तसा बायकोला तरी या मासल्याचा नवरा आवडेल का?'' येथे स्त्री पुरुष नात्यातील असमतोलाकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. ज्या काळात पुरुष सुधारक स्त्रियांच्या दुःस्थितीविषयी केवळ सहानुभूतीने विचारच करीत होते, त्या काळात एका स्त्रीने पुरुषांच्या वर्चस्वालाच आव्हान देणे ही केवढी क्रांतिकारक घटना म्हणावी लागेल'' (कित्ता : ३६). वैधव्याच्या मुळाशी असणाऱ्या समाजधारणा, पुरुषी मानसिकता, त्यांना असणारा शास्त्रग्रंथांचा आधार, अमानुष विवाहपद्धती यांची परखड चिकित्सा करून त्यामुळे स्त्रियांच्या वाट्याला आलेले दैन्य, दुःख, होरपळ वगैरेंची चिकित्सा ताराबाईंनी केली आहे.

एकोणिसाव्या शतकातील बालाजरठ विवाह पद्धतीचे भयावह वास्तव ताराबाईंनी नोंदविले आहे. ''एखाद्या कसाबाला गांठून त्याचे जवळून जशी एखादी बकरी वाघापुढें टाकण्यास विकत घ्यावी, त्याप्रमाणें हजार दोन हजार रुपये देऊन सुरेख मृगनेत्रीचें लग्न या मढ्याबरोबर करून द्यावे. पुढे हे मढें घराचे बाहेर एके दिवशी गंगातिरी गेले म्हणजे झाले. सरला याचा संसार. हीच आपली अवदशा'' (कित्ता : ९६).

सवतीवर मुली देण्याच्या वा सवत आणण्याच्या पद्धतीचा ताराबाईंनी तीव्र शब्दांत धिक्कार केला आहे. ''सवतीसारखे स्त्रियांस निरंतर कांट्याप्रमाणे सलणारे दुसरें शस्त्रच नाही... तुमच्यातून कोणा एकाचे बायकोने तुमच्यादेखत दुसऱ्या पुरुषाकडे जरा रोखाने पाहिले की, त्यांचा काय विस्तवाप्रमाणे संताप होतो. त्याकरितां तिची जनांत किती फजिती करिता, तिला मारहाण किती होते, तिजवर जप्ती किती असते. तसे तुम्हाला का नसावे... तुम्हाला नुसते पाहाणे सोसत नाहीं, तर तिचे उरावरही जीवंत जळत शेगडी तिला सोसेल का? अशा सवतींवर कोणी मुली द्याव्या का?'' (कित्ता : ११०). एखाद्या कसाबाच्या हाती गाय स्वाधीन करावी त्याप्रमाणे मुलींचे विवाह केले जातात. मुलींच्या हालअपेष्टा लिहिल्या तर कागद पुरणार नाहीत, असे ताराबाई म्हणतात.

घरजावई करण्याच्या पद्धतीचाही ताराबाईंनी समाचार घेतला आहे. वधुवरांना परस्पर अनुरूप स्थळ पाहूनच विवाह करावा, असे त्यांचे स्पष्ट मत आहे. काही पुरुषांना बायको म्हणजे 'सत्तेची बटीक', 'माल',

‘अडगळ’, ‘घरचा सोपा’ वाटतो. एक मेली की दुसरी करायला तयार. एक घोडी मेली तर दुसरी घेण्यास वेळ लागत नाही, तशी दुसरी बायको करण्यास तयार. पुरुषांच्या दृष्टीने पत्नी म्हणजे जणू एखादी वस्तू वा प्राणीच. सत्ता, संपत्तीच्या जोरावर वाटेल ते करण्याची मोकळीक.

स्त्रीजीवनाला होरपळून काढणारे वैधव्य व पुनर्विवाह बंदी या अमानुष चालीरीतींना ताराबाईंनी टीकेचे व चिकित्सेचे सर्वाधिक लक्ष्य केले आहे. विधवा स्त्रियांच्या दुःखाचे, नागवणुकीचे, हालअपेष्टांचे हृदय पिळवटून टाकणारे वर्णन ताराबाईंनी केले आहे. पतिनिधनानंतर बाईचे हाल कुत्रे खात नाही. तिचे केशवपन केले जाते. तिचे अलंकार व सौंदर्य हिरावून घेतले जाते. लग्नादी समारंभास जाण्यास बंदी घातली जाते. तिला सर्व तऱ्हेनें उघडी करून देशोधडी केल्याप्रमाणें नागवून सांदीचे खापर करावयाचें... अभागी, करंट्या कपाळाची, तिचे तोंड पाहू नये. अपशकून होतो’’ (कित्ता : ९४). अशा शेलक्या विशेषणांच्या भाल्यांनी तिला घायाळ केले जाते. ‘‘एकदां सौभाग्य गेलें म्हणजे स्त्रियांनी आपली तोंडे अगदी एखाद्या महान खुन्यांपेक्षाही अपराध्याप्रमाणें काळी करून सर्व आयुष्यभर आंधार कोठडींत राहावे’’ (कित्ता : ९३). जणू काही पतीच्या निधनास तीच जबाबदार आहे, असेच समाजाचे वर्तन असते. ताराबाई इथे समस्त पुरुषप्रधान व्यवस्थेला तर्कशुद्ध प्रश्न विचारतात की, अहो तिचा पती का तिने मारिला आहे का? त्याची आयुष्यमर्यादा संपल्याचा दोष त्याच्या बायकोकडे कशाकरिता? पतीच्या मृत्यूनंतर पत्नीवर जे निर्बंध घातले जातात तेच पत्नीच्या मृत्यूनंतर पतीवर का नाहीत? पुरुषांना सर्व मोकळीक का? त्याने दुसरे लग्न का करावे? स्त्रीला एक न्याय व पुरुषांना एक न्याय. या दुटप्पीपणावर ताराबाईंनी कठोर धब्दांत धारदार हल्ला चढविला आहे. वैधव्यातील होरपळ इतकी भयंकर असे की, विवाहित स्त्रियादेखील वैधव्याच्या भीतीच्या छायेतच जगत असत. ताराबाई लिहितात, ‘‘नवरा जरा आजारी झाला की तिचे तोंडचे पाणी पळते व ती त्याला हरघडी प्राणांपेक्षाही जास्त जपते. मग ती भक्तिभावाने म्हणा अगर भीतिभावाने म्हणा’’ (कित्ता : ९६). ताराबाईंचे हे निरीक्षण इतके बोलके आहे की, विधवांच्या दुःस्थितीसंबंधी इतर कोणत्याही स्पष्टीकरणाची गरज भासत नाही.

ब्राह्मणांप्रमाणेच प्रभू, शेणवी, गुजराती, मारवाडी, मराठे आदींच्यामध्ये विधवांचे पुनर्विवाह केले जात नसल्याचे ताराबाईंनी निदर्शनास आणलेले आहे. उच्चकुलीन सरंजामदार मराठ्यांमध्ये ‘ब्राह्मणांपेक्षाही पुनिर्ववाह न होण्याची सक्ती दिसून येते. अशा उठून गेल्या तर जाऊं देतील, पण पुनः दुसरा नवरा कधीच करूं देणार नाहीत’ (कित्ता : ७९). विधवांचे पुनर्विवाह न करण्याची चाल महारोगाप्रमाणे सर्व जातीत व सर्व ठिकाणी पसरली आहे. त्यामुळे कोट्यवधी स्त्रिया वैधव्याचे असह्य दुःख कसकसे भोगीत असतील व त्यापासून कसकसे अनर्थ होत आहेत व होत असतील यांची कल्पनासुद्धा करवत नाही, असे ताराबाई म्हणतात.

पुरुषांचे शौर्य, धैर्य व अशक्य कामे शक्य करून दाखविण्याचे बुद्धिसामर्थ्य यांची उदाहरणे देऊन ताराबाई समस्त पुरुष जातीला सवाल करतात की, ‘‘..असे तुम्ही बलाढ्य पराक्रमी असतांना गरीब विधवा स्त्रियांना या लज्जेच्या दरींतून ओढून सर्व जातीला मोडून एकदम त्यांच्या कपाळी सौभाग्याचा मळवट भरून

सौभाग्यशाली करण्यास तुमच्यानें पुढे होववत नाही काय?''(कित्ता : ८९). पुरुषांनी पुढे येऊन विधवाविवाह करण्यास पुढाकार घ्यावा, स्त्रियांच्या दुःखदैन्य निवारणार्थ प्रयत्न करावेत, असे ताराबाईंना वाटते. परंतु दुसऱ्याच क्षणी त्यांना या स्वार्थी, लंपट, बोलघेवड्या पुरुषांकडून काहीही अपेक्षा ठेवण्यात अर्थ नाही, हे वास्तव ध्यानात येते. पुरुषांचे मोठेपण व शौर्य सारे 'मृगजळाचे लोट' आहेत. त्यांच्यापैकी एकही जण 'जहामर्दीचा विडा उचलीत नाही.' मोठमोठ्या सभांमध्ये भाषणे ठोकणाऱ्या बोलक्या सुधारकांना व त्यांच्या पोकळ सार्वजनिक सभांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून ताराबाई म्हणतात, ''अरे, तुम्ही केवळ इसापनितींतील उंदराच्या सभेंतील उंदीराप्रमाणे आहांत.'' ''मांजराच्या गळ्यात घंटा बांधावी'' हे म्हणतां पण पुढें होतो कोण? सभा भरवितांना सभा भरली म्हणजे तेथें काय मोठी शालजोडी, लफेदार पागोट्याचा झोक लावून डौलाने जाऊन पल्लाभर सुपारी, दहा गाडे विड्यांची पाने, हारतुरे, एक हौदभर गुलाबी अत्तराचा सत्यानास करून घरी यावयाचे एवढेच काय तें. दुसरे काही नाही. या अशा तुमच्या पोकळ सभा तर तीस पसतीस वर्षांपासून चालल्या आहेत. उपयोग काय? तुम्ही तुम्हाला आपल्या ठिकाणी धन्य मानून घ्या. पण पाहू गेलें असतां अजागल स्तनाप्रमाणें निर्जीव आहांत.'' (कित्ता : ८९). ताराबाईंच्या टीकेचा रोख सार्वजनिक सभेवर आहे. कृतिशून्य सुधारकांच्या, त्यांच्या वर्तनव्यवहाराचा, दांभिकतेचा समाचार घेऊन त्यांना चांगलाच आरसा दाखविला आहे.

स्त्रियांच्या गुलामगिरीची, दास्यत्वाची मुळे धर्मशास्त्रे, स्मृती, श्रुती आदींमध्ये आहेत, याची ताराबाईंना पूर्ण जाणीव होती. म्हणून त्यांनी मुळावरच घाव घालण्याचा प्रयत्न केला. पुरुषांना सर्व प्रकारची मोकळीक देऊन स्त्रियांना 'अबला', 'गृहबंदी' बनविण्यास शास्त्रकर्ते जबाबदार आहेत. शास्त्रकर्त्यांचा पुरुषी पक्षपातीपणा, दांभिकता, लंपटपणा यांवर उपहास आणि उपरोधाच्या धारदार हत्यारांनी हल्ला करीत त्यांची चिरफाड ताराबाईंनी केली आहे. ''स्त्रियांनी शास्त्रकर्त्याचे घरास कधींकाळीं आग लाविली होती वाटतें. म्हणून त्यानें एकदम एकीकरितां साऱ्यांना एकच कायदा लागू केला. तसाच पुरुषांलाही असाच एकच कायदा लांगू केला असतां तर बरें होतें. पण असे कसें होईल? या कामांत शास्त्रकर्त्यांनी तरी आपले अकलेचा फांटा लांब झोंकून बरीच खर्ची घातली. ही तरी त्यांची मोठी कुशलताच. बरोबरच आहे. आज जर शास्त्रकर्त्यांनी ''कोणत्याही पुरुषाने एक प्रथम विवाहित बायको मेल्यानंतर पुनः लग्न करू नयें, करील तो मातृगमनी; त्याला जातिभ्रष्ट करावे'', असे केले असतें नी कदाचित उद्या शास्त्रीबोवांच्या बायका एकदम जात्या तर त्यांनाही मग लोक असेंच ''करंट्या कपाळाचे, याचें तोंड पाहू नका'' यांना लग्नकार्यांत येऊं न देतां गावाबाहेर मठांत हुसकून लाविते. म्हणूनच उघडच दिसते की, त्यांनी ही आपली पीडा टाळण्याकरितांच पुरुष जातीला एकीपासून पाचशें बायका करण्याची परवानगी दिली. तेंव्हां यांचे दैव फळफळले.'' (कित्ता : ९४, ९५). पुरुष शास्त्रवेत्त्यांनी स्त्रियांचे शोषण व दमन करण्यासाठी स्वतःला हवी तशी शास्त्रवचने लिहिली हे ताराबाईंनी ठोसपणे दाखवून दिले आहे.

भारतीय समाजव्यवस्था व पुरुषी मानसिकता यांच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न ताराबाई करतात. भारतीय समाजमानसिकतेची घडण करणाऱ्या धर्म व देव या संकल्पना यांस कारणीभूत असल्याचा त्यांचा

दावा आहे. त्यामुळे त्यांनी धर्माबरोबरच देवांवरही हल्ला चढविला आहे. कृष्ण, राम, रावण यांची उदाहरणे देऊन ताराबाई म्हणतात की, देवदेखील स्त्रियांचे मुळावर, मग तुम्ही असल्याचें काय नवल? तुमचे देवदेखील दगाबाज मग तुम्ही असालच असाल यात नवल काय? इंद्राने गौतमाचे रूप घेऊन अहिल्येसारख्या साध्वीला कलंक लावला. चंद्रावळीसारख्या पतिव्रतेचा कृष्णाने राहीरूपाने व्रतभंग केला. शंकरांनी तपश्चर्या सोडून भिल्लीणीच्या मागे धाव घेतली. विश्वामित्राने तर कुत्र्याचा अवतार घेतला. ब्रह्मदेव तर आपल्या मुलीच्या मागे धावू लागला. अशी देवांची स्त्रीलंपटतेची उदाहरणे ताराबाईंनी दिली आहेत. चिकित्सेच्या तराजूत देवसुद्धा सुटले नाहीत. अत्यंत निर्भयपणे व निर्भीडपणे तर्कशुद्ध रीतीने देवदेवतांची परखड चिकित्सा करून त्यांचे कथित माहात्म्य व देवपण निकालात काढले आहे. त्यांच्या पारंपरिक प्रतिमांचे भंजन केले आहे.

रामकृष्णादी देव, ऋषिमुनी, शास्त्रग्रंथांचे कर्ते आदींना ताराबाईंनी चिकित्सेच्या कक्षेत आणले आहे. देवदेवतांचे, ऋषिमुनींच्या आपमतलबी वर्तनाचे, दांभिकतेचे व स्त्रियांसंदर्भातील दुटप्पीपणाचे, शोषणव्यवहाराचे अनेक दाखले, देऊन ताराबाई उपहासाने म्हणतात, ''वारे देव! वारे ऋषि! एकाचडी एक!'' (कित्ता : ८५). ऋषिमुनींनी, शास्त्रे, स्मृती, श्रुती आदी धर्मकायद्यांमध्ये स्त्रियांच्यावर असंख्य बंधने लादून, गुलामगिरीच्या व दास्यत्वाच्या खाईत लोटले. स्त्रियांच्या संदर्भात अपमानकारक लेखन करणाऱ्या व त्यांना हजारो वर्षे अमानुष जिणे जगण्यास भाग पाडणाऱ्या या ऋषी मुनींची, स्मृतिकारांची 'कुळे' शोधण्याचा प्रयत्न ताराबाईंनी केला आहे. त्या अत्यंत निर्भीडपणे व त्वेषाने लिहितात, ''तेंव्हाचे ऋषि तरी काय? कोणी हरणीचे पोटीं झालें; तें कोण ऋंग ऋषि, कोणी पाखराचे पोटीं झाले; ते भारद्वाज, कोणी गाढविचे पोटीं झाले; ते गर्धभऋषि, गायीचे पोटी झाले ते वृषभऋषि. तेंव्हा त्यांनी आपले पशूप्रमाणे लिहून ठेविले झाले. ते गेले करून पण निस्तरणें आले स्त्रियांचे कपाळी.'' (कित्ता, ९९).

इथले देवसुद्धा पुरुष आहेत. पुरुषांचे पक्षपाती आहेत. म्हणून त्यांनी स्वजातीला सर्वापरी मोकळे ठेवून स्त्रियांना पाशबद्ध केले आहे. याबद्दल ताराबाई थेट देवांना जाब विचारतात की, ''अरे, तुम्ही देव ना! तुमचेजवळ मुक्तद्वार, पक्षपात नाहीं ना. मग हे काय रे! पक्षपाताचा बाप झाला ना हा! अरे पुरुषाला तशीच स्त्रियांना तूच निर्माण केलेंस नां! तर त्यांना सुख व यांना दुःख अशी निवडानिवड का रे केलीस?'' (कित्ता : १०३). इथल्या देव आणि धर्मव्यवस्थेला, शास्त्रतत्त्ववेत्त्यांना स्त्रियांच्या दुरवस्थेबद्दल जबाबदार धरून त्यांना ताराबाईंनी आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. स्त्रियांच्या दोषांसंदर्भात अनेकदा चर्चा होते. ''पण जे दोष स्त्रियांचे अंगी आहेत तेच पुरुषांत अजीबात नाहीत काय? जशा बायका लबाडी करितात तसें पुरुष करीत नाहीत काय? चोरी, शिंदळकी, खून, दरोडे, दगाबाजी, सरकारी पैसा, लांच खाणें, खऱ्याचें खोटे, खोट्याचे खरे करणें, यांतून एकही अवगुण पुरुषांत नाही काय?'' असा सवाल ताराबाईंनी केला आहे (कित्ता : १०३).

आध्यात्मिक क्षेत्रांमध्ये धर्मग्रंथ, पोथ्यापुराणांमध्ये 'स्त्री म्हणजे स्वर्गमार्गाचा नाश करणारे यमनगरीचे द्वारच' असे संबोधले गेले आहे. संपूर्ण स्त्रीजातीचा व तिच्या माणूसपणाचा घोर अपमान करणारी अशा

स्वरूपाची विधाने जगातील बहुतेक सर्व धर्मांमध्ये आढळतात. ताराबाईंनी या स्वरूपाच्या विधानांची कठोर शब्दांत निंदा केली आहे. ज्या स्त्रियांना तुम्ही अशी संबोधने देता, त्या स्त्रिया तुमच्या कोण? तुम्ही कोणाच्या पोटी जन्म घेतलात? तुमचे नऊ महिने ओझे कोणी वागविले? नेत्राचा दिवा व तळहाताचा पाळणा करून कोणत्या साध्वीने तुम्हांस रजाचा गज करून दाखविले? तुम्हाला प्राणांपेक्षाही अधिक कोणी जपले? तुम्हाला दादा, भाऊ म्हणून हाका मारणाऱ्या व निरंतर तुमचे कल्याण चिंतणाऱ्या त्या कोण तुमच्या बहिणी, तुमच्यावर मनोभावापासून प्रेम करून सुखदुःखात वाटेकरी होणारी तुमची पत्नी, या साऱ्या स्त्रियाच आहेत ना? तुम्ही स्त्रियांना 'दुर्गुणाची पेठ', 'कपटाचे पात्र', कुऱ्हाड', 'स्वर्गमार्ग नाश करणारी' अशी जी विशेषणे देता, त्यावरून तुम्हांस मातृद्रोही का मातृनिंदा करणारे म्हणावे? अशी झाडाझडती ताराबाईंनी घेतली आहे. यापुढे जाऊन त्या विचारतात की, तुमच्या आईला कोणी 'नर्कदुर्गाची वेस', बहिणीला 'कपटाची खाण', पत्नीला 'पुण्यवृक्ष तोडण्याची कुऱ्हाड' असे म्हटले तर तुम्हाला बरे वाटेल काय? धर्मग्रंथांतील स्त्रीनिंदेची व स्त्रीनिंदकांची कठोर शब्दांत निर्भत्सना करून पुरुषांच्या भावभावनांवर, नातेसंबंधांवर, संवेदनशीलतेवरच ताराबाईंनी प्रश्न उपस्थित केला आहे. त्यामुळे अशा स्त्रीद्वेष्ट्या लेखनाला व तशा मानसिकतेला हद्दपार करण्याशिवाय कोणाही विचारी पुरुषाला दुसरा मार्ग राहिला नाही.

स्त्रियांच्या वाट्यास आलेल्या दुःस्थितीबद्दल ताराबाई थेट विधात्यालाच जाब विचारतात, ''अरे, आजन्म बटकीप्रमाणे ताबेदारीत राहून सदासर्वदा नवऱ्याची मर्जी तोलून, घरांतील सर्व मनुष्याचें जें नाही ते सर्व बोलणें व कष्ट सोसून, सदोदीत भाड्याचे बैलासारिखे राबून हरिणासस्यासारखी रात्रंदिवस जनाची, घरच्यांची भीति बाळगून वागत असतांही स्त्रियांना एक शब्द बोलण्याची, अगर चिमटीभर दाण्याची सत्ता नसावी काय रे?'' (कित्ता : १०३). ताराबाईंनी एक प्रकारे भारतीय संस्कृतीला व इथल्या एकंदर व्यवस्थेला हा मूलभूत प्रश्न विचारला आहे. पुरुषधार्जिण्या व्यवस्थेकडे व संस्कृतीच्या ठेकेदारांकडे याचे कोणतेही न्याय्य उत्तर नव्हते.

स्त्री-पुरुषांमधील दुर्गुणांची तुलना करण्याकरिता ताराबाईंनी नारो सदाशिव रिसवूड यांच्या 'मंजुघोषा' या कादंबरीतील भर्तृहरीचा श्लोक विचारार्थ घेतला आहे. संशय, अविचार, कपट, सकल दोषांचे निधान, दुर्गुणांचे उत्पत्तीस्थान, यमनगरीचे द्वार, उद्ध्वततेचे गृहच वगैरे जे दुर्गुण स्त्रियांमध्ये असल्याचे म्हटले आहे, तेच दुर्गुण पुरुषांच्या ठायी कैक पटीने अधिक असल्याचे ताराबाईंनी म्हटले आहे. आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ त्यांनी अनेक दाखले दिले आहेत व बिनतोड युक्तिवाद केला आहे. उदा. स्त्रिया अविचारी असतात, हा आरोप खोडून काढताना ताराबाई म्हणतात, ''तुम्ही शहाणे आहात खरे, पण इकडे कारागृहांत जाऊन पहावें तो पाय ठेवण्यास देखील जागा मिळत नाही. इतकी तेथे आपल्या देशबांधवांची दाटी असते. कोणी खोट्या नोटा केल्या म्हणून, कोणी लाच खाल्ला म्हणून, कोणी कोणाची बायको पळवून नेली, कोणी बंडात सामील, कोणी कोणाला विषप्रयोग केला, कोणी राजद्रोह केला, कोणी खोटी साक्ष दिली, कोणी तोतया राजे बनून लोकांस बुडविले, कोणी खून केले, ही अशी अशी विचाराची मोठमोठी कामें केल्यावरून सरकारने तुम्हाला मोठ्या आदराने या सुंदर बंदीशाळेसारख्या रंगमहालांत जागा दिली. पण असे अविचार

कोणते स्त्रियांचे हातून घडतात बरें? असे किती कारागृह बायकांनी भरलेत दाखवा? जेथे तुमची दोन तीन हजार मंडळी, त्यांत फार झालें तर शंभर देखील स्त्रिया निघणार नाहीत.'' (कित्ता : १०६, १०७). गुन्हेगारीमध्ये पुरुषांचाच भरणा असून स्त्रियांचे नगण्य स्थान असल्याचे ताराबाई निदर्शनास आणतात. स्त्रियांना व्यभिचारास कोण प्रवृत्त करतो, असेही त्या विचारतात. पुरुषांच्या गुन्हेगारी, भ्रष्ट, अनैतिक वर्तनाचे अनेक दाखले देऊन त्यांचे दात त्यांच्याच घशात घातले आहेत. बालविवाह, वैधव्य, विधवा पुनर्विवाहास विरोध, जरठविवाह, उपवर नवरे, सवत यांसारख्या स्त्रीजीवनाचे मातेरे करणाऱ्या बाबींस पुरुषच जबाबदार आहेत. विवाहसंस्थाच पुरुषांच्या हातात. त्यांच्या मर्जीप्रमाणे सर्व काही होणार. तेथे स्त्रियांच्या भावभावनांना, विचारांना, मताला अवसरच नाही. प्रचलित विवाहसंस्थेवरील पुरुषांची एकतर्फी मक्तेदारी ही स्त्रियांच्या दैन्याचे एक प्रमुख कारण असल्याचे ताराबाईंना वाटते.

स्त्रियांच्यामध्येही काही दोष असतील, काही स्त्रियांचे वर्तन निंद्य असेल; परंतु ते का निर्माण झाले, त्यास जबाबदार कोण, अशा मुळांचा शोध ताराबाई घेतात. पुरुषप्रधान व्यवस्था, धर्मशास्त्रे, धर्मसत्ता यांच्या जोखडांनी स्त्रीचे स्वतंत्र व्यक्तित्व व माणूसपणच संपवून टाकले आहे. पुरुषांच्या गोड बोलांस, नाना प्रकारच्या युक्त्यांस काही स्त्रिया फसतात. पुरुषांच्या डावपेचांना बळी पडतात. त्यामुळे त्यांच्या हातून अनाचार घडतात, असे ताराबाईंचे निरीक्षण आहे. 'टाळी दोहो हातांनी वाजते खरी, पण त्यांतून उजवे हाताचा जोर ज्यास्त असतो', असा चपखल व्यावहारिक दाखला त्यांनी दिला आहे.

पुरुष जातीच्या कपटकारस्थानांची अनेक उदाहरणे ताराबाईंनी दिली आहेत. धार्मिक क्षेत्रातील साधू, बैरागी, बुवा, बाबा इत्यादींच्या सोंगाढोंगाचा, भोंदूपणाचा, त्यांच्या स्त्रीलंपट मनोवृत्तीचा पर्दाफाश ताराबाईंनी केला आहे. 'बाह्यवेष मिरवी भगवाहे।। अंतरी कुमतिचे भगवाहे' असे धर्मक्षेत्रातील बुवाबाबांचे अंतरंग असते. संतती नसलेल्या, भोळ्याभाबड्या बायकांना बुवाबाबा, भोंदूलोक नाना आमिषे दाखवून कसे नादी लावतात व फसवितात, याचे अनेक दाखले देऊन ताराबाई विचारतात की, ''अमक्या बायकोने असे गोसाव्यांचे अगर साधुचे वेशाने कोणी तरी पुरुष पळवून नेला काय? अशी एक दाखल्याला तरी दाखवा बरें'' (कित्ता : ११६). ध्यानधारणा करणाऱ्या बुवांच्या मनातील विषयवासनेची लक्तरे जाहीरपणे वेशीवर टांगत ताराबाई लिहितात, ''बुवाचें जों जों प्रस्थ लांबत चालतें, तों तों बुवा नित्य पंचपक्वान्नांचा खुराक खाऊन बोक्यासारखे ताजे बनतात नी मग बुवांचे देवदेवतार्चन बखळीत पडून बुवा जितक्या बायका दर्शनाला येतील तितक्यांतून ज्या कांही निवडक नवयौवना असतील त्यांचे चिंतन करीत, हे सुंदरी हे सुंदरी, अशी माळ फेरीत बसतात. नेत्रात या नूतन केतकीचे सुहास्य मुख व आंतरयामी दामाजीचा निजध्यास लागून बुवा धडवेडे ना धडशहाणे होऊन जातात'' (कित्ता : ११४). धर्मसंस्थेतील घटकांकडून स्त्रियांच्या लैंगिक, भावनिक, मानसिक वगैरे शोषणाची असंख्य उदाहरणे आजही आढळतात. किंबहुना धर्मसंस्थेच्या आहारी जाण्याचे व तेथील शोषणाला–दमनाला बळी पडण्याचे प्रकार स्त्रियांमध्येच अधिक आढळतात. धर्मसत्तेचा सर्वाधिक बळी स्त्रिया ठरलेल्या असून आजही नव्या रूपात हे शोषण सुरूच आहे. ताराबाईंनी १८८२ साली जे विचार मांडले त्यामध्ये आजही फारसा फरक पडलेला नाही. हिमनगाच्या टोकाप्रमाणे फार कमी प्रकरणे

उघडकीस येतात. धाडसाने तक्रार करण्यास पुढे येणाऱ्या स्त्रिया हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या आहेत. या सर्व प्रकरणांमध्ये स्त्रियांचा कोणताही दोष नसताना त्यांच्या चारित्र्याची सार्वजनिक चर्चा होते. त्यांच्या वाट्यास प्रचंड बदनामी येते. त्यामुळे बदनामीच्या व अब्रूच्या भीतीने स्त्रिया 'ब्र' काढत नाहीत. भारतात प्रत्येक स्त्रीला तिच्या आयुष्यात पुरुषांच्या कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या शोषणाला, अत्याचाराला सामोरे जावे लागते. पुरुषांच्या लैंगिक नजरांचा अनुभव तर स्त्रियांना हरघडी येतो. ताराबाईंनी स्त्रियांच्या या आक्टोपशी शोषणाला–दमनाला जाहीर वाचा फोडून सबंध पुरुषप्रधान व्यवस्थेला जाब विचारला. परंतु पुरुषी मानसिकतेमध्ये काही मूलभूत विचारपरिवर्तन घडलेले जाणवत नाही.

स्त्रिया या दुर्गुणांचे उत्पत्तिस्थान असतात, या मताचे जोरदार खंडन ताराबाईंनी केले आहे. ताराबाईंच्या मते, दुर्गुणांची उत्पत्ती पुरुषांपासूनच झाली. स्वधर्म सोडून मनमानेल तसे वर्तन करणे, व्यसने, बायका ठेवणे, वाईट व घाणेरडी कृत्ये करणे इत्यादी गोष्टी पुरुष करू लागले. या तोडीचे स्त्रियांचे दुर्गुण दाखवा. स्त्रिया कधी रस्त्यांत तमाशे पाहात, दारू पिऊन रस्त्याने लोळत, जुवेबाजांत, पांचशे लुटारू बायकांची टोळी कधी पाहिलीत का? असे थेट आव्हान ताराबाई देतात.

पुरुष स्त्रियांना गोड गोड बोलून त्यांची प्रीती कशी संपादन करतात, पुरुषांच्या मनमोहक बोलण्यास भुलून स्त्री त्याच्यावर भरवसा ठेवून त्याला आपला जीव कसा अर्पण करते, एकदा पुरुषाची विषयवासना पूर्ण झाली की, त्या स्त्रीला कसे टाळतात, शेवटी स्त्रीची मरणप्राय स्थिती होऊन ती अब्रू वाचविण्यासाठी पोटच्या गोळ्याचासुद्धा त्याग करून आयुष्यभर रडत कुढत, दुःखाचे गाठोडे डोक्यावर घेऊन लोकनिंदा सोसत जन्म घालवितात, कित्येक प्राण देतात. अशा भयानक वास्तवाचे वर्णन ताराबाईंनी केले आहे. कोणाही संवेदनशील माणसाचे मन विदीर्ण व्हावे असा पुरुषी कृतघ्नपणा ताराबाईंनी उघडा पाडला आहे. अशा गुन्हेगारांना कायद्याच्या राज्यामध्ये शिक्षा मिळणेही दुरापास्त. कारण कायद्याला साक्षपुरावा लागतो व अशा नाजूक प्रकरणांमध्ये साक्षपुरावा बहुधा नसतोच. ताराबाईंनी सरकारला या बाबतीत दोष दिला आहे. त्यांच्या मते, अशा प्रकरणात स्त्रियांना एकपट व पुरुषांना दुप्पट शिक्षा करणारा कायदा करावा. जबर शिक्षा असेल तर त्या दहशतीनेच लोक गुन्ह्याकडे वळत नाहीत, असे त्यांचे मत आहे. पुरुषांचे पायी स्त्रिया नाना तऱ्हेचे दुःख भोगतात, तसें तुम्ही त्यांचेकरिता भोगाल का? असा प्रश्न त्यांनी विचारला आहे. या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर देण्याची हिंमत व नैतिकता पुरुषवर्गाकडे आहे का?

स्त्रियांच्यामुळे दुर्दशा होऊन देशोधडीस लागलेले पुरुष फार थोडे सापडतील. पण पुरुषांमुळे वाटोळे झालेल्या स्त्रिया अगणित. याचे कारण पुरुषांचा धूर्तपणा. पुरुषांच्या वर्तनव्यवहारावर हल्ला चढविताना ताराबाई लिहितात, ''रोज मोठमोठ्या सभा भरविता, काय काय चाळे करता, व्याख्याने देता, दुसऱ्याला सांगता, पण स्वतः तेच पढत मूर्ख. दिवा दुसऱ्याला उजेड देतो; पण त्याचे खाली अंधार. तसे तुम्हाला जर तुमचे दुर्गुण कळून येते तर छाती फुटून मरता'' (कित्ता : १२६).

स्त्रिया पुरुषांची हर तऱ्हेने काळजी घेतात. पुरुषांवर स्वतःच्या प्राणांपेक्षा जास्त प्रेम करतात, परंतु पुरुष मात्र स्त्रियांना नाना तऱ्हेचे दोष देऊन त्यांना रसातळाला घालू पाहतात, या प्रवृत्तीवर ताराबाईंनी कडक टीका केली आहे. त्या म्हणतात, ''तुम्हाला जिकडून सुख होईल ते करण्यास सर्वदां तयार हशी जी ही तिला तुम्ही नाना प्रकारचे दोष देऊन या पृथ्वीतलाचे तळीं घालूं पहाता याची तुम्हांस कांहीच लाज वाटत नाही का रे? ... स्त्री जाति अगदी निर्बल, मूर्ख, साहसी, अविचारी; अशी नाना प्रकारची निंद्य विशेषणे देऊन एकदाच त्यांच्या नावाचा डंका ठोकलांत. त्यांना निरंतर बंदीवानासारखे गृहतुरुंगात कैदी करून ठेविलेत, व जिथे तिथे चढती कमान करून राव बनलेत. यामुळें तुम्हांला वाटतें कीं, बायको म्हणजे काय? ...लहानपणापासून आपले हाती सारी सिक्का आनीन ठेवून स्त्री जातीला अगदी अंधार कोठडींत या जगापासून दूर पडद्यांत जरबेंत निरंतर बटकीसारखी ताबेदारींत ठेवून जेथें तुम्ही आपलेच गुणांचे दिवे पाजळलेत. त्यांना न विद्या, न कोठे जाणें न येणे. गेले तरी तेथें त्यांच्यासारिख्याच सर्व अज्ञान. एकीसारखी दुसरी. मग जास्त ज्ञान व शहाणपण त्यांना कोठून येणार?'' (कित्ता : ९१, ९२). स्त्रियांच्या अज्ञानास व दास्यत्वास पुरुषी वर्चस्ववादी मानसिकता कशी कारणीभूत आहे, पुरुषांनी स्त्रियांच्या माणूसपणाचा अव्हेर करून त्यांना कसे गुलाम बनविले आहे, याची भेदक मीमांसा ताराबाईंनी केली आहे.

आपल्या जीवावरून दुसऱ्याचा जीव ओळखावा ही जीवनरीत. पण स्त्रीयांच्या बाबतीत पुरुषांचा जीव कोठे जातो? जसा पुरुषांना स्वतःचा जीव प्यारा आहे तसा स्त्रियांना त्यांचा नसेल काय? ''तुम्ही व तुमचा जीव हें अगदी गाळीव सोनें. स्त्रिया काय अगदीं यःकश्चित प्राणीं ढेकूण नाहीं तर पिसूं असे तुम्हाला वाटते'' (कित्ता : ९३, ९४), असा पुरुषांचा दुटप्पीपणा व मानभावीपणा ताराबाईंनी उघडा पाडला आहे.

स्त्री पुरुष संबंधांमध्ये विश्वास, प्रेम, ममता, समता, प्रतिष्ठा ही सर्वांत महत्त्वाची असते. ही बाब ताराबाई सातत्याने अधोरेखित करतात. आईबाप मुलीस 'काळजाचे धडाप्रमाणे लाडाने, कौतुकाने मोठे करतात, तिला चांगले स्थळ मिळावे म्हणून झटतात. तिच्या सासुसासऱ्याची खुशामत करून त्यांनी आपल्या मुलीस चांगले ममतेने वागवावे म्हणून त्यांची मर्जी राखतात. चांगले स्थळ मिळाले तर ठीक नाही तर जन्मभर ती आईबापाचे जीवास करवत' (कित्ता : १०१) असे स्त्रीजीवनाचे दाहक वास्तव ताराबाई मांडतात. स्त्रियांना होणारी मारहाण, अपमानास्पद वागणूक, छळ वगैरेंचा उल्लेख करून त्या म्हणतात, ''तिला उभी सोन्याने मढवून जरी एका मोठ्या रत्नखचित मंदिरात ठेवून तिच्याशी ममतेने न वागलात तर तिला कसे वाटून दुःख होत असेल व होते, हे प्रत्यक्ष अनुभवावाचून सांगणे कठीण'' (कित्ता : १०२).

स्त्रिया संसारात निरंतर नाना प्रकारचे कष्ट, हाल, जाच, हाणमार सोसून फक्त पतीच्या प्रेमाच्या शब्दाला भुकेल्या असतात. त्या सदासर्वदा पतीच्या मर्जीप्रमाणे वागून, आज्ञेत राहून, अतोनात कष्ट करून, सदा पतीच्या मुखाकडे नजर लाऊन असतात. ''तिच्याकडे पाहून जरा तुमची खुषीत हासून दातखिळी उकलली म्हणजे तिला त्या आनंदापुढे त्रिभूवन ठेंगणे वाटते'' असे स्त्रियांचे भावविश्व ताराबाईंनी उलगडून दाखविले आहे (कित्ता : १०५). पुरुषांच्या ममतेचे व भूषणाचे शब्द हा स्त्रियांचा जीवनाधार असतो. त्यापुढे

त्या सारा त्रास, जाच, दुःख विसरून जातात. परंतु पुरुष मात्र त्यांच्या भावनांचा अव्हेर करून त्यांचे नाना तऱ्हेने शोषण करीत असतात.

ताराबाईंनी पुरुषांवर अतिशय कठोर शब्दांत हल्ले केले आहेत. पुरुषप्रधान व्यवस्थेची चिरफाड केली आहे. पुरुषांची अनेक शेलक्या विशेषणांनी संभावना केली आहे. पण याचा अर्थ ताराबाई पुरुषद्वेष्ट्या होत्या असा अजिबात होत नाही. पुरुषी प्रवृत्तीने व पुरुषप्रधान व्यवस्थेने स्त्रियांचे जे अमानुष शोषण केले आहे, त्या प्रवृत्तींविरुद्ध ताराबाईंचा झगडा होता. लिंगभेद करणाऱ्या प्रवृत्तीवर त्या अक्षरशः तुटून पडलेल्या आहेत. पुरुषांच्या नाना वृत्ती-प्रवृत्तींची लक्तरे त्यांनी वेशीवर टांगली आहेत. पण याच वेळी त्यांच्या संपूर्ण लेखनातून स्त्री-पुरुष समतेचा, स्त्री-पुरुष सहजीवनाचा, स्त्री-पुरुषांच्या निर्मळ प्रेममय नात्याचा झरा अखंड वाहतो आहे. स्त्री ही एक शक्ती आहे. स्त्रीवाचून पुरुषाला शोभा, मोठेपणा, जय हे काहीच नाही. स्त्री नसणारे घर स्मशानासारखे ओसाड आहे. पत्नी असताना बाहेर संबंध ठेवणे किंवा दुसरे लग्न करणे यांसारखी वाईट गोष्ट दुसरी कोणतही नाही. अशाने दोघींवर एकसारखे प्रेम राहील का? 'प्रीति कांही आंबा, जांब नाही. तशी ही प्रीति एकदा फाटली म्हणजे ती पुनः कधी जुळत नाही' (कित्ता : ११०). असे नाना परीने स्त्रीपुरुष सहजीवनाचे महत्त्व ताराबाईंनी सातत्याने सांगितले आहे. 'घोडे फेरता बाप मरावा, पण राहटानें सूत कांतणारी आई मरू नये' या म्हणीचा संदर्भ देऊन संसारातील स्त्रीचे महत्त्व अधोरेखित केले आहे. स्त्री ही अर्धांगी आहे. 'तुम्हाला अर्धांगवायू होऊन अर्धे शरीर जर गेलें तर एका हाताने तुम्ही काय कराल?' अशी मार्मिक उपमा देऊन स्त्री-पुरुषांचे अभिन्नत्व स्पष्ट केले आहे (कित्ता : १३०).

ताराबाईंनी स्त्री आणि पुरुषांच्या सहजीवनाचे, सहअस्तित्वाचे महत्त्व अनेक उदाहरणे देऊन विशद केले आहे. स्त्री आणि पुरुषांच्या जीवनाला परस्परांच्या प्रेमाने, सहजीवनाने अर्थ आणि सौंदर्य आहे, हे ताराबाईंनी जोरकसपणे सांगितले आहे. सर्व प्रकारची समृद्धी, ऐश्वर्य, सुखसोयी असलेल्या राजवाड्यात एखाद्या पुरुषाला स्त्रीविरहित ठेवल्यास त्याला तो राजवाडा केवळ स्मशान वाटेल. तशीच स्त्रियांचीही स्थिती असते. स्त्री वा पुरुषांच्या एकेकट्याच्या अस्तित्वाची कल्पनाही करणे अशक्य आहे. 'स्त्री जर तुम्हा सोबत नसेल तर तुम्हांला जोड्याजवळ देखील उभे करण्यास मागेपुढे करितात. 'सड्या फटिंगाला पुसतो कोण?' असे रोखठोकपणे ताराबाई बजावतात (कित्ता : ९४). पुरुष कितीही पराक्रमी, शूर असले तरी 'यःकश्चित अबलेच्या एका नेत्रकटाक्षानेंच तुमचे सर्व शौर्य, तेज, वीरश्री गळून जाऊन लागलेंच तिचेपुढे कुत्र्यासारखे पाय चाटावयास धावता... तेंव्हा आंता जास्त पराक्रमी कोण? ती स्त्री किंवा तुम्ही'' (कित्ता : ९१). पुरुषांची मर्यादा वेशीवर टांगून स्त्री आणि पुरुष यांमध्ये श्रेष्ठ कोण याचा जाहीर निवाडा केला आहे.

ताराबाईंनी स्त्रीचा स्त्री म्हणून विचार केला आहे. तत्कालीन भारतीय पर्यावरणात स्त्रीत्व ही न्यूनगंडाची, अपराधीपणाची बाब झाली होती. आपण स्त्री आहोत, या भावनेपोटीच अनेक स्त्रिया भयग्रस्त मानसिकतेत जगत होत्या. रूढिपरंपरांच्या जोखडांनी स्त्रीचे माणूसपणच संपविले होते. या पार्श्वभूमीवर ताराबाईंनी 'देशभगिनींचा अभिमान' धरून 'स्त्रीत्वाचा' सन्मान केला आहे. स्त्रीला आत्मसन्मान व आत्मप्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी विचारसंगर केला आहे. स्त्री ही सृष्टीनिर्माती आणि सृष्टीला सातत्य

देणारी शक्ती आहे, अशी त्यांची धारणा आहे. आपले माणूसपणच हरवून पशुवत जीवन जगणाऱ्या स्त्रियांना आत्मभान व आत्मसन्मान देण्याचे काम ताराबाईंनी केले. तसेच स्त्री आणि पुरुष हे एकमेकांना अपरिहार्य आहेत, हे त्यांनी निक्षून सांगितले आहे. सर्व सुखसोयींनी युक्त महालात पुरुषाला ठेवले आणि तेथे जर स्त्री नसेल तर त्याला तेथे राहवेल का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. पुरुषाविरहित स्त्रियास तरी कसे सुख होईल बरे? जी तुमची दशा तीच तिची. ईश्वराने हा जोडा स्वेच्छेनेच निर्मिला आहे, असे त्या आवर्जून नोंदवितात. निसर्गरचनेचा दाखला देऊन त्या लिहितात, ''पक्षापासून तो निर्जीव झाडाझुडुपातदेखील त्याने स्त्री जाती निर्माण केली आहेच. प्रत्येक गोष्टीला, जिनसेला दुसरा त्याच जोडीचा मुकाबला असतो. त्यावाचून शोभा येत नाही. जोडीवाचून कोणतेच काम नाही. तेव्हा या जगदारण्यातून तुम्ही एकटे फिरू शकाल? हा संसार तुम्ही स्वतः चालवाल काय? प्रपंचाचे शेत तुम्ही एकटे नांगरून काढाल काय?'' (कित्ता : ९०). सारांश, स्त्री आणि पुरुष हे एकमेकांना नैसर्गिकदृष्ट्या पूरक व अपरिहार्य आहेत. एकाशिवाय दुसऱ्याला अर्थ नाही. सबब परस्परांनी उभयतांच्या स्वातंत्र्याचा व प्रतिष्ठेचा विचार करून आनंदाने सहजीवन जगावे असे ताराबाईंचे मत आहे.

स्त्रियांना अमर्याद, मनमानेल तशी मोकळीक असावी, असे ताराबाईंचे म्हणणे नाही (कित्ता : १३०). स्त्रीच्या माणूसपणाचा, अस्तित्वाचा, आत्मसन्मानाचा, प्रतिष्ठेचा, भावभावनांचा विचार केंद्रस्थानी यावा, पुरुषांच्या मानसिकतेतून, जाणीव-नेणिवेतून, समाजव्यवस्थेतून लिंगभेदाची जाणीव कायमची नष्ट व्हावी. समतेच्या, समानतेच्या पायावर स्त्री-पुरुषांचे सहजीवन फुलावे. स्त्रीला आत्मविकासाचा, फुलण्याचा अवकाश प्राप्त करून द्यावा. स्वातंत्र्याच्या मुक्त वातावरणात तिचे व्यक्तिमत्त्व सर्वांगाने फुलून यावे. स्त्री-पुरुषांचे परस्परांवरील प्रेम, विश्वास, एकनिष्ठा हाच संसाराचा व जगण्याचा पाया असतो. स्त्री व पुरुष यांमध्ये स्त्रीच काकणभर श्रेष्ठ आहे. ममतेने ममता वाढते, विवेक, सदाचाराने वागून सुख आणि आनंद घ्यावा. समतेच्या व ममतेच्या पायावरील सहजीवन स्त्रीपुरुषांचे जगणे अधिक सुंदर करील, असा आशावाद ताराबाईंनी व्यक्त केला आहे.

इंग्रजी राजवटीमध्ये स्त्रियांना शिक्षण मिळू लागल्याने त्यांना व्यावहारिक शहाणपण, बऱ्यावाइटाची समज, मानसिक धैर्य प्राप्त होत आहे. त्यामुळे 'या भारतखंडाची काही दिवसांनी स्थिति अगदीं बदलून जाईल' असे ताराबाईंचे निरीक्षण होते. विजयालक्ष्मी प्रकरणाच्या निमित्ताने प्रतिगामी भूमिका घेणाऱ्या 'पुणे वैभव'सारख्या 'स्त्रियांच्या हाडवैरी' पत्रांचा व तत्सम पत्रकारांचा त्यांनी खरपूस समाचार घेतला आहे. एकीकडे इंग्रजांच्या आधुनिक विचारांना विरोध करणाऱ्या व दुसरीकडे इंग्रजांच्या जीवनशैलीचे, भौतिक बाबींचे अनुकरण करीत सुखोपभोग घेणाऱ्या दांभिक प्रवृत्तींना धारेवर धरले आहे.

## २.४ समारोप

एकोणिसाव्या शतकामध्ये स्त्रियांच्या गुलामगिरी व शोषणाची पाळेमुळे खणून काढत धर्मसंस्था व पुरुषप्रधान समाजव्यवस्था यांची परखड चिकित्सा करणाऱ्या ताराबाई शिंदे या पहिल्या मराठी स्त्रीवादी लेखिका आहेत. म. फुल्यांचा अपवाद वगळता तत्कालीन अन्य सुधारकांचे विचार ताराबाईंच्या आसपासही फिरकत नाहीत. केवळ मराठीच नाही तर भारतीय पातळीवरही त्या बहुधा पहिल्या स्त्रीवादी लेखिका असाव्यात. त्यांनी भारतीय स्त्रीच्या दास्यदैन्याची मूलगामी मीमांसा करीत धर्मसंस्थेला व पुरुषप्रधान व्यवस्थेला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून त्यांची उलटतपासणी केली. सत्यशोधकीय विचारधारेतून त्यांनी भारतीय धर्मग्रंथांचा, रूढिपरंपरांचा व एकंदर धर्मसमाजव्यवस्थेचा चिकित्सक अन्वयार्थ लावला. भारतीय स्त्रीवादाचा सत्यशोधकीय आशय त्यांनी व्यक्त केला. ताराबाईंच्या लेखनाचा व विचारांचा प्रभाव विसाव्या शतकातील स्त्रीमुक्ती चळवळींवर तसेच परिवर्तनवादी चळवळींवरही आढळतो. आजही आपल्या देशातील विविध प्रदेशांमध्ये व वेगवेगळ्या जनसमूहांमध्ये स्त्रीयांचे दास्य, शोषण, वैचारिक, आर्थिक स्थिती, गुलामी इत्यादींमध्ये फारसा गुणात्मक फरक पडलेला आढळत नाही. जागतिकीकरणामध्ये नव्या नव्या रूपात स्त्रीचे शोषण व वस्तूकरण केले जात आहे. स्त्रीचे दास्य, गुलामी, शोषण जोपर्यंत अस्तित्वात आहे, तोपर्यंत ताराबाई शिंदे व त्यांचा 'स्त्री–पुरुष तुलना' हा निबंध पुनःपुन्हा अभ्यासणे व मुक्तिलढ्याची नवी दृष्टी प्राप्त करणे अपरिहार्य ठरणार आहे.

## २.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

### २.५.१ वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न

१. 'स्त्री–पुरुष तुलना' हा निबंध कोणत्या वर्षी प्रसिद्ध झाला?

अ. १८८०    ब. १८८२    क. १८८३    ड. १८९०

२. ताराबाईंनी कोणत्यापद्धतीवर कठोर टीका केली आहे?

अ. विधवा पुनर्विवाह बंदी    ब. केशवपन    क. जातिव्यवस्था    ड. प्रेमविवाह

३. ताराबाईंनी 'स्त्री–पुरुष तुलना'मध्ये कोणाकोणाची चिकित्सा केली आहे?

अ. देवधर्म    ब. ऋषिमुनी    क. शास्त्रपुराणादी ग्रंथ    ड. अ, ब, क मधील सर्व बरोबर

४. 'जशी तुम्हाला चांगली बायको पाहिजे, तसा तिला चांगला नवरा नको का?' असा सवाल ताराबाईंनी कोणाला विचारला आहे?

अ. पुरुषांना    ब. शास्त्रवेत्त्यांना    क. देवादिकांना    ड. यांपैकी नाही

५. ताराबाईंनी प्रीतीची तुलना कशाशी केली आहे?

अ. तूप  ब. दूध  क. नवनीत  क. साय

**उत्तरे –** १. १८८२ २. विधवा पुनर्विवाह ३. अ. ब. क. मधील सर्व बरोबर ४. पुरुषांना ५. दूध

### २.५.२ दीर्घोत्तरी प्रश्न

१. ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री–पुरुष तुलना' या निबंधामध्ये पुरुषप्रधान समाजव्यवस्थेची चिकित्सा कशी केली आहे, ते सविस्तर लिहा.

२. 'स्त्री–पुरुष तुलना'मधील ताराबाई शिंदे यांच्या विचारांचे टीकात्मक परीक्षण करा.

३. ताराबाई शिंदे यांनी स्त्री–दास्य–शोषण व गुलामगिरीसाठी कोणकोणत्या घटकांना जबाबदार धरले आहे, त्याचे सोदाहरण विवेचन करा

४. ताराबाई शिंदे यांनी धर्मव्यवस्थेची केलेली चिकित्सा व तिचे महत्त्व विशद करा.

५. 'स्त्री–पुरुष तुलना'मधील आशयाचा तुमच्या विचारविश्वावरील परिणाम विशद करा.

### २.५.३ लघुत्तरी प्रश्न

१. ताराबाई शिंदे यांनी स्त्रीधर्माचे केलेले विश्लेषण तुमच्या शब्दांत सांगा

२. ताराबाई शिंदे यांनी स्त्री–पुरुषांमधील दुर्गुणांची तुलना कशी केली आहे, ते सांगा

३. ताराबाई शिंदे यांनी विवाहसंस्थेची केलेली चिकित्सा तुमच्या शब्दांत लिहा.

४. ताराबाई शिंदे यांच्या सहजीवनविषयक विचारांचा थोडक्यात परामर्श घ्या.

५. ताराबाई शिंदे यांनी देवदेवता व ऋषिमुनींची केलेली चिकित्सा तुमच्या शब्दांत लिहा.

### २.५.४ टीपा लिहा.

१. ताराबाई शिंदे यांनी केलेली पतिव्रतांच्या कथांची चिकित्सा

२. ताराबाई शिंदे यांनी विधवांच्या दुःखदैन्याचे केलेले चित्रण

३. स्त्री–पुरुषांच्या दुर्गुणांची तुलना

४. धर्मशास्त्रे व स्त्रियांची गुलामगिरी

५. ताराबाई शिंदे यांचे स्त्री–पुरुष सहजीवनाचे विचार

## २.६ संदर्भ


१. कीर, मालशे, फडके (संपा.) : महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सहावी आवृत्ती, २००६

२. कोत्तापल्ले नागनाथ (संपा.) : स्त्री–पुरुष तुलना, सायन पब्लिकेशन, पुणे, २०१६

३. खोले विलास (संपा.) : ताराबाई शिंदेलिखित स्त्रीपुरुष तुलना, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९७

४. पाटील सीताराम : महात्मा जोतीराव फुले चरित्र, १९२५ मनोविकास प्रकाशन, पुणे, २००१

५. पिंजण तुकाराम हनुमंत : संत कबीराची प्रेरणा, आम्ही पाहिलेले फुले, (संपा.), नरके हरी, म. फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, प्रथमावृत्ती, १९९३

६. फडके य. दि. : जोतीरावांचे कर्तबगार सहकारी, (संपा.) नरके हरी, म. फुले : शोधाच्या नव्या वाटा, म. फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, प्रथमावृत्ती, १९९८

७. मालशे सं. गं. (संपा.) : कै. ताराबाई शिंदेकृत स्त्रीपुरुष तुलना, मुंबई, मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई, १९७५.

८. O’hanlon, Rosalind, A comparsion Between Women and Men : Tarabai Shinde and the Critique of Gender Relations in Colonial India, Oxford University Press, Madras, 1994.


## २.७ उपक्रम

सत्यशोधक चळवळीतील स्त्रियांची चरित्रे मिळवून वाचा.

घटक ३

# ‘स्त्री-पुरुष’मधील सामाजिक-धार्मिक सांस्कृतिक संदर्भ, पुरुषप्रधान व्यवस्थेची चिकित्सा, स्त्रीवादी पुनर्वाचनाचे स्वरूप इ.

## ३.१ उद्दिष्टे

या घटकाच्या अध्ययनानंतर विद्यार्थ्यांना,

१. ‘स्त्री-पुरुष तुलना’मधील धार्मिक, सामाजिक संदर्भांचे विश्लेषण करता येईल.

२. ताराबाई शिंदे यांनी पुरुषप्रधान व्यवस्थेची केलेली चिकित्सा सांगता येईल.

३. स्त्रीवादी पुनर्वाचनाचा दृष्टिकोन प्राप्त होईल.

## ३.२ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रहो, दुसऱ्या घटकामध्ये आपण ‘स्त्री-पुरुष तुलना’ या निबंधामधील आशयसूत्रे समजून घेतली. या निबंधामध्ये तत्कालीन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचे अनेक संदर्भ आलेले आहेत. धर्मव्यवस्था, पुरुषप्रधान व्यवस्था यांचे स्त्रीवादी दृष्टिकोनातून पुनर्वाचन केले आहे. या निबंधामधून सामाजिक, सांस्कृतिक अभ्यासाचा एक दृष्टिकोन व्यक्त होतो. या साऱ्या घटकांचा अभ्यास आपण प्रस्तुत घटकामध्ये करणार आहोत. त्यामुळे आपणांस समाज- सांस्कृतिक-स्त्रीवादी अभ्यासपद्धतीचाही परिचय होईल.

## ३.३ विषय विवेचन

स्त्री-पुरुष तुलना’ या निबंधामध्ये राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचे पुढील संदर्भ आलेले आहेत-

### ३.३.१ ‘विजयालक्ष्मी’ प्रकरणाचा खटला

गुजरातमधील ‘विजयालक्ष्मी’ प्रकरणाचा खटला ताराबाईंच्या वाचनात आला व स्त्रियांसंदर्भातील लिंगभेद, सामाजिक धारणा, शोषण यांनी त्यांच्या विचारप्रक्रियेला गती दिली. त्यामुळे विजयालक्ष्मी प्रकरणाची हकीगत समजून घेण्याची गरज आहे. इ. स. १८८१ सालची ही घटना आहे. सुरतजवळील उलपाड या गावी राहणाऱ्या विजयालक्ष्मी नावाच्या ब्राह्मण विधवा तरुणीने भ्रूणहत्या केल्याचा आरोप ठेवून तिच्यावर सेशन्स कोर्टात खटला भरण्यात आला व या प्रकरणात तिला फाशीची शिक्षा झाली. या शिक्षेवर मुंबई उच्च न्यायालयात अपील करण्यात आले. त्या वेळचे न्यायाधीश वेस्ट व न्यायाधीश पिन्ही यांच्यासमोर

हा खटला चालला. या प्रकरणात सेशन कोर्टाने दिलेली फाशीची शिक्षा जन्मठेपेवर व पुढे जन्मठेपेवरून पाच वर्षांवर झालेली दिसते. या खटल्याला खूप मोठी प्रसिद्धी मिळाली. 'द टाइम्स ऑफ इंडिया' च्या २६ व २७ मे १८८१ च्या अंकांमध्ये या खटल्याची बातमी, निकालपत्र व त्यावरील अग्रलेख प्रसिद्ध झाला आहे. याशिवाय 'द बॉम्बे समाचार', 'अखबारे सौदागर', 'द रस्ट गफ्तार', 'द गुजराती', 'इंदुप्रकाश', 'इंडियन स्पेक्टॅटर' यांसारख्या प्रमुख वृत्तपत्रांमध्ये या खटल्याविषयी अनुकूल प्रतिकूल मजकूर छापून आला. समाजामध्येही त्याविषयी उलटसुलट खूप चर्चा झाली. एक प्रकारे तत्कालीन समाजजीवन ढवळून निघाले. सार्वजनिक सभेने दि. ५ जून १८८१ रोजी सरकारला पत्र लिहून विजयालक्ष्मीस दया दाखवून शिक्षा माफ करण्याचे आवाहन केले होते.

या सर्व प्रकरणामध्ये चर्चेच्या केंद्रस्थानी मुख्य विषय असा होता की, अशा परिस्थितीत सापडलेल्या आईने आपल्या बाळाची हत्या केल्यास तिला कठोर शिक्षा करावी की करू नये? विजयालक्ष्मीचे प्रकरण हे काही अपवादात्मक नव्हते. त्या काळात अनेक विधवांच्या जीवनात अशा प्रकारच्या दुर्दैवी घटना घडत. बालविवाह व पुढे अकाली प्राप्त झालेले वैधव्य हे या घटनांच्या मुळाशी होते. विजयालक्ष्मी प्रकरणाच्या वृत्तपत्रांमध्ये व समाजामध्ये सुरू झालेल्या उलटसुलट चर्चेमुळे ताराबाई अस्वस्थ झाल्या. समाजाची स्त्रीकडे व स्त्रीप्रश्नांकडे पाहण्याची दृष्टी, स्त्रीची बदनामी करणारी पुरुषी व्यवस्था यांविषयीचा संताप त्यांच्या मनामध्ये निर्माण झाला व त्यांनी एकंदर व्यवस्थेची चिकित्सा करण्याच्या उद्देशाने 'स्त्रीपुरुष तुलना' हा ग्रंथ लिहिला.

### ३.३.२ संस्कृत व मराठी साहित्याचे संदर्भ

संस्कृत, मराठी, गुजराती, इंग्रजी, हिंदी आदी भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. ताराबाईंचे वाचन चौफेर होते. समकालीन वृत्तपत्रे, नियतकालिके, ग्रंथ, वैचारिक निबंध, संतसाहित्य, पंडिती साहित्य, म. फुल्यांचे लेखन, मराठी कथा, कादंबऱ्या, संस्कृत साहित्य, इंग्रजी साहित्य आदींचे त्यांचे वाचन असावे, असे 'स्त्री-पुरुष तुलना'वरून अनुमान निघते. त्यांच्या लेखनात संस्कृत व मराठी साहित्याचे, ग्रंथांचे, व्यक्तींचे अनेक संदर्भ आले आहेत. रामायण, महाभारत, जैमिनी, अश्वमेध इत्यादी संस्कृत साहित्य, श्रीधरस्वामी नाझरेकरांचे रामविजय, पांडवप्रताप आदी ग्रंथांचे संदर्भ ताराबाईंच्या लेखनात येतात. एकोणिसाव्या शतकामध्ये मराठी ललित साहित्यामध्ये जे स्त्रीचित्रण झाले, त्याची समीक्षा ताराबाईंनी केलेली आहे. लक्ष्मण मोरेश्वरशास्त्री हळबे यांची 'मुक्तामाला' (१८६१) ही कादंबरी, नारो सदाशिव रिसबूडकृत 'मंजुघोषा' (१८६७) कादंबरी, रामजी गणोजीकृत 'स्त्रीचरित्र', महादेव बाळकृष्ण चितळे यांचे 'मनोरमा' (१८७१) हे नाटक यांचे स्त्रीवादी पुनर्वाचन ताराबाईंनी केले आहे. या सर्व साहित्यामधील स्त्रीचित्रण खोटे, कल्पित, अवास्तव, स्त्रियांवर अविश्वास प्रकट करणारे आणि स्त्रियांच्या समस्या नीट न समजून घेणारे आहे. तसेच हे साहित्य वास्तवापासून शेकडो योजने दूर असणारे व स्वप्नरंजनाच्या पातळीवर वावरणारे आहे, असे निरीक्षण ताराबाईंनी नोंदविले आहे. वरील चारही कलाकृतींची ताराबाईंनी केलेली समीक्षा

मुळापासून वाचण्यासारखी आहे. ताराबाईंनी या चारही कलाकृती किती बारकाईने वाचल्या होत्या, हे त्यांच्या सूक्ष्म चिकित्सेवरून लक्षात येते.

ताराबाईंच्या समीक्षेसंदर्भात ज्येष्ठ समीक्षक विलास खोले म्हणतात, ''ज्या काळात स्त्रीवाद वा स्त्रीवादी समीक्षा असे शब्दप्रयोगदेखील नव्हते; एक 'नावल व नाटक ह्यांविषयी निबंध' (१८७२) हे लेखन सोडले तर वाङ्मयविचारही सुरू झाला नव्हता, त्या काळात ताराबाईंनी मराठी साहित्यातील पुरुषांनी केलेल्या स्त्रीचित्रणाचा चिकित्सक परामर्श घ्यावा ही घटना समीक्षेच्या इतिहासात महत्त्वाची आहे. पुरुषी दृष्टिकोनातून केलेले विपरीत स्त्रीचित्रण, संभवनीयतेचा मुलाहिजा न ठेवता आणि स्त्रीचा स्वभाव, स्त्रीचे वर्तन, स्त्रीचे अनुभव यांविषयीचा कोणताही अधिकृत अनुभव नसताना केलेली काल्पनिक मांडणी, असमंजस आकलन असे आक्षेप ताराबाईंनी नोंदविले आहेत... स्वतंत्रपणे विचार करून आपला टीकाविवेक मांडण्याची ताकद त्यांच्या लेखणीत आहे. घटना, प्रसंग, व्यक्तिरेखा यांच्या निर्मितीसोबत साहित्यात मूल्यविचारही प्रकटत असतो, याची त्यांना असणारी समज त्यांच्या प्रतिपादनातून प्रकटते. ललित साहित्यातील स्त्रीचे चित्रण हे पुरुषाच्या सुखोपभोगाचे साधन म्हणून ताराबाईंना अत्यंत आक्षेपार्ह वाटते. त्यांच्यापाशी असणारी ही मूल्यदृष्टी म्हणजे समीक्षेच्या क्षेत्रात निश्चितपणे पडलेली मूल्यवान भर आहे (कित्ता : ५२). ताराबाईंचे चौफेर वाचन आणि त्यांनी स्वतंत्र बुद्धीने व स्त्रीवादी दृष्टीने केलेली ग्रंथचिकित्सा पाहता त्यांना मराठीतील पहिल्या समीक्षिका म्हणता येईल.

### ३.३.३ तत्कालीन सामाजिक –सांस्कृतिक स्थितीचे चित्रण

ताराबाईंच्या काळामध्ये व त्यांच्या नजीकच्या काळामध्ये ब्राह्मण, मराठे यांच्यामध्ये विधवांचे पुनर्विवाह होत नव्हते. त्यांच्यामध्ये विधवांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर होते, हे 'स्त्री-पुरुष तुलना'च्या प्रस्तावनेवरून स्पष्ट होते. ''...पुनर्विवाह ब्राह्मणातच होत नाही असे काही नाही. ...जे मराठे मऱ्हाठशाईला मरतात, त्या त्यांचे कुळात तर ब्राह्मणांपेक्षाही पुनर्विवाह न होण्याची सक्ती दिसून येते.'' असे निरीक्षण ताराबाईंनी नोंदविले आहे.

कुटुंबव्यवस्थेतील, पती-पत्नी नातेसंबंधांतील बदलांचाही वेध ताराबाईंनी घेतला आहे. 'पतिव्रतेचा स्त्रीधर्म' पूर्वी बंधनकारक होता. तो काटेकोर पाळण्याकडे कटाक्ष होता. परंतु इंग्रज राजवटीत, बदलत्या कालमानानुसार त्यामध्ये बराच बदल झालाअसल्याचे उदाहरणासह ताराबाईंनी नोंदविले आहे. पूर्वीप्रमाणे नवऱ्याची मुकाट सेवा करीत सर्व काही सोसण्याचे दिवस आता राहिले नाहीत. काळ बदलला आहे. बायकांचे, स्त्रियांचे विचार, वर्तन बदलले आहे. 'नवरा कसाही दुर्गुणी असलातरी त्याला देवाप्रमाणेच मानून कोण वागेल बरे?' असा सवाल ताराबाईंनी केला आहे.

ताराबाईंना समकालीन सामाजिक-सांस्कृतिक परिस्थितीची उत्तम जाण होती. त्या कुशाग्र बुद्धीच्या, चौकस व स्वतंत्र विचार करणाऱ्या होत्या. इंग्रजी अमदानीत समाजजीवनात झालेले बदल ताराबाईंनी नेमके टिपले आहेत. इंग्रज लोकांचा प्रभाव देशी लोकांच्या चालीरीतीवर, वेषभूषेवर, केशभूषेवर, सौंदर्यप्रसाधनांवर

वगैरे कसा पडत चालला आहे, हे ताराबाईंनी नेमके नोंदविले आहे. राजेरजवाड्यांच्या पूर्वीच्या भरजरी, राजेशाही पोशाखाच्या चाली बदलून गेल्या आहेत. स्त्रियांच्या अंगात कोट, लांब बाह्यांचे चुणीदार कुडते, पायात बूट आले आहेत. गळ्यात बारीक पोतीचे मंगळसूत्र, कपाळवर बारीक कुंकू, पातळ, चोळी घालण्याकडे स्त्रियांचा कल वाढल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदविले आहे.

इंग्रजी राजवटीत स्त्रियांच्या व पुरुषांच्या वेशभूषेत, दागिन्यांत झालेल्या बदलांवर त्यांनी मार्मिक भाष्य केले आहे. इंग्रजी राजवटीमध्ये पूर्वीची सुबत्ता जाऊन देशास 'आवदसा' येऊ लागली आहे. धनवड, नागपूर, बऱ्हाणपूर, सोलापूर, अहमदाबाद येथील बाजारपेठा लयास जात आहेत. स्वदेशी रोजगार बुडून हरएक प्रकारचे व्यापारी व कसबी कारागीर लोक उपाशी मरू लागले आहेत. वैभव हारत चालले आहे, असे निरीक्षण ताराबाईंनी नोंदविले आहे. राजकीय सत्तांतरामुळे वाढत चाललेले आर्थिक व सांस्कृतिक दारिद्र्य, औद्योगिकीकरण, वसाहतवाद, पुरुषप्रधान समाजव्यवस्था व वस्तुकरण यांच्यातील दुवे दाखविण्याचा प्रयत्न ताराबाईंनी केला आहे. औद्योगीकरण व वसाहतवादाबरोबरच पुरुषांचे भिकारचाळे, भ्रष्टाचार यांना त्यांनी या दुरवस्थेबद्दल जबाबदार धरले आहे. विधवा स्त्रियांच्या व गरीब कारागीरादी लोकांच्या दैन्यवस्थेच्या कळवळ्यापोटी पुरुषांनी पाश्चात्त्यांचे बाह्य अंधानुकरण सोडून 'स्वदेशाभिमानी' व्हावे व 'स्त्रियांना दोषपात्र करून रसातळी न घालावे' असे ताराबाईंनी म्हटले आहे (कित्ता : ८०). अर्थव्यवस्थेवर झालेल्या इंग्रजी राजवटीच्या परिणामांची नोंद त्यांनी घेतली आहे.

एकोणिसाव्या शतकातील सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचे काही पैलू त्यांच्या लेखनातून प्रकट होतात. तत्कालीन मराठी लोकांची वस्त्रप्रावरणे, अलंकार, दागिने, वस्तू, इंग्रजी राजवटीमध्ये त्यात होत असलेले बदल यांचे काही उल्लेख ताराबाईंनी केले आहेत. उदा. पारंपरिक पोशाख – किनखापाचे भरजारी पोशाख, शिरपेच, मंदील, चंदेरे दुपेटे, पैठणी, लफेदार पागोटे, नागपुरी धोतरजोडे, लालचटक नरम गादीचे चर्मी जोडे इत्यादी. आधुनिक पोशाख – कोट, लांब बाह्याचे चुणीदार कुडते, बूट इत्यादी. पुरुषांचे दागिने – गोफ, कंठी, कडे इत्यादी. स्त्रियांचे दागिने – मंगळसूत्र, सर, कुंकू इत्यादी. स्त्रियांचे पोशाख – पातळ, चोळी, गाऊन इत्यादी. एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील दागदागिने, वस्त्रप्रावरणे यांचा परिचय या लेखनातून आपणांस होतो. महाराष्ट्राचा सामाजिक, सांस्कृतिक इतिहास लिहिण्यासाठी ताराबाईंचे हे उल्लेख महत्त्वाचे ठरतात.

### ३.३.४ राजकीय संदर्भ

ताराबाई शिंदे यांच्या लेखनामध्ये प्रदीर्घ ऐतिहासिक काळातील महत्त्वाच्या बिंदूवरील भाष्य आढळते. त्यांनी एक प्रकारे लेखनासाठी ऐतिहासिक पद्धती अवलंबली आहे. रामायण-महाभारत यांसारखी महाकाव्ये, पुराणे यांच्यापासून पंडित कवी श्रीधर ते समकालीन ललित साहित्याचे संदर्भ व त्यावरील भाष्य त्यांच्या लेखनात येते.

तत्कालीन राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थितीची उत्तम जाण त्यांना होती. इंग्रजी राजवटीबद्दल ताराबाईंना आस्था होती. त्याची कारणे त्यांच्या लेखनामध्ये दिसून येतात. सनातन्यांच्या विरुद्ध बोलत असताना इंग्रज सरकारची बाजू घेऊन त्या लिहितात, ''अरे, तुम्ही असे अट्टल हुशार कोल्हे, तरी इंग्रज सरकारचे, ईश्वर असे सदोदित चिरकाल राज्य कायम ठेवो. हा राजा झाल्यापासून स्त्रियांना विद्यादान देऊन त्यांची मने नेहमी सर्व मानसिक व व्यावहारिक प्रसंगांत धैर्याने राहण्यास पुष्कळ तऱ्हेने बळकट झाली आहेत. त्यामुळे त्यांचे हृदयात जे अज्ञान वसत होते ते जाऊन त्यांना आता आपले बरेवाईट कोणाशी कसे वागावे, हा संसाराचा गाडा कसा हाकावा, सत्यता, स्वधर्म, पातिव्रत्य यांविषयी त्यांना चांगले समजू लागले व त्यामुळे आपल्या या भरतखंडाची स्थिति अगदी बदलून जाईल.''

आणखी एका ठिकाणी इंग्रज सरकारबद्दल ताराबाई लिहितात, ''अरे, ज्यांनी तुमच्या देशास देशाची व मनुष्यास मनुष्याची कळा आणून मनुष्य करून दाखविले. पूर्वी तुम्ही माणसेच होता. पण अगदी विद्याहीन मुर्ख... मराठशाईत जे बेबंद होते ते खंड मोडून तुम्हास विद्यादान कोट्यावधि रुपये खर्चून दिले. नाना प्रकारचे कलाकौशल्य, कायदेकानून, ठिकठिकाणी कचेऱ्या दरबार करून सर्व स्वस्थता राखिली... रात्रीस सोन्याचे गोळे पाठीशी बांधून चालले जा. कशाची भीति नाही. असे हे जे सरकार त्याने तुमच्याकरिता तर सारेच सुखोपचार केले आणि त्यांनी या धर्मात हात घालून, अबलांस सबला करून त्यांना तुमच्या या पोकळ धर्मरूप यातनेतून त्यांनी न सोडवावे तर कोण सोडवील बरे?''

वरील उताऱ्यावरून इंग्रज सरकारबद्दल ताराबाईंची काय मते होती, हे दिसते. इंग्रजी राजवटीत विद्येची दारे खुली होणे, सर्वांना समान वागणूक, कायदा व सुव्यवस्था इ. बाबींचे ताराबाईंना मोठे कौतुक वाटत होते व याबद्दल त्यांनी इंग्रज सरकारची पाठराखण केली आहे. लोकहितवादी, म. फुले यांनीही ताराबाईंप्रमाणे इंग्रजी राजवटीतील सामाजिक बदलांचे स्वागत केले होते.

### ३.३.५ आर्थिक परिस्थितीचे संदर्भ

राजकीय सत्तांतराच्या सामाजिक, आर्थिक परिणामांचीही ताराबाईंना उत्तम जाण होती. ''सांप्रत सर्व पहिली सुदशा जाऊन आपल्या देशास आवदसा येऊ लागली. पांचपांचशे रुपयांचे शालू, पैठण्या गेल्या. धनवड, नागपूर, बऱ्हाणपूर, सोलापूर, अहमदाबाद ह्या पेठा लपल्या आणि त्यांच्याऐवजी घरोघर पातळाचे सोळा हात तुकड्यांची निशाणी लागली'' हे त्यांचे तत्कालीन आर्थिक स्थितीचे निरीक्षण मार्मिक आहे. इंग्रजी राजवटीचा देशी अर्थव्यवस्थेवरील परिणाम नोंदविताना त्यांनी लिहिले आहे की, ''...सर्व प्रकारचे आपले स्वदेशी रोजगार बुडून, हरएक प्रकारे व्यापारी व कसबी कारागीर लोक उपाशी मरू लागले. वैभव हाटत चालले.'' अर्थव्यवस्थेतील नेमके बदल टिपणाऱ्या ताराबाई स्वतंत्र विचारांच्या व प्रगल्भ समाजभान असणाऱ्या होत्या, हे त्यांनी केलेल्या नोंदींवरून स्पष्टपणे दिसून येते.

### ३.३.६ पोकळ सुधारकांचा धिक्कार

एकोणिसावे शतक हे समाजप्रबोधनाचे, समाजसुधारणेचे, नवविचार प्रवर्तनाचे, विचारकलहाचे, जागृतीचे शतक मानले जाते. समाजसुधारकांची एक परंपरा या शतकात आढळते. अर्थात या सुधारकांचे वर्गीकरण दोन प्रकारांमध्ये केले जाते. एक, बोलके सुधारक व दोन, कर्ते सुधारक. बोलक्या सुधारकांच्या वर्तनातील बोलघेवडेपणाचा ताराबाईंनी तीव्र शब्दांमध्ये धिक्कार केला आहे. ''अरे, तुम्ही केवळ इसापनीतीतील उंदीराच्या सभेतील उंदरांप्रमाणे आहात. 'मांजराचे गळ्यात घांट बांधावी' हे खरे, तोंडाने मात्र म्हणतां, पण पुढे होतो कोण? सभा भरवितांना सभा भरली म्हणजे तेथे काय मोठी शालजोडी, लफेदार पागोट्यांचा झोंक लावून डौलाने जाऊन पल्लाभर सुपारी, दहा गाडे विड्याची पाने, हारतुरे, एक हौदभर गुलाबी अत्तराचा सत्यानास करून घरी यावयाचे एवढेच काय ते. दुसरे काही नाही. या अशा तुमच्या पोकळ सभा तर तीस पसतीस वर्षांपासून चालल्या आहेत. उपयोग काय? तुम्ही तुम्हाला आपल्या ठिकाणी धन्य धन्य मानून घ्या.'' अशा कठोर शब्दांत ताराबाईंनी पोकळ सार्वजनिक सभांचा व तेथील बोलघेवड्या सुधारकांचा धिक्कार केला आहे. या कथित पुरुषांच्या मनातील स्त्रियांच्याविषयीची उपेक्षाबुद्धी व त्यांच्या आचरणातील शूद्रता त्यांनी जाहीरपणे उघडी पाडली आहे. 'तीस पसतीस वर्षांपासून चालत आलेल्या पोकळ सभा' असे म्हणत असताना त्यांच्यासमोर परमहंस सभा, प्रार्थना समाज आणि सार्वजनिक सभा यांची नावे होती, हे उघड आहे.

सार्वजनिक सभेच्या एका पुस्तकामध्ये लिहिले होते की, स्त्रियांना सती जाण्याची मोकळीक देईल तर बरे?'' या विधानाचा खरपूस समाचार घेताना ताराबाई लिहितात, ''स्त्रिया सती जाऊन तुम्ही त्यांच्या मागे गवऱ्या वळायला कां राहता? तुमच्या बायका मेल्या म्हणजे तुम्ही त्यांच्याबरोबर कां सती जाऊ नये बरे?''

### ३.३.७ पौराणिक संदर्भ

ताराबाईंच्या लेखनात अनेक ठिकाणी पौराणिक संदर्भ आले आहेत. रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप, जैमिनी, अश्वमेध इत्यादी ग्रंथांतील अनेक दाखले त्यांनी दिले आहेत. त्या पाठीमागे त्यांची चिकित्सेची भूमिका आहे. वर्तमानकालीन स्त्रियांच्या जीवनवास्तवाचा संदर्भ घट्ट पकडून त्यांनी पुराणामध्ये देवतारुण मानलेल्या व्यक्तींच्या वर्तनावर चिकित्सेचे झगझगीत क्ष किरण टाकले आहेत व त्यातील विसंगती उघडी केली आहे. अहिल्या, द्रौपदी, सीता–तारा, मंदोदरी पतिव्रतांच्या कक्षांची त्यांनी परखड चिकित्सा केली आहे. तसेच भारद्वाज, शृंगऋषी, गर्दभऋषी, वृषभऋषी यांसारख्या ऋषींचे कूळ शोधले आहे व त्यांनी केलेले शास्त्रनियम पशूसारखेच असणार, अशी टीका केली आहे. राजहट्ट, बालहट्ट व स्त्रीहट्ट यांचा उल्लेख करून कैकयीच्या स्त्रीहट्टासंदर्भातील श्रीधरकवींच्या 'रामविजय'मधील स्त्रीनिंदक ओव्या उद्धृत करून त्यांनी या ग्रंथाचा झडझडून झाडा घेतला आहे. पुरुष स्वतःवरून पारख करून स्त्रियांना दुर्गुणांची खाण समजतात, ही गोष्ट सांगताना युधिष्ठिरास सारे ऋषिमंडळ सत्पात्र तर दुर्योधनास ते अपात्र वाटते, ही राजसूय यज्ञातील

कथा त्यांनी चपखल रीतीने दिली आहे. स्त्रीचे श्रेष्ठत्व सांगताना सीताविरहित रामाचे दर्शन घेण्यास रामाने दिलेला नकार व रामाने सीतेसाठी केलेला शोक (रामविजय) या गोष्टी त्यांनी उद्धृत केलेल्या काही कथांचे संदर्भ त्यांच्या लेखनामध्ये आले आहेत. सावित्रीकथा, सुभद्राहरण, सीताहरण इत्यादी कथांवर त्यांनी भाष्य केले आहे. याशिवाय शंकर, हरिश्चंद्र, शिबी, गौतम, जैमिनी, व्यास, विश्वामित्र, विदूर, कर्ण, अर्जुन, भगीरथ, भरत, अगस्ती, रावण, बिभीषण, पराशर, इंद्र इत्यादी अनेक पौराणिक व्यक्तींचे दाखलेवजा उल्लेख त्यांनी केले आहेत.

श्रीधरस्वामींची पुरुषी मानसिकता त्यांनी नोंदवली आहे. तारेला दिलेल्या सल्ल्याच्या संदर्भात श्रीधरस्वामींनी रामाला कसे सावरून धरले आहे, हे सांगताना लिहितात की, ''पण स्वामीला तेव्हा येवढे कसे नाही कळले की, हा कित्ता पुढे सारे वळणशुद्ध वळवितील. काय करतील हो! सुग्रीवाचे राज्याभिषेकाचे गर्दीत द्रव्याच्या मोटा बांधण्याचे धांदलीत विसरले. नाहीतर आणखी एखादी ओवी जरा धास्ती बसण्याजोगी लिहिली असती.'' श्रीकृष्ण राहीरूपाने चंद्रावळीच्या पातिव्रत्याच्या पातिव्रत्याचा भंग करतात, त्यावर ताराबाई त्वेषाने लिहितात, ''अरे, तुमचे देवदेखील दगाबाज; मग तुम्ही असालच असाल. यांत नवल काय?'' सीतेने रावणाला वश व्हावे म्हणून मंदोदरी तिचे मन वळविण्याचा प्रयत्न करते, या कथेवर उपरोधिक भाष्य करीत ताराबाई लिहितात, ''पतिवचन मान्य करून त्यांची मर्जी राखून आपल्या पातिव्रत्य नेमास दुसऱ्याची बायको भापाथुपा देऊन स्वामीचे हवाली केली तर कांहीएक दोष नाही, उलट मंदोदरीसारखे पुराणांत नाव गाजेल, तेंव्हा असा हा एक दोहोअर्थी मासला. म्हणजे तिकडे नवऱ्याची मर्जी बायकोने ही मोठी कामगिरी बजावली म्हणून नवरा खूष. इकडे आपण आपला नेम राखला म्हणून बायको खूष. तिसरीच बिचारी फाशांत पडली. दोघांचे बापाचे काय गाठोडे गेले बरे. वाहवा रे देवा! धन्य त्या पतिव्रता!!''

वरील उदाहरणे वानगीदाखल आहेत. पुराणातील दाखले, कथा वगैरेंची तर्ककठोर चिकित्सा त्यांनी पानोपानी केलेली आढळते. यातून त्यांच्या चौफेर वाचनाचे, बहुश्रुततेचे व चिकित्सक, स्वतंत्र प्रज्ञेचे लखलखीत दर्शन घडते.

### ३.३.८ स्त्रीवादी पुनर्वाचन

ताराबाई शिंदे यांनी भारतीय समाजव्यवस्थेचे, संस्कृतीचे, साहित्यादी महाकाव्ये-पुराणे आदींचे, मिथक-परंपरांचे स्त्रीवादी पुनर्वाचन करण्याचा एक धारदार, तर्कशील, बुद्धिवादी विचारव्यूह मांडला व त्याप्रमाणे त्यांनी येथील पुरुषसत्ताक समाजधर्मव्यवस्थेचे निर्भीडपणे पुनर्वाचन केले. त्यातून स्त्रीवादी पुनर्वाचनाची एक दृष्टी त्यांनी दिली. उदा. द्रौपदी, अहिल्या, कुंती, तारा, मंदोदरी यांना महान पतिव्रता मानले जाते. परंतु ताराबाईंनी त्यांच्या कथांची चिकित्सा केली आहे. त्याकथांमधील मोकळ्या जागा दाखवून दिल्या आहेत. उदा. 'द्रौपदी पाच नवऱ्यांची बायको असून ही कर्ण महाराजांचे अंतर्यामी चिंतन करीत होती की नाही' असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. अहिल्या, कुंती, तारा, मंदोदरी यांच्या

कथांचीही त्यांनी तार्किक चिकित्सा केली आहे. शास्त्र-पुराण-पोथ्यांचे डोळे मिटून श्रवण-अनुकरण करण्यापेक्षा डोळस परीक्षण करण्याची, सत्यान्वेषी दृष्टी त्यांनी दिली आहे.

ऋषींच्याविषयी एक कमालीचा गूढभाव, भय लोकमानसात आढळते. 'नदीचे मूळ व ऋषीचे कूळ शोधू नये' अशी म्हणच लोकमानसामध्ये प्रचलित आहे. परंतु ताराबाईंनी सत्यशोधकाच्या भूमिकेतून ऋषींच्या कथांचे पुनर्वाचन करून त्यांचे मूळ शोधले आहे व ते लख्खपणे समाजासमोर मांडले आहे. त्या लिहितात, ''तेंव्हाचे ऋषि तरी काय? कोणी हरणीचे पोटी झाले; ते कोण श्रृंग ऋषि, कोणी पाखराचे पोटी झाले; ते भारद्वाज, कोणी गाढविचे पोटी झाले; ते गर्धभऋषि; गायीचे पोटी झाले ते वृषभऋषि. तेंव्हा त्यांनी आपले पशूप्रमाणे लिहून ठेविलें झाले.'' ऋषींच्या नावांच्या उत्पत्तीची उकल करून त्यांनी ऋषींच्या महात्म्याचे, दहशतीचे जे प्रतीकात्मक भय लोकमानसांवर हजारो वर्षे बसले होते, ते ताराबाईंनी कोठल्या कोठे पळवून लावले. एक प्रकारे सांस्कृतिक पुनर्मांडणीसाठी पारंपरिक प्रतिमाभंजनाचा यशस्वी प्रयोग त्यांनी केला.

सती-सावित्री कथा ही भारतीय लोकमानसामध्ये कमालीची लोकप्रिय आहे. तिचा भारतीय समाजमनावर विशेषतः स्त्रियांवर खूप मोठा प्रभाव आहे. ताराबाईंनी सावित्रीकथेचे केलेले पुनर्वाचन समस्त पुरुषवर्गाला निरुत्तर करणारे आहे. त्या लिहितात, ''...स्त्रीजातीत सावित्री तरी आपले पतीचा प्राण परत आणण्याकरिता यमदरबारात जाऊन आली. पण पुरुषांमध्ये कोणीतरी आपले बायकोचे प्राणांकरितां यमराजाचे दरबारांत तर नाहीच पण उगीच त्या दरबाराच्या वाटेवर तरी गेलेला कोठे ऐकण्यात आला आहे काय?''

वरील उदाहरणे वानगीदाखल आहेत. 'स्त्री-पुरुष तुलना' हा निबंधच पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेच्या स्त्रीवादी पुनर्वाचनाचा जाहीरनामा आहे. 'स्त्री-पुरुष तुलना'मध्ये पानोपानी भारतीय संस्कृती व समाजव्यवस्थेचे पुनर्वाचन केलेले आहे.

## ३.४ समारोप

प्रस्तुत घटकामध्ये आपण 'स्त्री-पुरुष तुलना' या निबंधामधील सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन, राजकीय संदर्भांचा अभ्यास केला. कोणतीही कलाकृती काळाचे अपत्य असते. भूतकाळ व वर्तमानकाळाची मीमांसा करीत काही एक विधान करण्याचा प्रयत्न श्रेष्ठ कलाकृती करीत असते. 'स्त्री-पुरुष तुलना' या निबंधामध्ये धर्मसंस्था, देव, ऋषी, शास्त्र-ग्रंथ-पुराणे, महाकाव्ये, आधुनिक साहित्य, शास्त्रकर्ते-पुराणकर्ते अशा अनेक घटकांचे संदर्भ येतात. ते सहजासहजी येत नाहीत. हे व अशा घटकांनी मिळून पुरुषसत्तावादी समाजव्यवस्था-धर्मव्यवस्था कशी आकाराला आली आहे व त्यामध्ये पुरुषी हितसंबंधांचे संवर्धन कसे केले आहे, हे चिकित्सक युक्तिवादाने ताराबाई शिंदे यांनी सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच इंग्रजपूर्व राजवट व त्या वेळची सामाजिक, धार्मिक स्थिती, त्यामध्ये स्त्रियांचे स्थान, इंग्रजी राजवटीतील बदल, सामाजिक-आर्थिक-सांस्कृतिक जीवनातील स्थित्यंतरे, भौतिक, सांस्कृतिक,

वैचारिक विश्वामधील बदल अशा भोवतालच्या महत्त्वाच्या व औचित्यपूर्ण नोंदी करीत आपला मुद्दा प्रभावीपणे मांडण्याचा ताराबाईंनी प्रयत्न केला आहे. सामाजिक-सांस्कृतिक अभ्यासपद्धतीचे एक प्रात्यक्षिक प्रस्तुत निबंधामधून प्रत्ययास येते. सांस्कृतिक अभ्यासपद्धती (कल्चरल स्टडी)चा उदय अगदी अलीकडचा असला तरी एकोणिसाव्या शतकाच्या आठव्या दशकात ताराबाई शिंदे यांनी समाज-सांस्कृतिक अभ्यासपद्धतीचा पाया घालून भारतीय संदर्भात त्याचे प्रत्यक्ष उपयोजन केलेले आपल्या निदर्शनास येते. स्त्रीवादी दृष्टिकोनामधून व्यवस्थेचे पुनर्वाचन व पुनर्मांडणी कशी करावी, याचेही काहीएक सैद्धांतिक व उपयोजनात्मक प्रारूप प्रस्तुत निबंधामधून पुढे येते. म्हणून या निबंधाचे वैचारिक व उपयोजनात्मक मूल्य खूप मोठे आहे.

## ३.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

### ३.५.१ वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न

१. ताराबाई शिंदे यांनी कोणत्या पंडित कवीच्या लेखनावर भाष्य केले आहे?

अ. श्रीधर ब. मोरोपंत क. वामन पंडित ड. यांपैकी नाही.

२. ताराबाई शिंदे यांनी पुराणामधील कोणत्याकथांची चिकित्सा केली आहे?

अ. पतिव्रतांच्या ब. तुळशीच्या क. अवतार ड. लोककथा

३. गुजरातमधील कोणत्या खटल्याने ताराबाईंच्या विचारप्रक्रियेला गती मिळाली?

अ. सूरत ब. विजयालक्ष्मी क. शाहबानो ड. दक्षिणा

४. इंग्रजी राज्यातील कोणत्या गोष्टीमुळे ताराबाईंना आस्था वाटते?

अ. सर्वांसाठी शिक्षण ब. कायदा व सुव्यवस्था क. सर्वांना समान वागणूक

ड. अ, ब, क मधील सर्व बरोबर

५. 'अरे, तुम्ही केवळ इसापनितीतील उंदरांच्या सभेतील उंदीराप्रमाणे आहात' असे ताराबाईंनी कोणाला उद्देशून म्हटले आहे?

अ. इंडियन नॅशनल काँग्रेस ब. सार्वजनिक सभा क. दीनबंधु सार्वजनिक सभा

ड. सत्यशोधक समाज

**उत्तरे –** १ श्रीधर २. पतिव्रतांच्या ३. विजयालक्ष्मी ४. अ, ब, क मधील सर्व बरोबर ५. सार्वजनिक सभा

### ३.५.२ दीर्घोत्तरी प्रश्न

१. ताराबाई शिंदे यांच्या लेखनातील सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक संदर्भाचे स्वरूप सविस्तर स्पष्ट करा.

२. ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरुष तुलना'मध्ये राजकीय, सामाजिक, धार्मिक जीवनावर केलेले भाष्य तुमच्या शब्दांत लिहा.

### ३.५.३ लघुत्तरी प्रश्न

१. ताराबाई शिंदे यांच्या लेखनातून त्यांचा बहुश्रुतपणा कसा व्यक्त होतो ते सांगा.

२. ताराबाईंच्या लेखनामधील विजयालक्ष्मी खटल्याचा संदर्भ व स्वरूप स्पष्ट करा.

३. ताराबाईंच्या लेखनातील पौराणिक संदर्भांचा चिकित्सक परामर्ष घ्या.

४. ताराबाई शिंदे यांच्या स्त्रीवादी पुनर्वाचनाचे स्वरूप स्पष्ट करा.

५. ताराबाईंच्या समकालीन वाङ्मयाची केलेली चिकित्सा तुमच्या शब्दांत लिहा.

### ३.५.४ टीपा लिहा.

१. विजयालक्ष्मी खटला

२. ताराबाईंच्या लेखनातील वाङ्मयीन संदर्भ

३. ताराबाईंच्या लेखनातील सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ

४. 'स्त्री-पुरुष तुलना'मधील स्त्रीवादी पुनर्वाचन

५. ताराबाई शिंदे यांनी केलेली शास्त्र-पुराणांची चिकित्सा

### ३.६ संदर्भ ग्रंथ

**१.** कीर, मालशे, फडके (संपा.) : महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सहावी आवृत्ती, २००६

**२.** कोत्तापल्ले नागनाथ (संपा.) : स्त्री-पुरुष तुलना, सायन पब्लिकेशन, पुणे, २०१६

**३.**खोले विलास (संपा.) : ताराबाई शिंदेलिखित स्त्रीपुरुष तुलना, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९७

४. मालशे सं. गं. (संपा.) : कै. ताराबाई शिंदेकृत स्त्रीपुरुष तुलना, मुंबई, मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई, १९७५.

**३.७ उपक्रम**

तुमच्या परिसरातील स्त्रियांच्या आजच्या स्थितीचा शोध घेऊन त्यावर निबंध लिहा.

# घटक ४

# 'स्त्री पुरुष तुलना'– भाषिक व वाङ्मयीन वैशिष्ट्ये

## ४.१ उद्दिष्टे

या घटकाच्या अध्ययनानंतर विद्यार्थ्यांना,

१. ताराबाई शिंदे यांच्या लेखनाचे भाषिक व वाङ्मयीन विशेष सांगता येतील.

२. ताराबाई शिंदे यांच्या लेखनाचे वाङ्मयीन वेगळेपण सांगता येईल.

## ४.२ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रहो, या पूर्वीच्या घटकांमध्ये आपण 'स्त्री–पुरुष तुलना'मधील आशय, विषय, सामाजिक–सांस्कृतिक संदर्भ वगैरेंचा अभ्यास केला. 'स्त्री–पुरुष तुलना' हा निबंध आशयाबरोबरच भाषा व निवेदनशैलीमुळे प्रभावी व वेगळा ठरला आहे. प्रस्तुत घटकामध्ये आपण 'स्त्री–पुरुष तुलना'मधील भाषिक व वाङ्मयीन विशेषांचा अभ्यास करणार आहोत. त्यामुळे आपणांस ताराबाई शिंदे यांच्या शैलीचा परिचय होईल. एखादा श्रेष्ठ साहित्यिक त्याच्या कलाकृतीतील आशयाइतकाच शैलीच्या माध्यमातून कसा युगप्रवर्तक परिणाम करू शकतो, याचा प्रत्ययही आपणांस येईल.

## ४.३ विषय विवेचन

'स्त्री पुरुष तुलना'मधील भाषिक व वाङ्मयीन विशेष पुढीलप्रमाणे आहेत–

### ४.३.१ संवादी आवाहनात्मक भाषा

ताराबाई शिंदे यांच्या 'स्त्री–पुरुष तुलना' मधील सगळ्यात महत्त्वाची आहे ती त्यांची शैली. संवादी आवाहनात्मक भाषा हे ताराबाईंचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य. आपला प्रतिपाद्य विषय अधिक परिणामकारक करण्यासाठी त्यांचे निवेदन संवादाच्या रूपाने प्रकट होते. हा संवाद प्रामुख्याने पुरुषवर्गाशी केलेला असतो. पुरुषांशी संवाद करताना त्या कधी आक्रमक होतात, कधी वाक्ताडन करतात तर कधी त्यांच्यातल्या माणुसकीला आवाहन करतात.

पुरुषांचे लक्ष वेधण्यासाठी, त्यांची कानउघाडणी करण्यासाठी 'अरे' या संबोधनाचा वाच्यार्थाने पण काहीसा उपरोधिक, तुच्छतायुक्त वापर त्या करतात. 'अरे' या संबोधनाने पुरुषांशी संवाद साधणारी काही विधाने पाहा –

''अरे, जे तुम्ही सिंहासारिखे धैर्यवान, भगीरथासारिखे महाप्रयत्नी, अरे, तुम्ही निधडे शौर्यशाली वीर बनून...''

''अरे, तुमचा मोठेपणा व शौर्य घरातंच...''

''अरे, तुम्ही केवळ इसापनितींतील उंदराच्या सभेतील उंदीराप्रमाणे आहांत''

''अरे जी तुम्हांवर प्राणांपेक्षा अधिक प्रीति करिते...''

''अरे, नवऱ्याअधीं बायकोने मरावें किंवा नवऱ्यानें बायकोआधी मरावे याचा तुमच्या बापदादांनी देवांपासून काही दाखला आणला काय रे?''

''अरे, तुमचा शूरपणा जोंवर अजमावून पाहिला नाही तोंच तुमचा आब''

''अरे, तुम्ही असे अट्टल हुशार कोल्हे''

''अरे, तुम्ही देव ना! तुमच्याजवळ मुक्तद्वार, पक्षपात नाही ना मग हे काय रे!''

''अरे, तुमच्या हातून दया, परोपकार कधीच होणार नाही''

''अरे, तुम्ही तर जीव जाईस्तोपर्यंत स्त्रीमुख न्याहाळाल तरी तुमची इच्छा पुरी न होता तसेच अतृप्तच मराल''

''अरे, तुम्ही म्हणता ना की, आपल्या जिवावरून दुसऱ्याचा जीव जाणावा. मग येथे तुमचा जीव कोठे जातो?''

अशांसारखी संवादात्मक विधाने थेट आवाहन करतात. अर्थात या संवादातून पुरुषी वर्तनातील ढोंगीपणा, खोटेपणा, भित्रेपणा, दाखवेगिरी, क्रौर्य हे तर प्रकट होतेच, पण प्रत्येक विधानाची धाटणी वेगळी आहे. हे विधान कधी आवाहनात्मक आहे तर कधी आर्जवयुक्त आहे. उदाहरणार्थ, शेवटचे विधान केवळ आर्जवयुक्त आहे. म्हणजे प्रत्यक्ष संवाद घडताना ज्याप्रमाणे विविध पातळ्यांवर माणूस संवाद करतो, तसेच येथे झाले आहे. या सगळ्याच लेखनाला बोलण्याचे स्वरूप प्राप्त होते ते त्यामुळेच.

हा संवाद पुष्कळ वेळा स्वतःशी आणि स्त्री जातीशीही असतो. त्यावेळी ही लेखणी अधिकच परिणामकारक होते. उदाहरणार्थ, नवऱ्याची पूर्वीसारखी सेवा न करणाऱ्या स्त्रियांचे चित्रण त्यांनी प्रत्यक्ष संवादांतूनच केले आहे. या संदर्भात, 'नवऱ्यांनी अंघोळीचे नाव घेतले की, पाट मांडून घंगाळात ऊन पाणी विसावून...का? हे खरे ना? हा आताचा पतिव्रतापणा.' हा परिच्छेद पाहता येतो. त्या स्वतःशीही संवाद करताना दिसतात, 'सब घोडे बारा टक्के, अहा रे, धन्य तुमची!' हा उद्गार पुरुषांप्रमाणेच स्वतःशीही विस्मयाने

केलेला असतो. अशाप्रकारे कधी स्वतःशी, कधी स्त्रियांशी, कधी देवाशी आणि प्रामुख्याने पुरुषवर्गाशी संवाद करीत लेखन केल्यामुळे ते परिणामकारक होते.

पुरुषवर्गाला आवाहन करण्यासाठी, जाग आणण्यासाठी समजावणीच्या सुरात, 'अहो' या संबोधनाचा काहीसा उपहासगर्भ उपयोग ताराबाई करतात.उदा. ''अहो, पुनर्विवाह न करण्याची चाल महान रोग्याप्रमाणे अनेक ठिकाणी व जातीत पसरली आहे.''

प्रत्यक्ष संवाद करताना ज्याप्रमाणे माणूस विविध पातळ्यांवर संवाद करतो, तशीच संवादी शैली ताराबाईंची आहे. अधूनमधून 'अरे, कायरे, होय रे, होय ना, नाही ना, बरे, अहा रे' यांसारख्या संबोधनांचा औचित्यपूर्ण वापर करून आपल्या लेखनाला एका जिवंत संवादाचे रूप ताराबाईंनी प्राप्त करून दिले आहे.

### ४.३.२ जिवंतपणा

ताराबाईंचे निवेदन कित्येकदा प्रत्यक्ष बोलण्याचा भास निर्माण करते. विवेचनाच्या ओघात आलेला हा एक संवादाचा नमुना पहा– ''आतां तिकडून आटपलें कीं नाहीं, बाढा, नऊ वाजले, असे म्हटल को, हिकडून जबाव हो, आलें आटपत, वाढतें, रोजचे मेले नऊ कपाळीं बसलेच. आहो, डाळ, माजी शिजली तर पाहिजे ना? का तसेच वाई पानावर ?'' तसाच हा पुरुपी भाषेचा बेमालूम आव पहा– ''गाढविच्याला खायला मिळत नव्हतें; पण आतां शिंदळींचा दोन घोड्यांच्या बागांतून फिरतो.''

ताराबाईंनी आपल्या बहुरूपी शैलीने बोलभाषेतला न्यास कसा नेमका व्यक्त केला आहे हे पुढील वाक्यांतून दिसेल– '''आंबा नवऱ्याला खायचा नाहीं, म्हणून बायको टाकील ? होणार नाहीं., नवरा मेला की बसलें मग शिळेसारखे, मग यापुढें तिला दुर्गुण शिकवण्याकरितां पंतोजी नका''...याउलट फशी पडलेल्या स्त्रीचे करुण चित्र काळजाला पीळ पाडणाऱ्या शब्दांत व्यक्त झालेले आहे– ''बिचारी गाय होऊन हाय हाय करीत धाय धाय रडून आपल्या नेत्रोदकानें कलंक धूत कारागृहांत कोठें तरी लज्जेचें गाठोडें डोक्यावर घेऊन जनापवाद सोशीत जन्म घालविते. .या शरिराचे रति रति तुकडे पडून, हाडांचे मणी व रक्ताचे पाणी होईपर्यंत अतोनात क्ट करून सदा तुमच्या मुखाकडे नजर.''

### ४.३.३ आक्रमकता

ताराबाईंच्या भाषाशैलीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे मनस्वी चीड व तीतून आलेला आक्रमकपणा आहे. स्त्रीचे अमोघ सामर्थ्य वर्णन करताना लढविलेला हा बिनतोड कोटिक्रम पाहण्यासारखा आहे–''अरे, तुम्ही एखाद्या बलाढ्य शत्रूवर मोठ्या लष्करानिशी दारूगोळे व नाना प्रकारचे प्राणघातक शस्त्रांनी मारा करून त्याला आपला बंदा गुलाम कराल, दोहोंकडचे अगणित बळी पडतील, रक्ताचे पूर वाहतील, तेव्हां एखादे ठिकाणी तुम्हांस जय धार्जिणा होईल...पण ही यःकश्चित् अबला. हिच्या एका नेत्रकटाक्षानेंच तुमचे सर्व शौर्य, तेज, वीरश्री गळून जाऊन लागलेच तिचेपुढें कुत्र्यासारिखे पाय चाटावयास धावतां ! अरे, तरवारीनें, शस्त्रांनी कोणाही कोणाला घायाळ करिलच करील. यांत कांहीं मोठा पुरुषार्थ नाहीं. पण जे कोणी नुसत्या

दृष्टींनीं दुरून पाहिल्याबरोबर हाय हाय करण्यास लावील, ते खरें, तेव्हा आतां जास्त पराक्रमी कोण ? ती स्त्री की तुम्ही ?''

### ४.३.४ युक्तिवाद चातुर्य

ताराबाईंनी केलेले दोषदिग्दर्शन सत्यस्थितीचे दर्शन घडविणारे तर आहेच, त्याचबरोबर आत्मपरीक्षण करायला लावणारेदेखील आहे. ''तुमच्या आईला कोणी, ती फलाणे मामासाहेबांची आई कीं नाही, नर्कदुर्गाची वेसच आहे, ते अमके निमाजी बोबडे याची बहीण केवळ कपटाची खाणच तो गोमाजीपंत कापरे, त्याची बायको तर केवळ पुण्यवृक्ष तोडण्याची कुऱ्हाडच आहे, असें जर म्हटले तर तुम्हांला बरें वाटेलं काय ?'' असा ताराबाईंनी पुरुषांशी केलेला प्रश्नरूपी युक्तिवाद त्यांच्या बुद्धिचातुर्याचा व प्रतिपक्षाला खजील, निरुत्तर करणाऱ्या शक्तीचा समर्थ आविष्कार होय. ''तुमचा शूरपणा जोवर आजमावून पाहिला नाही तोच तुमचा आब'' असा आव्हानात्मक पवित्रा घेणाऱ्या ताराबाई ''तुमच्या अंगीं भूतदया कां नसावी बरें?'' असे क्वचित मानवतावादी आवाहनही करतात.

### ४.३.५ मराठमोळ्या बोलीचा आविष्कार

संस्कृतप्रमाणेच अस्सल मराठमोळ्या बोलीचा आविष्कार ताराबाईंच्या लेखनात झालेला आढळतो. तत्कालीन ग्रामीण बोलीतील अनेक शब्द त्यांच्या लेखनात नैसर्गिकपणे आविष्कृत होतात. उदा. बुक्क्या, हायतोबा, काटेतोल, तळहावले, बटकी, घंगाळ, धोत्रे, लेकावळी, वानरोबा, उरफाटा, सड्याफटिंग, जोडा, खपगी, महाजबर, कसाब, गैदी, बुकणी, दांताळवाडी, मढे, बाजिंदी, दातखिळी, शिंदळकी, लचांड, बेइमानी, भूस, इंगळ, गवऱ्या, हालवनवास, रकटे, ठिगळ, अडगळ, जिवासांड इत्यादी अस्सल बोलीशब्दांनी त्यांचे लेखन जिवंत, प्रवाही व परिणामकारक झाले आहे. ताराबाईंच्या लेखनात अरबी फारसीमिश्रीत शब्दही आढळतात. उदा. जहांमर्द, ताबेदारी, मुकाबला, अमीर, कलमबहादूर, भाकरीबहादर इत्यादी.

### ४.३.६ संस्कृतप्रचुर शब्द

ताराबाईंचे संस्कृत ग्रंथांचे वाचन दांडगे होते. त्यामुळे संस्कृतप्रचुर शब्द त्यांच्या लेखनात विपुलतेने आढळतात. उदा. दुष्कृत्य, अनर्थ, वैधव्य, मनोनिग्रह, नेत्र, परमात्मा, सौभाग्य, पातिव्रत्य, आख्यान, वर्ज्य, यजमान, भर्ता, तबक, शास्त्र, अंतर्यामी, अष्टाधिकार, मंत्रप्रचिती, समरांगण, रत्न, व्युत्पन्न, सृष्टी, जगन्नियंता, अग्नी, वायू, मेघमंडळ, मृगजळ, सुवर्ण, सर्प, रत्नखचित अलंकार, वीरश्री, वल्ली, अमृत, गृहतुरुंग, नाभिक, सुवर्ण कुचक मंडल, माता, सार्वभौम, मुखमार्जन, मृगनेत्री, राजश्री, व्याघ्र, गृहराष्ट्र, प्रारब्ध, आज्ञांकित, ललाट, वंशवृद्धी, वस्त्रप्रावरणे, गर्दभ इत्यादी. यांसारख्या अनेक तत्सम शब्दांनी त्यांचे संस्कृतवरील प्रभुत्व व भाषेवरील हुकमत प्रत्ययास येते. त्या काळात संस्कृत भाषा व संस्कृत साहित्याचा

अभ्यास असणाऱ्या ज्या काही हाताच्या बोटांवर मोजता येण्यासारख्या स्त्रिया महाराष्ट्रात असतील, त्यांपैकी ताराबाई एक होत्या. बहुजन समाजातील तर त्या बहुधा एकमेव असाव्यात.

### ४.३.७ उपमा –दृष्टांत

ताराबाईंच्या अस्सल जीवनानुभवातून त्यांची भाषा निर्माण झालेली आहे. ग्रामीण कृषिसंस्कृतीतील अनेक उपमाने त्यांच्या लेखनामध्ये येतात. ती त्यांच्या जीवनानुभवाच्या परिघातलीच असते. उदा. दिवा, पाळणा, दूध, ताक, शेवया, विस्तव, शेगडी, जोंधळे, कापूस,मिरे, ढेकूण, पिसवा यांसारख्या उपमा स्त्रीच्या रोजच्या जीवनातील आहेत. तसेच अनेक प्राणी, पक्षांची नावे त्यांच्या लेखनात येतात. उदा. सिंह, वाघीण, हरिण, कोल्हा, ससा, डुक्कर, भाड्याचा बैल, अबलक घोडा, कसाबाची गाय, पट्टेवाला वाघ, वाघापुढची बकरी, कुत्रा, गाढव, कावळा, टोळ, घुबड, मधमाशी, मुंगी, सर्प, विंचू, लांकडाचे खुंट, लोढणे, काटे, कडू वृंदावनाचा वेल, तराजूचा काटा यांसारखी कृषिसंस्कृतीतील कित्येक उपमाने त्यांच्या लेखनात  येतात.

उपमा दृष्टांताचा त्यांचा वापरही नेमका असतो. साधारणतः त्यांच्या भोवतीच्या विश्वातल्याच बाबी उपमा दृष्टान्तात येताना दिसतात. क्वचित संस्कृत वाङ्मयातून येणारी उपमा दिसेल. नाही असे नाही; परंतु त्यांच्या उपमा त्यांच्या भोवतीच्या अनुभवविश्वातून येतात आणि म्हणूनच त्या प्रतिपाद्य विषय अधिक प्रभावी करतात. उदाहरणार्थ, 'प्रपंचाचे शेत तुम्ही एकट्याने नांगरून काढाल काय?', 'आज्ञेत केवळ बिजलीप्रमाणे लवते', 'अमृताचे वल्लीप्रमाणे सदासर्वदा सर्व सोसून निरंतर गोडच', 'कुचकमंडलूतले अमृत', 'काळजाचे घडाप्रमाणे', 'हाडाचे मणी आणि रक्ताचे पाणी', 'गोठ्यातील म्हशीप्रमाणे मूर्ख', 'सर्व स्त्रिया प्रखर सूर्याच्या तेजाप्रमाणे सतेज, अंतर्बाह्य गंगाजलाप्रमाणे निर्मळ आहेत असे मुळीच नाही', 'तरुणपणाचे प्रज्वलित इंगळ', 'ही जिवंत जळत शेगडी तिला सोसेल का?' 'त्या कुसुमचापास तिने कोणत्या रीतीने आवरून धरावे?', 'डुकरीसारखे शेतखान्यातून तोंडे खुपशितात', 'जशी मधमाशी मोहळाला लुब्ध होते' अशा उपमा दृष्टांतांनी हे लेखन प्रभावी होत जाते.

### ४.३.८ अनुभवविश्वाचा अस्सलपणा

ताराबाईंची अनेक विधाने, म्हणी, वाक्प्रचार, शब्दसमूह हे अस्सल ग्रामसंस्कृतीतून उगवलेले आहेत. उदा. 'हे जन्मदरिद्री ताकाबरोबर शेवया खाणार!', 'नासके मिरे जोंधळ्याला हार जातीय की काय?', 'प्रीती ही केवळ दुधाप्रमाणे आहे. दूध एकदा नासले म्हणजे जसे त्याचे फिरून दूध होत नाही, तशी प्रीति एकदा फाटली म्हणजे ती पुन्हा कधी जुळत नाही'  'असें जेव्हां होते, तेव्हां मग त्या डुकरीसारखें शेतखान्यांत तोंड खुपशितात.' ' ती काळजी तिचेकडेस  सोपवून विंचवासारखे ढेकळाआड तोंड ड लपवित फिरतां.'' उसाचे शेतांतून जाल, अंगाला पान लागू देणार नाहीं.'  'अबलख घोड्यासारखे धड  ना काळे, धड ना पांढरे, एवढाच फेर.'असे अत्यंत अस्सल व समर्पक लेखन ताराबाईंनी केले आहे. त्यांचे सारे लेखन त्यांच्या अनुभवविश्वातून अगदी नैसर्गिकपणे अवतरले आहे असे जाणवते.

### ४.३.९ म्हणींचा चपखल वापर

म्हणींचा चपखल वापर करून आपले विचार प्रभावीपणे मांडण्याचे ताराबाईंचे कसब वाखाणण्यासारखे होते. अर्थगर्भ म्हणींमधून मोठा आशय त्यांनी गोळीबंदपणे मांडला आहे. त्यामुळे त्यांचे लेखन विलक्षण परिणामकारक व अर्थवाही झाले आहे. त्यांच्या लेखनात आलेल्या काही म्हणी वानगीदाखल पुढीलप्रमाणे – ज्याच्या हाती ससा तो पारधी, मला कोण वाणी माझा मीच वाणी, नाऱ्याने केले वण केशाला प्रायश्चित्त, आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास, नासके मिरे जोंधळ्याला हार जातील काय? हगवणी बायको नागवणी सोयरा, परखा पाय व घराला अपाय, घोडे फेरता बाप मरावा, पण रहाटाने सूत कातणारी आई मरू नये, आई जेवू घालीना बाप भीक मागू देईना, दिव्याखाली अंधार, सब घोडे बारा टक्के, पुराणातली वांगी पुराणात यांसारख्या अनेक म्हणींचा मोठ्या खुबीने वापर करून ताराबाईंनी आपले मत प्रभावीपणे मांडले आहे. यातील अनेक म्हणींना ग्रामीण कृषिसंस्कृतीचा अस्सल स्पर्श आहे.

### ४.३.१० अर्थगर्भ वाक्प्रचार

म्हणींप्रमाणे वाक्प्रचारांचाही प्रभावी वापर करून ताराबाईंनी अपेक्षित परिणाम साधला आहे. ग्रामीण बोलीतील अनेक वाक्प्रचार त्यांच्या लेखनात सहजपणे येतात. उदा. मांजराच्या गळ्यात घंटा बांधणे, गुणांचे दिवे पाजळणे, सांदीचे खापर करणे, दैव फळफळणे, तोंडचे पाणी पळणे, नाकाने कांदे सोलणे, केसांनी गळा कापणे, तळची आग मस्तकात जाणे, ताकाबरोबर शेवया खाणे, पराचा कावळा होणे इत्यादी.

इंद्रायणीचे गोटें, ईश्वराघरचा मळा, कोळशाचे भाऊ, चिमटीभर दाण्याची सत्ता, जळती शेगडी, जहामर्दीचा विडा, जिवासांड ओझे, दंताळवाडीचा पत्ता, दामाजीचा निजध्यास, दुर्गुणांचे पोते, पाप्याचे पितर, प्रपंचाचे शेत, लज्जेचे गाठोडें, ललाटपट, सांदीचे खापर, अकलेचा फाटा लांब झोंकणे, हाय तोबा हाय तोबा करणे इ. ढालगज, बाजिंदी, बोकेसंन्याशी, तोंडचोपडे, हिडगे चाळे, दैव फळफळणे, लुबुलबु करणे या त्यांच्या वाक्प्रयोगांत खास बायकी ठसका आहे.

### ४.३.११ विशेषणे

ताराबाईंच्या लेखनातील विशेषणे हा एक स्वतंत्र अभ्यासविषय आहे. प्रतिमा व मिथक भंजन, दंभस्फोट, उपहास, उपरोध करण्यासाठी त्या विशेषणांचा अत्यंत प्रभावी वापर करतात. उदा. काळतोंडे, लांब शेपटीचे वानरोबा, घरभेदी बिभीषण, बत्तीस लक्षणी पुतळे, अकलेचा फांटा, भोजनभाऊ तोंडचोपडे, पाप्याचे पितर, घरबारी गृहस्थ, अट्टल हुशार कोल्हे, स्त्रियांचे हाडवैरी, कोळशाचे भाऊ, कुलहीन गाढव इत्यादी. ज्याच्यावर हल्ला करायचा, त्याची सारी प्रतिष्ठा धुळीला मिळवून त्याला त्याच्या खऱ्या जागेवर आणून बसविण्याचे कार्य ताराबाईंच्या लेखनाने केलेले आहे. ताराबाईंनी पुरुषांना उद्देशून जी विशेषणे वापरली आहेत, त्यामधून पुरुषी प्रवृत्तीची चिरफाड केलेली आहे. उदा. अगदी विद्याहीन मूर्ख, जसे राक्षस तेवढे, तुमच्यापेक्षा बैल बरा, तुम्ही पाजी, बेइमान, भरवंसा देऊन केसांनी गळा कापणारे, तुम्ही सदा

भिकारी, अरे तुम्ही काय महाठक, जन्मदरिद्री, बाबा म्हणजे जन्म करंट्याचे, शालजोडीला रकट्याचे ठिगळ, प्रतिष्ठित भिकारी, दुर्गुणाचे पुतळे, विंचवासारखे ढेकळाआड तोंडे लपवीत फिरता, तुमच्यापेक्षा सर्प बरा, महाठक, इंद्रायणीचे गोटे, तुमच्यासारखे सडे लाकडाचे खुंट, तुम्ही गाजरासारखे बैमान, मित्रद्रोही, राजद्रोही, कुळांत कुलांगार इत्यादी. पुरुषांना उद्देशून वापरलेली वाच्यार्थप्रधान व निंद्याव्यंजक विशेषणे ताराबाईंच्या प्रतिपादनातील प्रक्षोभाला वाचा फोडतात.

### ४.३.१२ उपहास – उपरोध

बुद्धिप्रामाण्य आणि तर्क ही जशी ताराबाईंच्या लेखनाची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत, त्याप्रमाणेच उपहास आणि उपरोधही या शैलीचे महत्त्वाचे विशेष आहेत उपरोधिक भाषा हे ताराबाईंचे वैशिष्ट्य. हा उपहास कधीकधी अतिशय जहरीही होत जातो. त्यांच्या उपहास–उपरोधाची काही उदाहरणे–

‘वा रे देव! वा रे ऋषी! एकाचडी एक !’

‘यांची एक बायको मेली अगर ती बिचारी दुखणाईत आहे तोच दुसरीची तयारी. श्रीमंत असेल तर मग काय, आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास.’

‘अरे, ज्या देशांत आपले ज्ञातीचें... डौलानें पंक्तींत बसायला तयार?’

‘कसे म्हणाल तर जिचा जिचा सरकार पुनर्विवाह करून देईल... खजिना भरण्याची एक पर्वणीच येईल.’

‘दक्षणेचे पैसे साचवून रांडेकडे जायचे, इतके करून महाराज सन्याशी!’

‘पण एकदा पुराणीकाची स्वारी व्यासपीठावरून उठली म्हणजे... स्वतः पासरीभर वांगी मिटक्या मारमारून स्वाहा करिते.’

‘वाहवा रे देव’, ‘धन्य त्या पतिव्रता’ यांसारखे उपरोधिक शब्द व विधाने त्यांच्या लेखनात पानोपानी आढळतात. उपहास–उपरोधाचा शस्त्रासारखा वापर करून प्रतिपक्षाला चितपट करण्याचे कार्य त्यांची भाषा करते.

### ४.३.१३ क्रियापदांची द्विरुक्ती/विरुद्धार्थी शब्द/ स्पष्टोक्ती

ताराबाईंच्या गद्यशैलीबाबत विलास खोले म्हणतात, ‘‘ वैचारिक आवाहनाच्या तीव्रतेनुसार भावात्मक स्फोट घडविणारी क्रियापदे त्यांच्या मथितार्थास साहाय्यकारी होतात. भावनेच्या आवेगासरशी चढत जाणारी भाषा, संवादाचा आभास उत्पन्न करणारी वाक्यरचना, उपरोधाच्या मार्गाने आशयातील वक्रता गडद करण्याची त्यांची लेखनसरणी आणि ‘‘करीलच करील’’ ‘‘ठेवालच ठेवाल’’, ‘‘घडेलच घडेल’’, ‘‘होणारच होणार’’ यांसारखी क्रियापदांची द्विरुक्ती करण्यातून अभिव्यक्त होणारा ठामपणा ही ताराबाईंच्या लेखनशैलीची वैशिष्ट्ये प्रभावी गद्यलेखनाचे वैभव वृद्धिंगत करतात’’ (कित्ता : ७६).

‘मृगनेत्रीचे लग्न मढ्याबरोबर’, ‘ज्याचे हाती ससा तो पारधी बाकी सारे गैदी’, ‘मृगजळाचे लोट व जहामर्दीचा विडा’, ‘कलमबहाद्दर-तरवारबहाद्दर’ अशी विरुद्धार्थी शब्दांची मांडणी त्यांच्या विधानांतील ध्वन्यर्थ तर स्पष्ट करतेच, त्याशिवाय विधानांना चित्रदर्शित्व प्राप्त करून देते. 'दुर्गुणापासून दुर्गुण उत्पन्न होतो. याचे काही कोठे शेतमळे नाहीत,' 'रांडांची काही खाण नाही', 'अरे तुमचे देवदेखील दगेबाज, मग तुम्ही असालच असाल यांत नवल काय?', 'शिंदळास सारेच शिंदळ दिसतात', अशांसारख्या स्पष्टोक्ती 'स्त्रीपुरुषतुलने 'त प्रखर वास्तवाची दाहकता उत्पन्न करतात आणि आक्रमक सूर वाढीस लावतात.

## ४.३.१४ चिंतनात्मक्ता

ताराबाईंची लेखणी कधीकधी चिंतनाच्या पातळीवर जाते आणि सुभाषितवजा लिहून जाते. उदाहरणार्थ- त्या प्रीतीसंबंधी लिहितात, ‘‘प्रीति काही आंबा, जांब नाही म्हणून वाटून घेता येईल. प्रीति ही केवळ दुधाप्रमाणे आहे. दूध एकदा नासले म्हणजे जसे त्याचे फिरून दूध होत नाही तशी ही प्रीति एकदा फाटली म्हणजे ती पुन्हा कधी जुळत नाही.’’ स्त्री असो की पुरुष असो, दुर्गुण हे असणारच. या संदर्भात त्यांनी किती चांगले लिहिले आहे पाहा - ‘‘तर दुर्गुणापासून दुर्गुण उत्पन्न होतो. त्याचे कांही कोठे शेतमळे नाहीत; तुम्हीच स्वतः अनेक दुर्गुणांनी कडूवृंदावन वेलासारखे लगटलेले असून स्त्रियांवरच ढकलता ही तुमची मोठी कुशलता आहे.’’

## ४.३.१५ भाषेचे पारंपरिक संकेत झुगारून स्वभाषेचा आविष्कार

स्त्रीवादाचा पुरस्कार करताना ताराबाईंनी भाषेचे पारंपरिक संकेत झुगारून दिले आहेत. भाषेतील पुरुषी राजकारणाची त्यांना जाणीव होती. म्हणून त्यांनी आपल्या अनुभवांची अभिव्यक्ती करण्यासाठी एक स्वभाषा घडविली व तिचा जोरकस आविष्कार केला. त्या म्हणतात, ‘‘तुम्ही एकसारखे सगळेच दगाबाज, कपटी आहात, तेंव्हा तुम्हीं एकमेकांचे झाकून नेतां ते उघड करून दाखविण्याला याच्याहीपेक्षां कडक जर दुसरे शब्द अगर भाषा असती तर ती देखील मी वाकडी तिकडी लिहिलीच असती’’ (कित्ता : ८१). अशा प्रकारे त्यांनी आपल्या भाषेचे समर्थन केले आहे.

ताराबाईंच्या लेखनातील भाषिक विशेष स. गं. मालशे यांनी सविस्तरपणे नोंदविले आहेत (मालशे, १९७५ : प्रस्ता., १७-२३). ‘‘या लेखनामागे स्त्रीजातीच्या असाहायतेविषयी अपार करुणा आहे व त्याच्या बाह्याविष्कारात पुरुषी अरेरावीविरुद्ध कमालीची घृणा आहे. त्यामुळे येथे कधी शब्दांचे जळजळीत अंगार उसळताना दिसतात तर कित्येकदा उपहास उपरोधाचे फटकारे झडताना आढळतात’’ (१९७५ : १२). ‘अरे’ या संबोधनाने सुरुवात होणारी त्यांची विधाने आक्रमकपणे वाचकांच्या मेंदूला भिडतात. प्रस्थापित पुरुषप्रधान व्यवस्थेला आव्हान देत असतानाच पुरुषांच्या संवेदनशीलतेला, भावनेला, माणूसपणाला संवादी राहात त्यांना अंतर्मुख करण्याचे कार्य करतात.

## ४.४ समारोप

ताराबाई शिंदे यांच्या 'स्त्रीपुरुषतुलना' या पुस्तकाने केवळ एकोणिसाव्या शतकातीलच नव्हे, तर विसाव्या शतकातीलदेखील गद्यलेखनात एक इतिहास घडविला आहे. त्यांच्या विषयाचे वेगळेपण व त्याची प्रस्तुतता तर निर्विवाद आहेच. त्याखेरीज निबंधाचा आविष्कारही क्रांतिकारक स्वरूपाचा आहे. कमालीचे विवेकनिष्ठ, आव्हानात्मक गद्यलेखन किती प्रभावीपणे करता येते, त्याचा नमुना म्हणून ताराबाईंच्या या लेखनाचा विचार करता येईल. उपहास-उपरोधाचे आसूड ओढत ओढत कनिष्ठ मानल्या गेलेल्या स्त्रीजातीचे श्रेष्ठत्व त्या प्रस्थापित करतात. व्याजोक्ती, वक्रोक्ती, कोटिबाजपणा या शस्त्रांचा उपयोग तर त्या करतातच; त्याशिवाय स्त्रीजीवनाशी संबंधित असलेली अस्सल उपमानसृष्टीही त्या आपल्या मदतीला घेतात.

ताराबाईंच्या लेखनशैलीबाबत नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, ''स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडताना ताराबाईंची लेखणी अतिशय धारदार होते. क्वचित उपहास-उपरोधाचे पाणीही तिला चढते. बोलीच्या वापराने ही लेखणी अधिकच शक्तिमान होते; परंतु या लेखणीचे खरे सामर्थ्य साठवले आहे ते बुद्धिप्रामाण्यवादी विचारसरणीत, तर्ककठोर चिकित्सेत आणि निर्भीड मीमांसेत'' (कोत्तापल्ले, २०१६ : प्रस्ता. १८).

ताराबाईंच्या लेखनाबाबत विलास खोले म्हणतात, ''त्यांच्या लेखणीतून एकाच वेळी बळी जाणाऱ्या स्त्रियांविषयीची करुणा व बळी घेणाऱ्यांची निर्भर्त्सना करण्यातील कठोरता, स्त्रियांच्या दयनीय अवस्थेविषयीचा खेद व तीस जबाबदार असणाऱ्यांविषयीचा संताप आणि सामोपचारातले आर्जव व भांडणातला आवेश ही प्रकटतात. त्यांच्या साऱ्या लेखनाचा हेतू अखेर पुरुषांतील दोष दूर व्हावेत, त्यांच्याकडून नीतिमान, विवेकी, सद्भावयुक्त, स्नेहपूर्ण आचरण घडावे, कुटुंबात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळावे आणि कुटुंबातील स्त्रीपुरुषांचा नातेसंबंध दोघांनाही सुखावह व उन्नतकारी व्हावा असा आहे.''(कित्ता : ७६).

## ४.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्नोत्तरे

### ४.५.१ बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न

१. ताराबाई शिंदे यांची भाषा कशी आहे?

अ. संवादी आवाहनात्मक ब. वर्णनात्मक क. निवेदनात्मक ड. रसात्मक

२. खालीलपैकी ताराबाईंच्या लेखनशैलीची कोणती वैशिष्ट्ये सांगता येतील?

अ. आक्रमकता ब. उपहास-उपरोध क. उपमा-दृष्टांत ड. अ, ब, क मधील सर्व

३. ताराबाईंच्या लेखनामध्ये कोणत्या भाषेतील शब्द येतात?

अ. मराठी ब. संस्कृत क. फारशी ड. अ, ब, क मधील सर्व

४. ताराबाईंनी खालीलपैकी कोणत्या कादंबरीचे स्त्रीवादी पुनर्वाचन केले आहे?

अ. यमुना पर्यटन ब. मुक्तामाला क. बळीबा पाटील ड. पण लक्षात कोण घेतो?

५. 'कलमबहादूर' हा शब्द कोणत्या भाषेतून आलेला आहे?

अ. संस्कृत ब. प्राकृत क. फारसी ड. हिंदी

**उत्तरे-** १.संवादी २. अ, ब, क मधील सर्व ३. मुक्तामाला ४. अ, ब, क मधील सर्व ५. फारसी

### ४.५.२ दीर्घोत्तरी प्रश्न

१. 'स्त्री-पुरुष तुलना'ची भाषिक व वाङ्मयीन वैशिष्ट्ये सांगा.

२. 'स्त्री-पुरुष तुलना' या निबंधाचे प्रभावमूल्य आशयाइतकेच अभिव्यक्तीमध्येही आहे' या विधानाचा परामर्श घ्या.

३. ताराबाई शिंदे यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये सांगा.

४. 'स्त्री-पुरुष तुलना'ची शैलीशास्त्रीय मीमांसा करा.

### ४.५.३ लघुत्तरी प्रश्न

१. ताराबाई शिंदे यांच्या लेखनाचे भाषिक विशेष थोडक्यात सांगा

२. 'स्त्री-पुरुष तुलना'मधील विशेषणे, म्हणी व वाक्प्रचार यांमुळे आशयाची टोकदार अभिव्यक्ती कशी झाली आहे, ते सांगा.

३. 'स्त्री-पुरुष तुलना'मधील उपहास-उपरोधाचे स्वरूप स्पष्ट करा.

४. 'स्त्री-पुरुष तुलना'मधील भाषिक रूपांचे विश्लेषण करा.

### ४.५.४ टीपा लिहा.

१. ताराबाई शिंदे यांची भाषाशैली

२. ताराबाई शिंदे यांच्या लेखनातील उपमा-दृष्टांत

३. 'स्त्री-पुरुष तुलना'मधील भाषिक विशेष

४. ‘स्त्री–पुरुष तुलना’मधील उपहास–उपरोध

५. ताराबाई शिंदे यांची निवेदनशैली

## ४.६ संदर्भ ग्रंथ


१. कोत्तापल्ले नागनाथ (संपा.) : स्त्री–पुरुष तुलना, सायन पब्लिकेशन, पुणे, २०१६

२. खोले विलास (संपा.) : ताराबाई शिंदेलिखित स्त्रीपुरुष तुलना, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९७

३. मालशे सं. गं. (संपा.) : कै. ताराबाई शिंदेकृत स्त्रीपुरुष तुलना, मुंबई, मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई, १९७५.


## ४.७ उपक्रम

सिमॉन दि बोव्हार यांचे ‘द सेकंड सेक्स’ हे पुस्तक वाचून त्यावर चर्चा करा.